१८८५

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

विषय नाटक

दा. क्र. १६७

११८

म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

[illegible]ालय क्रमांक १६७

लेखक [illegible] वि. गो

सन १८८६

पुस्तकाचें नांव [illegible]पाक

१६७

नाटक

# JAYAPÁL

A

DRAMA IN FIVE ACTS,

BY

VINÁYAK JANÁRDAN KÍRTANE,

AUTHOR OF THE ELDER MÁDHAVRAV PEISHWÁ.

Bombay:
PRINTED AT THE INDU-PRAKASH PRESS.

**SECOND EDITION.**

1876.

*Price* 13 *Annas.*

( Registered under act XX, of 1847. )
(Right of translation reserved.)

INSCRIBED

TO

MY ESTEEMED FRIEND

NÁNÁ MOROJÍ, Esquire,

DEPUTY MAGISTRATE

DHOOLIA.

ठा १९०

# जयपाळ,

(सुधारलेली आवृत्ति २ री.)

हें नाटक

## विनायक जनार्दन कीर्तने,

थोरले माधवराव पेशवे या नाटकाचे कर्त्ते,

यांणीं केलें

तें

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

---

सन १८७६.

---

किंमत १२ आणे.

(हें पुस्तक १८४७ चा आक्ट २० प्रमाणें रजिस्टर केलें असे.)

(भाषांतराचा हक्क ग्रंथकारानें राखिला आहे)

# PREFACE.

It is not to praise my book or to tell you, good readers, how long I have been at it, or what labour it has cost me, that I write this preface. I write it to explain one or two points which some people may be inclined to find fault with.

First it may be asked (as has been asked by some) what life I wish to draw a picture of. The story has evidently an entirely Hebrew origin; the drama seems to be a thoroughly Maráthá production. To this there is a simple answer. It is not the dramatist's business to draw a picture of the outward man, to depict the every day life of this nation or that nation, to show what costumes the Hebrews wore, or what houses the Maráthás lived in. To him all nations and all times, as far as the exterior is concerned, are the same. He regards not the dresses; he regards not the houses; because as I have said, he regards not the outward man. He principally concerns himself with the inner being. He reasons thus:—Everywhere there are men and women, everywhere there are husbands and wives; everywhere there are parents and children. Everywhere therefore will certain feelings arise out of these relationships. Everywhere will men and women hang their happiness on each other's society. Everywhere will young husbands brag of the manifold virtues of their beloved wives, and everywhere will young wives pine for the company of their absent lords. Everywhere will fond parents feel excessively proud of their little ones, and everywhere will these pretty little ones turn their homes into

earthly paradises, by their innocent pranks and unmeaning prattle. Here is the good side of the picture. Have a peep at the bad side of it, if you please,—hard-hearted men and illnatured women, false husbands and false wives, unnatural parents and ungrateful children. This side or that side, still the picture must be of the same object.

It is with the feelings and passions of man alone one can concern himself in a work like this, and it is with the feelings and passions alone therefore that I have concerned myself in this work.

Secondly, it may be said that I have laid my scenes in purely imaginary localities, that there is no Sadáshivapuri, or Vishwanagari on the map of India, nor ever was. To this I have to say you may justly take a writer of novels to account for this, but not a writer of dramas. To the latter's main purposes, (except in historical dramas), every city marked on the map of India is Sadáshivapuri or Vishwanagari. One city indeed may have magnificent palaces, another beautiful domes, and a third perhaps dilapidated ruins. But with those palaces or domes or those ruins, a writer of dramas has very little to do. Shakespeare was not so very ignorant of Geography as to call Bohemia an island; and yet everybody knows he has done so. The truth is, he had nothing to do with the actual position of Bohemia. His Bohemia you may regard a purely imaginary country, if you like.

One point more. Thirdly it may be urged that while the names of the higher characters in this drama appear rather ancient, at all events, not such as we are accustomed to in these days; the names of the lower ones appear modern. I must confess I was unable to avoid this. Books, Copperplates and Inscriptions have revealed to us the names of kings and warriors of bygone days, of gallant princes and fair princess-

# जयपाळनाटक.

## अंक १—प्रवेश १.

( स्थल—वन. )

**दुर्मति, मणिपाळ, शूरसेन, वीरभद्र, चित्रसेन आणि विचित्रवीर्य.**

**दुर्मति.**—कायरे बावांनो कसें? ठरवा, कोणता तरी एक बेत ठरवा. हें अर्धेमधें उपयोगीं नाहीं. पुढें कुत्र्यासारिखें तुकडा खाऊन दाराशीं लोळत पडायाचें असलें तर तसें होऊं द्या; आणि सिंहासारिखें छातीवर बसून गर्जना करायाची असली तर तसें होऊं द्या.

**मणिपाळ**—ठरवायाचें ठरवायाचें तें काय आहे? तोच बेत. मर्द आहों कीं कोण आहों! बायकांसारिखें "करूं कि नको", "करूं कि नको", "करूं कीं नको" असें करीत बसायाचें आहे? तरवारीशीं गांठ घालावयाची; मग यश येओ किंवा अपयश येओ. एक भाऊ नाहीं असें कां नाहीं ह्मटलें? नाहीं तर तो पुढें आमच्यावर स्वामी होऊन आम्हांला पायां पडावयास लावणार! आम्हाला गुलामासारिखें वागविणार! त्याच्या पोरांना आमचीं मुलें "जोहार" ह्मणून ओरडणार! तो राजाच्या सिंहासनाजवळ सिंहासनघालून बसणार आणि आम्हीं भालदार चोपदारांत उभे राहणार! यँरे

स्वप्न! यँरे दृष्टांत! अरे तूं दृष्टांत्या! थांब, तुला थोडक्यांतच यमाजी भास्कराकडे पाठवितों. ते तुझ्या दृष्टांताचा अर्थ करून सांगतील.

**दुर्मति.**—शाबासरे शाबास; भला मला भाऊ शोभतोस! कां क्रूरसेन, तुमची तरवार काय म्हणते?

**क्रूरसेन.**—तुम्ही ठरवाल तसें. आमची कोणत्याही गोष्टीस ना नाहीं. त्या स्वप्नसृष्टीच्या नायकाला केव्हां तरी एकदां दक्षिणदिशेस पाठविलें पाहिजे खरें.—चित्रसेना, तयारी असों द्या.

**चित्रसेन.**—तुमचा ठराव होण्यास मात्र उशीर. ही तरवार म्यानांतून कशी वर येऊं पाहते आहे पाहा. जसें कांहीं तिला सुद्धां तुमचा बेत पसंत झाला. परंतु इतकेंच कीं,

**दुर्मति.**—अरेरे, त्या घाणेरड्या "परंतूचें" प्रयोजन काय? "परंतु" हा म्हातारा लंगडा निश्चयाच्या बेतांत बिलकुल उपयोगीं नाहीं. तूं चित्रसेना, तूं असा दुटेंकड्यांवर हात ठेवून उभा राहूं नको. पुनः बोल. त्या "परंतूस" रजा दे.

**चित्रसेन.**—बरें तर तसें कां होईना? दिली रजा चला; तुम्ही म्हणतां तसें होऊं द्या.

**वीरभद्र.**—मग काय तुमचा बेत झाला? मी तृतीयपंथी नाहीं हें तुम्हांस ठाऊक आहेच.

**विचित्रवीर्य.**—अरे चांडाळांनो! नका भलतेच बेत करूं. अरे, तो तुमचा भाऊ ना! सावत्र झाला म्हणून काय झालें? बाप तर एकच कीं नाहीं? भ्रातृहत्येचें पातक उगीच डोक्यावर घेऊन शापदग्ध कां

होतां? आपण होऊन खाईंत कां उडी घालितां? आपण होऊन कर्मरूप नौकेस छिद्र पाडून पापसमुद्रांत कां बुडूं पाहतां? हे हात, प्राण्यांच्या रक्तांत बुडवावे म्हणून दिले नाहींत. हीं शस्त्रें, एकमेकांच्या उरांत खुपसावीं याकरितां योजिलीं नाहींत. हस्तांनीं शस्त्रें वाळगून निरुपद्रवी प्राणी दुष्टांच्या जवळच्यांतून सोडवावे, तरच ते हस्त, तरच तीं शस्त्रें आणि तरच ते वीर. अरे दुर्मति, आपल्या जयपाळानें तुमचा कोणता अन्याय केला? त्याला जीं भद्रसूचक स्वप्नें पडलीं तीं त्याणें भोळ्या भावानें तीर्थरूपांपाशीं तुम्हांदेखत सांगीतलीं हाच काय तो त्याचा अन्याय ना? स्वप्नें कोणाच्या हातीं असतात? तुमच्या हातीं आहेत? मग तुम्ही त्या अनाथाचा कशासाठीं प्राण घेतां बरें? छे, छे, छे; कुत्सित वासनांनीं विटाळलेल्या तुमच्या मनांस विचारजीवनांत एकदां बुडवून काढा; सचैल स्नान घाला आणि शुद्ध व्हा.

**दुर्मति.**—अरे वाहवारे तूं योगमार्गी; वाहवारे साधू. तुझेंच नांव विचित्रवीर्य? भीमसेनमहाराजांचा मुलगा विचित्रवीर्य तो तूंच? भगवद्भक्ता, जयपुरांतल्या तरुण स्त्रियांच्या आया तुलाच भीत कायरे? वेशीबाहेरील पेठेंत मध्यरात्रीं पाहरा कोण तूं चना करीत हिंडतअसस?

**क्रूरसेन.**—कांहो पापभीरु, आपण बारावर्षें तीर्थयात्रा करीत कां फिरत होतां, कांहीं स्मरण आहे? त्या गोष्टी आपल्या ध्यानांतून गेल्या असतील. अरे, तूं त्या सखीशीं नाना तऱ्हा केल्यास. हसून, गोड बोलून, थट्टा करून, अगोदर तिचें चित्त आणि मग तिचें शरीर अशीं दोन्हीही चोरिलींस; मग दिवसास सुद्धां रात्रच समजून, कोणी

म्हणेल ती तुझी धर्मपत्नीच, अशा प्रकारें तिच्याशीं तूं रत झालास; आणि तिचा नवरा अप्रतिष्ठेमुळें क्रोधाविष्ट होऊन जेव्हां तुझ्या अंगावर धांवून आला तेव्हां त्याचे दोन तुकडे करून टाकिलेस; ती हत्या नव्हे नाहीं, आणि ही मात्र हत्या! भलारे साधु! लोकांच्या डोळ्यांतील मोहोरीएवढें फूल दाखविण्याच्या पूर्वी आपल्या डोळ्यांतील वडस वाढलेले दाखीव. बाबा, सगळ्यांची गांठ पडावी, परंतु लंगोटीयाराची पडूं नये.

**विचित्रवीर्य.**—क्रूरसेना, तूं माझी जी निर्भर्त्सना केलीस ती यथार्थ आहे. मीही चांडाळच; मीही पापीच. त्या आचरणाची स्मृति झाली म्हणजे अजून माझ्या अंगाचा अनिवार दाह होतो. त्या पापाचीं फळें जीं मी भोगिलीं आणि अजून भोगितों तीं जर नीट ध्यानांत घ्याल तर त्या लेंकरा जयपाळावर तुम्हीं आपली तरवार कधीं उपसणार नाहीं. मी त्या बिचाऱ्याचा जीव घेऊन जेव्हां पळालों तेव्हां माझी कोण दशा; कोणी पाटलाग करून मजला धरतील कीं काय या भीतीनें घोडा केवळ वायुवेगानें जाईल असा सोडिला; आणि सायंकाळपर्यंत साठ कोश भवानीपुरास गेलों. तेथें घोड्यावरून खालीं उतरलों मात्र, तों त्या बिचाऱ्या जनावरानें प्राण सोडिला. रात्रीं एका मोडक्या देवालयांत उतरलों, आणि तेथें थकून कांहीं विश्रांति घ्यावी म्हणून जों बसलों तों ज्याप्रमाणें महा नदीचा बांध फुटला असतां धो, धो, धो असा अनिवार पाण्याचा लोंढा वाहूं लागतो त्याप्रमाणें परम वेदना देणाऱ्या विचारांचे थवेच्या थवे माझ्या मनांत येऊं लागले. मला परम

अनुताप झाला. मग जशी छाकट्याची गुंगी उतरली म्हणजे तो शुद्धीवर येतो त्याप्रमाणें माझा खून चढलेला उतरून मी देहभानावर आलों. रात्रीं झोंप कोठली ? उंदीर जरी खडबडला तरी पोटांत धरणेकऱ्यांची धडकी भरावी. दिवसास सहज कोणी माणूस धांवत असला तरी मला धरण्यासच येतो असें वाटून मी राजरस्ते सोडून आडमार्गानें जाऊं लागावें. त्या वेळची माझी स्थिति एका ईश्वराखेरीज दुसरा कोणी जाणत नसेल. शंभरदां तर शंभर वेष धरिले. अखेरीस बैरागी बनून तीर्थयात्रा केल्या; आणि या प्रमाणें बारा वर्षें अतिदारुण वनवास भोगल्यानंतर कुटुंबसुखाचा उपभोग घ्यावा यासाठीं पुनः तुम्हांत येऊन राहिलों. या गोष्टीस वर्ष झालें नाहीं तोंच तुम्ही आपल्या हातानें घरादारावर विघ्नाग्नि आणून घालूं पाहतां. तुमच्या त्या दुष्ट बेतांत मी कधीं पडणार नाहीं. माझ्या पूर्वींच्याच अन्यायाचें ओझें-मला डोईजड झालें आहे, त्याखालींच माझी कंबर वांकली, त्याखालींच मी मरणोन्मुख झालों आहें. नको, नको, पुनः पापवासना नको. आतां तें ओझें जर अणुरेणूभर वाढलें तर तें जीव घेऊन समूळ नाश करील यांत संशय नाहीं.

**दुर्मति.**—तें केव्हां जीव घेऊन समूळ नाश करील तें करो; परंतु या तरवारी मात्र त्यापेक्षां जलद करतील; समजलास.

**विचित्रवीर्य.**—अरे, आग लागो तुझ्या समजण्याला. अरे, आपण—

**दुर्मति.**—आग लागो तुझ्या तोंडाला. (तरवार उप-

सून) क्रूरसेना, धर, धर इला. इचीच कंवक्की टाकतों अगोदर काढून, मग तो. लागला आहे मघांपासून वचावचा वडवड करायाला. चल चल. (चित्रसेन दुर्मतीस आवंरतो.)

**विचित्रवीर्य.**—तुझ्या तरवारीपेक्षां माझ्या तरवारीचें पाणी निरस आहे असें समजूं नको. तूंच एक क्षत्रियवीर्याचा असें नाहीं; परंतु पुनः मनुष्यपण सोडून जनावरासारिखें वागण्यास माझें मन घेत नाहीं.

**दुर्मति.**—सोड सोड, चित्रसेना सोड. अरे, पुनः पुनः धरितो! अरे सोड म्हणतों नी! याला जनावर कोण, तें दाखवितों. (सुटण्याचा प्रयत्न करितो.)

**चित्रसेन.**—हां, हां, हां! विचित्रवीर्याला बाजूला काढा. अरे वीरभद्रा, हो, मधें हो, मधें मधें हो. हा सुटतो पाहा; अरे हो, अरे हो, अरे हो; अरे पण, अरे पण; दम खा, दम खा, (अधिक आंवळून धरितो.)

**दुर्मति.**—(तरवार लांब झोंकून) घ्या ती तरवार, द्या मसणवटींत फेकून. नाहीं तर घाला माझ्याच डोक्यांत.

**चित्रसेन.**—अरे शांत हो; अगोदर एकाचा निवाडा ठरावयाचा आहे तो प्रथम होऊं दे. ह्या गरीबाला मारून तूं काय करणार? यापासून एवढें मात्र होईल कीं, आपसांत फाटल्यामुळें आपल्या निश्चयाचें तीक्ष्ण अग्र बोथट होऊन त्या जयपाळाच्या नाशास असमर्थ होईल.

**क्रूरसेन.**—तें खरेंच. तर मग आतां या विचित्रवीर्याविषयीं इतकेंच—एका इतकेंच.—विचित्रवीर्या, तुला दास्यत्वाची फार आवड आहे. जो सकीचीं लुगडीं धुणारा

तो जयपाळाचीं धोतरें आपटण्यास का मागें पुढें पाहील? तें असो; परंतु आम्हीं तुला तासाची परवानगी देतों. तितक्या काळांत तुझा निश्चय होऊं दे. निश्चय म्हणून इतकाच व्हावयाचा कीं, जयपाळाचा पक्ष धरून यमसदनास जावें किंवा आमच्या बेतांत मिसळून पुढें स्वातंत्र्यसुख भोगण्यास तयार व्हावें. चल आटप. तासावर एक पळसुद्धां मिळणार नाहीं बरें. तुला वाटेल कीं, मजजवळ तरवार आहे; परंतु विचार कर, आम्ही चवघे आहों आणि तूं एकटा आहेस.

**विचित्र.**—( मनांत ) बापड्या जयपाळा, व्याघ्रमुखांत तूं लवकरच पडणार. हे हिंसक लांडगे तुज निर्दोषी कोकराचें थोडक्यांत रक्तपान करणार. आतां असें उपयोगी नाहीं. युक्ति लढविली पाहिजे. ( उघड ) मला तासाची मोकळीक आहेना? आतां त्या तासाच्या आंत जयपाळ आल्यास तो तास भरेपर्यंत त्याला तुम्हीं बोट लावूं नये.

**चित्रसेन.**—हो हो, तें ठीकच. खऱ्या गोष्टीस आडकाठी कोण आणील? तो तास भरे तोंपर्यंत आम्हीं चित्रासारिखे उभे राहतों; आहों या जाग्यावरून हालत सुद्धां नाहीं.

( दुरून जयपाळाचा शब्द ऐकूं येतो. )

**जयपाळ.**—एकून माया पुढें धांवते हें म्हणणें खरें आहे. पुत्रमंडळी जवळ नसल्यामुळें महाराजांची काय दशा झाली आहे! पितृममता कांहीं चमत्कारिकच! हे तरी वेडे शिकारीच्या नादानें बाहेर पडले, ते कोठें गेले त्याचा थांग देखील नाहीं. महाराजांच्या आज्ञेवरून मी

काल दोनप्रहरांपासून या रानांतून त्यांचा शोध करीत फिरत आहें; परंतु आजून माझा प्रयत्न सफळ होत नाहीं. कोठें आहेत कोण जाणे? अरे वा:; तेथें पांच सात पुरुष दिसतात ते तर नसतील ना? हाका मारून पाहाव्या. अरे चित्रसेना! अरे क्रूरसेना! अरे विचित्रवीर्या! अरे कोणीच ओ देत नाहींत. (काहीं मोठ्यानें) दुर्मती, दुर्मती, अरे दुर्मती.

**वीरभद्र.**—अरे, जयपाळाच्या हाकेसारखी हाक ऐकूं आली. ऐका—होय त्याचीच; सावधरे सावध.

**दुर्मति.**—काय जयपाळाची हाक? या रानांत कोठला जयपाळ येईल? जयपाळ खुशाल स्वप्नें सांगत त्या म्हताऱ्याच्या डोळ्यांस पाणी लावीत बसला असेल.

**जयपाळ.**—वीरभद्रा, अरे चित्रसेना, ए दुर्मति, अरे आजून हाक ऐकूं जाईना; विचित्रवीर्या!

**दुर्मति.**—अरे आतां असें नका करूं. कोणी तरी ओ म्हणा. कोणी तरी कशास पाहिजे, मीच म्हणतों.

**जयपाळ.**—अरे हाक द्या; अरे ओ म्हणा; अरे मी जयपाळ. ए दुर्मति; ए चित्रसेना; अरे दुर्मतीरे!

**दुर्मति.**—ओ; अरे ये, जयपाळा, ये; या झाडाखालीं आम्ही आहों, ओ. हाका मारण्याची तर याणें सीमाच केली. आतां सावध असा.—ओ, त्याला अगदीं जवळ येऊं द्या आणि मग पकडा.

**जयपाळ.**—गेली एकदांची हाक ऐकूं गेली. त्या झाडाखालीं थांबले आहेत काय? ठीक आहे त्यांच्या मेळ्याकडे जातों.

(त्यांच्या मेळ्यांत जातो.)

**विचित्रवीर्य.**—मी तासाची मुदत मागून घेतली त्याची आठवण आहेना?

**जयपाळ.**—अरे काय तुम्ही झरकलां! शिकार शिकार म्हणजे किती? कांहीं धोरण असावें कीं नाहीं? घरीं महाराजांची काय स्थिति झाली आहे! उटतां बसतां बोलतां, खातां, पितां तुमची आठवण होते. एक घांस घेतात आणि पोरें रानांत भुकेलीं असतील असें म्हणतात. एक घोट घेतात आणि पोरें तान्हेलीं असतील असें म्हणतात. दरवाजा झांकला असतां कोणीं उघडल्याचा भास होऊन मुलें आलींरे आलीं म्हणतात. देवा, पोरें रानांत सुखी असोत, निर्विघ्नपणें घरीं येओत अशीं वाक्यें तर हजारदां तोंडांतून निघालीं. अखेर तुमच्या शोधार्थ मला पाठविलें. तो मी काल आज दोन दिवस भटकत होतों. चला आतां तरी लवकर जाऊन त्यांची काळजी निवारण करूं.

**मणिपाळ.**—अरे काळजी निवारण करण्यास तूं एकटाच समर्थ होतास मग कां केली नाहींस?

**जयपाळ.**—म्हणजे या बोलण्याचा काय बाबा अर्थ?

**दुर्मति.**—अर्थ इतकाच एकादें स्वप्न पाडायाचें होतें म्हणजे झालें. म्हाताऱ्याच्या सांत्वनास आणखी काय लागत असतें!

**जयपाळ.**—म्हणजे? हें तर पहिल्यापेक्षांही बोलणें गहन.

**दुर्मति.**—अरे हो, हो गहन; दाखवितों आतां कसें तें गहन. जसें तें स्वप्न गहन, तसें हें बोलणें गहन. मणिपाळ, याला धरून ठेव—(विचित्रवीर्यास) काय हो

साधु! तुमचें मन तुम्हांस काय सांगतें? स्वर्गलोकींचा मार्ग धरा म्हणतें कीं मृत्युलोकीं आणखीं कांहीं दिवस वास करा म्हणतें?

**जयपाळ.**—तुमच्या बोलण्याचा रोंख अजून मी ओळखिला नाहीं. आज कांहीं रंग निराळाच दिसतो.

**दुर्मति.**—घटकाभरानें याहीपेक्षां निराळाच दिसेल.

**जयपाळ.**—बाबांनो, हा तुमचा क्रोधाग्नि इतका प्रज्वलित होऊन मज पामराची कां आहुति मागतो? घराहून निघालों तेव्हां असें वाटलें होतें कीं, तुमची गांठ पडली म्हणजे तुम्ही अति प्रेमेंकरून गाढ आलिंगन द्याल; घराकडील क्षेमकुशल पुसाल; महाराज खुशाल आहेत कीं असें म्हणाल; जयपाळा, तूं खुशाल आहेस कीं असें विचाराल; सारांश बाहेरील अनुभविलेल्या सुखाचा कांहीं वांटा मला देऊन आपलें सुख द्विगुणित कराल; अथवा दुःखाचा कांहीं वांटा देऊन आपलें दुःख हलकें कराल. तें सर्व एकीकडेच राहिलें, आणि आज तुम्हीं कांहीं निराळेच बेत करतांसे दिसतें. भगवदिच्छा!!

**दुर्मति.**—भगवदिच्छा नाहीं, दुर्मतीच्छा! समजलास? आतां कांहीं येत असलें तर घे देवाचें नांव; उगाच वेळ नको घालवूं. ज्या वृक्षाच्या मुळ्या खोल जाणार होत्या, ज्या वृक्षाच्या शाखा आसमंताद्भागीं पसणार होत्या, ज्या वृक्षाची दाट पालवी दूरदूरच्या पांथस्थांस या, या, या अशा मधुरवचनांनीं आगतस्वागत देणार होती, ज्या वृक्षाच्या फलपुष्पांचा अमृत-

तुल्य रस सेवन करून सर्व सचेतन विश्व सुख पाव-णार होतें, तो वृक्ष आतां एका क्षणांत समूळ उपटून टाकितों पाहा.

**जयपाळ.**—काय, तर तुम्हीं माझा जीव घेणार ?

**क्रूरसेन.**—काय तूं अजून संशयांतच होतास ?

**जयपाळ.**—जीव घेणार तर घ्या; परंतु इतकेंच कीं, अगोदर माझा गुन्हा माझ्या पदरांत घाला; माझा अन्याय मला दाखवा; मी आपणाकडून तुम्हांशीं वैर-वुद्धीचा लेशही धरीत नसतां तुम्हीं हा प्रसंग मजवर कां आणितां हें सांगा. न जाणून माझ्या हातून कांहीं गैर गोष्ट झाली असल्यास दोन हिताच्या गोष्टी सांगून बुद्धिवाद करणें हा तुमचा अधिकार आहे. मी खचित सांगतों कीं, जाणून वुजून मी तुमचें काडीएवढें देखी-ल वांकडें केलें नाहीं.

**क्रूरसेन.**—अरे भोळ्या भावार्थ्या, काडीएवढें देखी-ल तुमचें वांकडें केलें नाहीं असें म्हणावयास तिळमात्र लाज वाटत नाहीं अॅ ? वांकड्यास शिंगें असतात कायरे ? आमच्याशीं तूं शुद्ध तस्कराप्रमाणें वागलास. लटकींच स्वप्नें, लटकेंच दृष्टांत, लटक्याच गप्पा सांगून पितृममतारूपजीवनाचा सर्व पाट आपल्या इच्छेनुरूप वळवून घेतलास ज्या मेघधारांची सर्वत्र सारखी वृष्टि असावयाची त्या मेघधारांचे लहान साह-न, एवढे तेवढे जसे मिळतील तसे, विंदु जोडून त्यांत-च आम्हांस महालाभ मानावा लागला. आम्हीं काय दासीपुत्र लागलों कायरे, म्हणून हा अपमान साहून उगीच राहूं ? लुबरेपणा करतेवेळीं सुख वाटतें. मग

आतां त्याचें फळ भोगतेवेळीं कां दुःख? पण तुझ्याशीं त्याचा वादविवाद कशास पाहिजे? तुला अखेरचा ठराव सांगतों. आतां आपल्या जीवाची आशा सोड आणि—

( विचित्रवीर्य येतो )

या, हे कोमल अंतःकरणाचे आले.

**विचित्रवीर्य.**—( हंसून ) कांहीं तसें झालें खरें. पाहिलें इकडे तिकडे; पण कांहीं लवकर निश्चयात्मक ठरवावें असें मन घेईना. तो निष्कपटानें बोले हेंही खरें वाटूं लागलें, आणि तुम्हीं म्हणतां हेंही खरें वाटूं लागलें. मागचीं तीर्थाटनेंही लक्षांत येऊं लागलीं आणि पुढची जासुदगिरीही लक्षांत येऊं लागली. असें मन कांहीं गोंधळून गेलें. पण अखेर असा विचार पाहिला कीं, ही वेटी "कांकू" उपयोगी नाहीं. सापाचें पिलूं प्रथम लहान असतें तेव्हां दांत नसतात म्हणून जर म्हटलें, जाऊं द्या कीं, यानें आपलं काय करावयाचं आहे? हं मोठं होईल, याला दांत येतील हें कोणीं पाहिलें आहे? द्या सोडून; कशाला याचा जीव घ्यावा? असें जर म्हटलें तर कसें चालेल?

**क्रूरसेन.**—नाहीं. अरे वेड्या, असें म्हटलें म्हणून तें मोठं व्हावयाचें राहील? त्याला दांत यावयाचे राहतील? तें कांहीं राहावयाचं आहे काय? तें मोठं होऊन, हं, हं, हं आपला गुण करावयाचा तें करीलच. तेव्हां अशा टिकाणीं दया दाखविणें हें मूर्खत्वाचेंच लक्षण. त्याला एकच उपाय, घे मुसळ कीं ठेंच डोकें.

**विचित्रवीर्य.**—तसाच विचार केलाना ? असें पाहिलें कीं हें उपयोगीं नाहीं. बरें उपयोगीं नाहीं तर दुसरा उपाय कोणता ! एक लहान बच्चा असतांनाच त्याची तजवीज करून ठेवावी; नाहीं तर मर्ग—मग बोलून, वडबडून उपयोग नाहीं. मग आपला देवावर हवाला द्यावा.

**दुर्मति.**—असें, असें; याच्या आणि त्याच्या मध्यें कांहीं जागा आहे काय ? हेंच; आम्हीं पहिल्यापासून पाहात होतों तें हेंच. एक त्याच्या वर तरी बेतली पाहिजे, नाहीं तर आमच्या वर तरी बेतली पाहिजे, तेव्हां मग?

**विचित्रवीर्य.**—असाच विचार करून पाहून ठरविलें कीं, तुमच्याच बेतांत शिरावें. पण एक आतां आं ? तुमच्यांत तर आलोंच; परंतु तुम्ही हंसा किंवा कांहीं करा ! प्रत्यक्ष मारणें म्हणजे कसेंसेंच वाटतें. याकरितां असें करूं कीं त्याचा पर्यायानें जीव घेऊं.

**चित्रसेन.**—हं; हें एकशेपूट निघालें पाहा. पर्यायानें जीव घेऊं म्हणजे ?

**विचित्रवीर्य.**—म्हणजे, जीव तर घ्यावयाचाच; परंतु पर्यायानें घ्यावयाचा. लागलीच तरवार उरांत खुपसून तांबडी लाल करावयाची नाहीं; तर कांहीं पर्याय करावयाचा. तुम्ही सर्व जर ऐकूं असें म्हणाल तर पर्याय कोणता तो सांगतों. परंतु पर्याय करावा हें चांगलें.

**क्रूरसेन.**—येऊंद्या एकदां, काय पर्याय, पर्याय मघापासून चालला आहे तो येऊं द्या. ' अगोदर बोलबोलूनच पुरे केलें आहेस.

**विचित्रवीर्य.**—बोलूं ? दिलें मला ?

**दुर्मति.**—दिलें, दिलें, दिलें. आतां काय म्हणतोस आणखीं? एकदां बोल काय तें म्हणजे मिळविलें आम्हीं.

**विचित्रवीर्य.**—बोलतों तर ऐका; कोणी कडून तरी याचा जीव घ्यावयाचा कीं नाहीं ? मग तरवारीच कशाला पाहिजेत ?

**चित्रसेन.**—हो, तरवारीचें काय काम ? त्याशिवाय होत असलें तर बरेंच आहे.

**विचित्रवीर्य.**—ठीक ठीक. माझें असें म्हणणें कीं, करून सवरून नामानिराळें राहाण्यास जर जागा मिळत असली तर कां सोडा ?

**चित्रसेन.**—हो, मग तर फारच चांगलें.

**विचित्रवीर्य.**—तेव्हां असें; या येथें पर्याय करावयाचा. मिळून अर्थ एकच; आम्ही नाहीं आमच्या हातानें केलें म्हणायाचें; इतक्याच तोडींतलें आहे. परंतु आहे. पर्याय आहे. या दाट वनांत आपण वांकडेतिकडे फिरत आलों तेव्हां आपणास खोल गुहा किती दिसल्या ?

**क्रूरसेन.**—बरें दिसल्या दोन तीन, मग ?

**विचित्रवीर्य.**—त्यांतली एक शोधून काढून त्यांत ह्या स्वारीला अडकवून बाहेरून मला पांच दहा माणसांना न उचले असा दगड देऊं तोडाशीं बसवून. आंत खायाला काय घणघणघंटा. आपसुकाच काम होतें आहे. शिवाय आपण त्याच्या अंगाला बोट लावलें नाहीं अशी शपथ घ्यावयास मोकळे ते मोकळे.

**दुर्मति.**—आणि कोणी येऊन त्याला काढलें तर ?

**विचित्रवीर्य.**—काय विचित्रच आशंका ! या रानांत कधीं कोणी आलेलें ऐकिलें आहे तरी ! त्या गुहा काय वाटेंत आहेत ? आपण हरहमेशा येणार तरी आपणाला सुद्धां सांपडायाला महा प्रयास पडतात. तर मग म्हणे कोणी आलें तर? हें काय शुष्क बोलणें?

**दुर्मति.**—पण त्याचा काय नेम आहे ? वेळ आहे; आलेंच तसें कोणी तर !

**विचित्रवीर्य.**—ठीक ठीक. आणि हे वृक्षच खालीं उपटून पडले तर ! ही भुईच खालीं बसली तर ! हें आभाळच खालीं गडगडून आलें तर ! सारांश इतका दिसतो कीं, मी काढीन तजवीज ती कशीही असली तरी तुम्हांला म्हणून पसंत व्हावयाची नाहीं. मी आपला इतका दुराग्रह सोडून तुमच्यांत येऊन मिसळलों तरी तुमच्यानें माझ्याकरितां इतकेंसें सुद्धां करवेना ! त्यांत "तुला दिलें, दिलें, दिलें" असा त्रिवार उच्चार केला असतां हें सुक्षत्रियाचें लक्षण नव्हे. देव कधीं अशाला साहाय्य व्हावयाचा नाहीं. या लढा तर, माझ्याशींच पूर्वी लढा. पाहिजे कशाला ? (तरवार उपसतो.)

**चित्रसेन.**—पहिले पाढे पढ पंचावन्न. हें आलें पूर्वीच्या थराला. दादा, आतां आग्रह सोडाना बरें ! तो म्हणतो तें कांहीं गैरशिस्त नाहीं. तो आपलें सर्व ऐकतो तेव्हां त्याचें एवढें तरी ऐकिलें पाहिजे. अर्थ दोहोंचाही एकच आहे.

**दुर्मति.**—बरें तर बाबा होऊंद्या. एकच खरें; परंतु—तुमच्या कोणाच्या लक्षांत येत नाहीं. नाहींरे नाहीं.

**चित्रसेन.**—आतां "परंतु" नको. झालें बाबा, तूं म्हणतोस तसेंच; चला घेऊन आतां या बंदिवानाला.

**जयपाळ.**—चला मी हा तयार आहें. केव्हां तरी जायाचेंच. येथें अक्षय्य राहण्यास तर कोणीच आला नाहीं; परंतु सांगून ठेवितों, तुमच्या कर्माचीं फळें तुम्ही भोगाल. सर्वांचा शास्ता कधीं झोंपीं गेलेला नसतो. ह्या प्रसंगीं तो तुमचें व माझें दोघांचेंही सत्व पाहतो आहे. अखेर न्याय तो करीलच करील.

**दुर्मति.**—तें खरें; पण तुम्ही चला आतां अगोदर. ब्रह्मज्ञान ब्रह्मगुहेंत. येथें कशाला ?

**जयपाळ.**—बरें तसेंच कां होईना ! चला.

**विचित्रवीर्य.**—(मनांत) ह्या गुहेंत जाण्याच्या येण्याच्या शंभर वाटा मला ठाऊक आहेत.

(सर्व निघून जातात.)

---

## प्रवेश २.

( स्थल ) गुहेच्या आसपासची जागा.

**सुभाना, मनू व माणकू.**

**सुभाना.**—काय व मनवा ! थू तिच्या, काय मागमूसबी लागना ! आब कुनिकड आलो तरी कुनिकड. सोरीबी तिकड ऱ्हायलो, बाइसाबबी तिकड ऱ्हायल्या, सातसाबबी तिकडच, नानासाबबी तिकडच आपुनच कुनिकड निसाटलों !

**मनू.**—काय सांगाव राव भ्योग आपला. चालता चालता तर बगा याड निगालं. कुट आडरानामंदी

गवासली आन काय कारखाना होऊन वसलाया—मानकुवा, तुमी त वा लईच मोन धरलनी.

**माणकू.**—तुमी हा खुसमोजी मनवा. आव मोन कशाच ? हित आलाया कंटाशी परान. मंटा वर्मगिन्यानी आला म्हगून हित मोन धरल्या विगार काय संक करील ? नीट हिगड ध्यान द्या अं. काल धरूनशेनी ह्ये वंदुकिच वज, ह्ये तलवारीच वज, ह्ये ढालीच वज इक्त झाडून समद ध्येवूनशेनी घालघिरटी, घालघिरटी, घालघिरटी चाल्लया. त्येतून तोंडवल कराया भाकरीचा तुकडादिकून न्हाई वगा. काय भ्वोग सांगावा !

**सुभाना.**—आव लग्नाच्या पोळ्या निचारल्यात! अस काय म्हंगता—वगा मनवा, दिसाया वगा कस ह्येपुसलिंग दिसत! पर जवाका मरद वसला व्हता मांडी घालूनशेनी तवा काय राव पुसता ! वाडप्यास्नी ज्येरीज्येरीला आनलनी! मानकुवा, काय साद हाय ता म्हंगता!

**माणकू.**—न्हानपनापास्न वगा आपुनला दगदग मजी काय त्येची आजतल्लक म्हायती, न्हवती. ( डचकून )—दगा व दगा! सुवानवा परसंग नीट न्हाई व न्हाई—ऐका व मनवा; यट्टा मजी किती ? सुवानवा, कान देऊनशेनी वगा वर !

**सुभाना.**—व्हय, खर व खर मनवा. निगाया म्होरूत लई वंगाळ लागला—हित च्येष्टा हाय.

**माणकू.**—आता व सुवानवा ! मनवा आतां! तुमच्या गळ्याच्यान व मनवा आपुन कंदि कंदी भाइर निगालो न्हाई. समद्यामंदी नांव इक्त वगा आपनाला

ठाव. आन कुनिकड आज भ्योग आला आन हित पडलो. ह्यो अचानक घाला वगा कसा हाय!

**सुभाना.**—मनवा, शबुद ऐकला काय? तुमी काइबी म्हना, पर आपला दिकून जीव धाकधुक करतोया.

**माणकू.**—वायकापोरामंदी धड जाऊनशेनी पडन जरूर वगा.

**मनू.**—अर काय विटद्यानो याडविड लागलया तुमाला! सुबानबा, तुमीबी राव ढिल्याबानीच करि-तानी!—कायर मानक्या, नावच विटद्या ग्वाड! लट-लटा कापतोस काय! झाडाआड लपतोस काय!—आर तुमी आमी आलो तसच आनिक कुनी येऊन बसलाया व्हं व्हं करीत, अन हाय काय? चला व सुबा-नबा सोद घेऊ.

**माणकू.**—आपुन न्हाइबा. उग दोन पावल लांब हाय त्येबी म्हन आनिक, तर!

**मनू.**—या येळस जर हिंग तिंग केलस तर वग माज्याशी गाट हाय! सांगतो. गचर न गचर चारीत न्हेईन. ढिल ल्येकाच्याच!—चला व सुबानबा.

**सुभाना.**—चला चला. आपुन तयारच हाऊत.

(गुहेच्या तोंडाशीं जातात.)

**जयपाळ.**—भगवंता तुझ्या इच्छेनें सर्व गोष्टी होतात, मग याची भीति कशाला पाहिजे.—अरे मी इतकें आर्जव करीत असतां त्यांना कधीं खाईनसें झालें.

**माणकू.**—मनवा कान द्या. "कंदी खाइनस झाल हाय" म्हंगतो. आव न्हव व न्हव. आत लागल्यात भांडन. येक म्हंगतो मी खाईन, दुसरा म्हंगतो मी

खाईन, तिसरा म्हंगतो मी खाईन. चला बा हात जोडतो, मनवा चला. उग हित चटनीवानी सुवानबा, जात्र लागल बगा. विर्मराक्ससाची जागा मनवा हाय; नगा वाट जाऊ.

**मनू**.—थू ल्येका रडद्या.—कोनर कोन? तुला रामचंद्रजीची आन हाय, गायत्रीची आन हाय, वामनाची आन हाय, बोल तू कोन.—सादा मानुस असलास न्हिग भाइर तुला काडतो. ब्रिमराक्सस असलास तर आलोया तुज्या घरा; काय करन ते कर.

**जयपाळ**.—अरे दयावान पुरुषा, भूत, पिशाच व राक्षस ही भीति मनांत बाळगू नको. मी तुझ्यासारखाच माणूस आहें. कांहीं मागील जन्मांतील पापाची फेड करावयाची असेल म्हणून हें अयोग्य कारागृह दुर्दैवेंकरून मला प्राप्त झालें आहे.

**मनू**.—मानुस हाइस तू?

**जयपाळ**.—निभ्रांत माणूस आहें.

**मनू**.—हित वामन न्हाई; न्हाइ तर त्येची कां गायत्री दावली असती मजी आपसुक कळत.—आर आतल्या हिड बग. गायत्री म्हन गायत्री.

**जयपाळ**.—अरे तूं संशय सोड. मी पिशाच नाहीं. गायत्री म्हणूं? गायत्री.

**मनू**.—बर हाय, राम म्हन.

**जयपाळ**.—(हसून) राम.

**मनू**.—तीनदा म्हन तीनदा; राम, राम, राम.

**जयपाळ**.—राम, राम, राम.

**मनू**.—कायर बिटद्या मानक्या, च्येस्टा असती तर

राम राम असा सबद निगता? थु येडचा; बग तिकून वाट हाय का. सुबानबा, तुमी हिगड बगा. मी हिकड पातो.–(कांहीं वेळानें) ह्ये हिगड बीळ गवासल बगा. ह्यो बगा कसा रांगत जायाचा मारग हाय.–क्रायर आतल्या?

**जयपाळ.**–काय म्हणतोस बाबा?

**मनू.**–ह्ये हिगड मी कुट हाय न्हायी हिगड; आन बग आसच चासप! मजी बग वर हातभर रुंदीच बीळ हाय. त्येतून निसाट. आंग काडीत काडीत पे भाईर.

**जयपाळ.**–(तसें करून बाहेर येऊन) हे सत्पुरुषा, माझी एक विनंती ऐक.

**मनू.**–क्रायर वा इनंती तुजी?

**जयपाळ.**–मी आपल्याला आजपासून तुझा दास समजतों. जिकडे तूं तिकडे मी.

**मनू.**–दास मंजी चाकर न्हव काय? नगर वा मला कशाला चाकर व्हावा! मी बग धा शिपायांचा नाईक. येक होर दरमा हाय. बायको ती आपली दळतिया कांडतिया; कोरड्यास बि करते, मला वि घालते, आपुन बी खाते, पोरास्नी बी उल उलस देते; हं. चाललाया संसार. संसार कुट व्हातो. मीर काय करू चाकराला–पर बग तु गुनी दिसतोस. चल मजी बरोबर भाऊ म्हनून. खाईन मी भाकर त्येतली देईन तुला बी जराशी. आमचें सरकार हायता सेनापति. बाइसाब बी लई चकोट हायता; करतिला तुजी कुट तरी सोय.

**जयपाळ.**—(मनांत) शूद्रजातीचा असून काय सरळ भाव व काय थोरवी! देवा, हे उपकार फेडीव.

(सर्व निघून जातात.)

---

# अंक २

## प्रवेश १.

**कमळजाबाई, सारजा आणि एक पदरची म्हातारी.**

**कमळजाबाई.**—सारजे, अशी ये. अगवाई शिवशील तूं. तुळशीला पाणी आझून घालायाचें आहे—पदर आटप.

**सारजा.**—काय सांगूं बाईसाहेब! तुम्हांला वाटेल तोंडदेखणी बोलते. ही सारजा तोंडदेखणी बोलायाची नाहीं. काय म्हणत होतें—बाईसाहेब, ऐश्वर्याची कांतीच निराळी. ती लप म्हटल्यानें लपायाची नाहीं. लग्नाच्या आधींही तुम्हांला पाहिलें होतें आणि आतांही पाहात्यें; पण हा रंग कांहीं बाई तेव्हां नव्हता. आतां दिसतां जशी कांहीं बिनली एकादी.

**कमळजाबाई.**—काय मेली गोडबोली! आतां काय जास्त झालेंग?

**सारजा.**—जास्तीवर काय आहे! इथे दागिने घालतां तिथेही घालीत होतां. पण असें कां म्हणतां? अधिकाराचें तेजच निराळें. आतां कशी घराची भरली लक्ष्मी दिसतां.

**कमळजाबाई.**—आणि लहानपणीं कशी दिसत होत्यें ग?

**सारजा.**—नाहीं, लहानपणींही दिसत होतां—अहो, माणिक कोठेंही पडलें, कसेंही पडलें, म्हणून बाईसाहेब, तेज लपायाचें आहे काय ? तें नाहींच. पण कांहीं म्हणा, आतांची तजेली जास्त—(हांसून) पण बाई लहानपणची अशी मौज तुमची ! आम्हांला हसहसून बेजार करावें. तुम्ही एवढिशीं होतां तेंव्हांपासून आईसाहेबांनीं माझ्याच गळ्यांत बांधलीं. काय सांगूं तेंव्हांची मौज ! तुम्हांला कशाची आठवण असायाची आहे.—भारी, भारी मौज.

**कमळजा.**—ती कशी ग ? मेलें लहानपण कसें तेंव्हांच गेलें.

**सारजा.**—एक दिवस ज्या बाई हट्ट धरून बसलां—त्या हट्टाला नांवना गांव—थोरल्या दादासाहेबांचा सोहाळा व्हावयाचा होता; ते भरजरी पीतांबर नेसले होते, आणि गद्राबाई भरजरी शालू नेसली होती—गद्राबाई तरी मोठी खुटखुटीत बायको दिसते—आणि दोघें बाई चवरंगावर जवळजवळ बसलीं; आणि मार मोठ्या मोठ्या ब्राह्मणांचा थाट बसला; पलीकडे गद्राबाईच्या माहेरचा अहेर येऊन पडला; आणि इकडले तिकडले अहेर येऊन पडले; आणि मार बाई कचेरीचा थाट बसला; आणि वाजंत्रें वाजायाला लागलीं; आणि मार गर्दी उसळली; इकडे बाई तुमचें धूम रडें चाललें असे. रडरडून डोळ्यांचीं मुटकुळीं वळलीं. दुसरें कांहीं नाहीं, एकदां मला गद्राबाईसारखें नेसवा, मला गद्राबाईसारखें बसवा, गद्राबाईलाच बसवावें वाटतें. हें एकसारिखें चाललें होतें. आणि बाई रात्रीं तीं दाद-

लावा यको खोलींत चालली आणि मग तर रडरडून गरगट केलें. आम्हीं सगळीं हांसहांस हांसलों.

**कमळजा.**—हेंग काय मेलें—मी म्हटलें एखादी चांगली गोष्ट सांगशील; सारजे, आतां पुरे कर ह्या गोष्टी. तुला कशाला बोलावून आणिलें समजलीस ?

**सारजा.**—कशाला बाईसाहेब ?

**कमळजा.**—अगदीं मेलें वेड्याचेंच सोंग घेतेस ! काय करूं, कसें तरी सांगूंग, आतां !

**सारजा.**—तुम्हांला एकच सांगून ठेवतें बाई. ही सारजा इतर गांवगुंड बायकांसारिखी नाहीं. लोकांची चाकरी करिते हें नका सांगूं. दैव कांहीं बाई कोणाच्या स्वाधीन नसतें. आज मेली भरभर असते, आणि उद्यां पाहावें तों कांहीं नाहीं. तें कांहीं कोणाच्या स्वाधीन नसतें. पण माझा आपला मी स्वभाव सांगतें. केव्हां झालें तरी काय, आपलें ऐकून घ्यावें. झालें आपल्या हातून काम, तर करावें—नाहीं तर पोटांत घालून ठेवावें. तरीबोचिप्प आणि मेरीबोचिप्प.

**कमळजा.**—(मुद्रा बदलून) सारजे, कायग तुला सांगूं ! माझ्या मनांतली गोष्ट; अग, मनालाच सांगूं नये असें वाटतें. सारजे, लहानपणापासून तुजजवळ हितगुजाच्या गोष्टी बोललें. खरेंच सांग, आतां मी सांगतें हें कुठेंकुठें बोलणार नाहींसना ?

**सारजा.**—बाई मला मघापासून चमत्कार वाटतो. आज मी थोडी फार बारा आणि बारा चोवीस, आणि त्यापूर्वी तीन, अशीं सत्तावीस वर्षे तुमच्या आईजवळ घालविलीं. मेला पुरुष असता तर दाढीमिशी पिकली

म्हणतो. सत्तावीस वर्षें त्यांच्यापाशीं घालविलीं, पण त्यांणीं कधीं संशयाचा चकारशब्द देखील काढिला नाहीं—तुम्ही मन मोकळें करून मशीं बोला. या सारजेच्या तोंडांतून जर ब्र निघाला, तर फार काय सांगूं ही जीभ तुमची.

**कमळजाबाई.**—हें खरेंना पण? मी तुझा संशय घेतें असें वाटूं देऊं नको. पण बाई! माझी मीच लाजतें. काय करूंग एरवीं हा मेला जीव जाता तरी बोलतेंना; पण काय करूं, निरुपाय झाला आहे.

**सारजा.**—बाई, बाई, बाई, बाई, तुमच्या संशयाची तर पराकाष्ठाच झाली.

**कमळजाबाई.**—तसें नको ग मनांत आणूं. बोलतें तर आतां. परवां वाघावर शिकार केली, ती तूं नव्हतीस पाहायास.

**सारजा.**—आमच्या कपाळीं हें घर लागलें आहेना बाई. म्हाताऱ्या माणसांना कांहीं पाहावें लागत नाहीं.

**कमळजाबाई.**—त्या दिवशींचा चमत्कार पाहून हें मन, काय ग, तूं पाणचट म्हणशील.

**सारजा.**—हं, पुढें; अडूं नका.

**कमळजाबाई.**—आतां करतें मन मोकळें तर. त्या दिवशीं त्या पटांगणांत माझें मन जें उडून गेलें आहे तें अजून परत आलें नाहीं. काय करूं, कांहीं उपाय सांग.

**सारजा.**—(हांसून) बाई उडालेला पदार्थ कोठें तरी पडतो. तुमचें मन जें उडालें तें कोठें जाऊन पडलें तें सांगा म्हणजे मग उपायाची योजना मी करितें.

**कमळजाबाई.**—काय ग मेलें, तूं भलत्याचा भलताच अर्थ करितेस ! असा बाई अर्थाचा अनर्थ नको करूं.

**सारजा.**—आम्हांला आपला भलत्याचा भलता अर्थ चालतो—काय तरी सांग ! तुमच्या माहेरीं आलें त्याच्या अगोदर,—तेथून निघालें ती तुमच्या माहेरींच आलें—त्या मुक्ताबाई सिलेदारिणीजवळ होतें. तिला हें असलें वेड भारी असे. ( हळूच ) नवऱ्यानें सदा स्वारींत असावं; कधीं साचार महिन्यांनीं तो घरीं येणार. मग तिनं मला कामगिरी सांगावी. पण आजपर्यंत हरा, शिवा, केशवा, ही गोष्ट माझ्या ( वेणीजवळ हात नेऊन ) येथें जी एकदां घातली आहे ( कंठावर हात ठेवून ) ती एथें काढिली नाहीं. आज आपला तसाच प्रसंग आला म्हणून आणि तें तुमच्याच पाशीं म्हणून. कां, म्हातारपणीं हे चाळे कशाला पाहिजेत? एथें बोल, तेथें बोल, तेथें बोल, याशिवाय काय अडलें आहे?

**कमळजाबाई.**—मेल्या मना, हो निर्लज्ज. सारजे, त्या पटांगणांत वाघावर प्रथम पांचपंचवीस सरदार एकदम चाल करून गेले; राणीसाहेब, मी, प्रधानजीची बायको, साळुंक्यांची मुलगी प्रभावती आणि निराबाई सरसुभेदारीण अशा मागच्या बाजूस मौज पाहण्यास उभ्या होतों. आणि बाई जेव्हां वाघाचीं डुरकावणीं आणि त्यांच्या अरोळ्या ऐकिल्या, तेव्हां झालों आम्ही गर्भगळीत; लागलों बाई एकीमेकीच्या तोंडाकडे टकमक पाहायाला. इतक्यांत आमच्या

संरक्षणास जे पांचपंचवीस होते त्यांना त्यांणीं आरोळी ठोकिली. "अरे वाघ चक्कर घालीत तुमच्याकडे उलटला, तिकडून पुढें व्हा. वायकांवर प्रसंग गुदरेलरे गुदरेल." या आरोळीबरोबर पुढें जे सरसावले त्यांत, माझा—आमचा जयपाळही सरसावला. सारजे त्या दिवसाचा त्याचा पराक्रम काय सांगूं! तिकडून हां, हां, हां, जों म्हणतात, अरे वाघा ग्रासल्या, धांवा, धांवा, ही आरोळी संपते, जों तोंच इकडे शावास, शावास, शाबास, जयपाळानें राहुरुप्याचा नाश करून चंद्राननांस सोडविलें असा शब्द होऊं लागला.

**सारजा.**—बाई! आपला हा जयपाळ!! काय म्हणतां हा, हा जयपाळ!!! असें बाई, एकएक झांकलें माणिक असतें वरें!

**कमळजाबाई.**—अग, सगळ्या गांवभर आज तें गाजतें, आणि तुला ठाऊक नाहीं म्हणतेस? तूं तरी भारीग बाई वेड्याचें सोंग घेणारी!

**सारजा.**—आमच्या कशानें बाई कानीं येणार? आम्हांला काय बाहेर जायाचें, कां कोठें हिंडायाचें, कां कोठें जाऊन बसायाचें, कां कोठें पाहायाचें; आम्हांला काय करायाचें वरें? कोणी आई बाई बोलली तर ऐकायाचें, इतकेंच कीं नाहीं? तें कांहीं बाई कोणीं बोललेंच नाहीं, मग कशानें समजावें? मग पण पुढें काय?

**कमळजाबाई.**—अंतच पाहायाला बसलीस सारजे? अग, असा त्या दिवशींचा चमत्कार पाहून ह्या वेड्या मनानें धांव घेतली. ज्या दिवशीं घरीं आणून जमाखर्चीचें काम त्याला सांगितलें, त्याचदिवशीं त्याच्या

कामदेवासारख्या सुंदर स्वरूपानें नेत्रद्वारें माझ्या चित्ताची ओळख करून घेतली. ती दृढतर होतहोतीच, तथापि सारजे, त्या दिवसापर्यंत मी माझ्या वासनेस विचारस्तंभाशीं बांधून टाकिलें होतें. त्या दिवशीं जयपाळाच्या तरवारीनें व्याघ्राचें गर्दन उडविलें नाहीं, तर त्याच्या साहसानें तो विचारस्तंभ बुडाशीं तोडून माझ्या वासनेस मोकळें केलें. सारजे, तूं शहाणी आहेस यापेक्षां काय फोडून सांगूं?

**सारजा.**—बाईसाहेब, तुम्हीं कांहीं काळजी करूं नका. सांगितलें काम जर होईना, तर बाई सारजा कशाची?

**कमळजाबाई.**—मी फार बोललें. स्त्रीजातीला फार बोलणें शोभत नाहीं. परंतु बाई आंत जे कढ येताहेत ते साहवत नाहींत. पाहा बरें, सारजे; कोठें तरी शब्द काढशील बरें.

**सारजा.**—आतां बाई माझें बोलणेंच थकलें. हा संशयच वाईट. या सारजेविषयीं अजून खात्री होत नाहीं.

**कमळजाबाई.**—नाहींग, पण आपलें उगीच सांगितलें. जा आतां ( जाते ).

---

## प्रवेश २.

### जयपाळ पुढें वही घेऊन बसला आहे.

**जयपाळ.**—सात आण्यांची चूक अं! कोठें विसर पडला तरी पण चूक कां लागावी! पण कां लागावी

चूक! पांचहजार नव्वद ते! ती दोनहजरांची रक्कम तर निराळीच आहे. चारशें साडेसत्याहात्तर तिकडचे. नऊ रुपये बारा आणे अवांतर. एकंदर जमा सातहजार पांचशें सवासत्याहात्तर रुपये. आतां खर्च साडेपंचे-चाळीस रुपये आणि घटकाभर हे नऊ आणे. एकहजार नऊशें ही तर अलाहिदा हुंडीच पाठविली. सात आणे तर त्या ह्याला दिले. बाकी पांचहजार सहाशें सवाएकतीस रुपये. तें सर्व ठीक आहे. या सातांचा ठिकाण नाहीं. काय झाले, कां कोणी नेले, कां हरवले, कां खिशांतून गळाले, कसें काय झालें कोण जाणे? या, सारजाबाई, बऱ्या वेळेवर आलां.

( सारजा येऊन बसते. )

**सारजा.**—अग बया, बया! जयपाळा, तुझें अजून काम चाललें आहे! पुरे, काय तूं तरी सोंग करितोस. ऊर फुटे तोंपर्यंत कोठें काम बोललें आहे! काय मेलीं लोक कामें करितात कीं नाहीं. ऊठ, ठेव वही एकीकडे. बाबा, सगळें नेमस्त असावें. परदेशांत आपलें आपणाला जपावें. ऊठ, या सारजेचें तूं एक एक ऐकत जा. ही तुझ्या कल्याणाचीच गोष्ट सांगेल बरें, ठाऊक असूं दे.

**जयपाळ.**—तें खरेंच; पण सारजाबाई, कांहीं उपाय नाहींसें झालें आहे.

**सारजा.**—अरे, हो; वयच तें तुझें तसें, त्याला तुझा काय उपाय! जें आहे तें ठीक आहे.

**जयपाळ.**—वयाचा काय संबंध हो? वयाचें काय आहे? हें काम मोठ्या जिकिरीचें.

**सारजा.**—जिकिरीचें तर, (हंसून) जिकिरीशि॰ वाय मनोगत कसें सिद्धीस जातें ? बरें तें असो; परंतु जयपाळा, तुला मी आल्या दिवसापासून पाहातें. आतां खरें सांग—बाबा मी पडलें म्हातारी; आणि आपला माझा स्वभाव सांगतें तुझ्यासारखीं परदेशी लेकरें अशीं अनाथासारखीं दिसूं लागलीं, म्हणजे आपलें त्यांना जाऊन बरें वाईट विचारावें; त्यांचा समाचार घ्यावा; औषधपाणी कांहीं करून द्यावें; दोन तडजोडीच्या गोष्टी सांगाव्या. कां, अरे तुमचें कोणरे या परदे॰ शांत आहे ? जयपाळा, असें नाहीं, असें कर, असें कोणी म्हणायाला आहे काय ? म्हणून मेला जीव ओढतो. आणि त्यांत तुझी सौम्य वृत्ति पाहून तर फारच. असें कां ह्मणतोस, स्वभावांत स्वभावांत तफावत असते. तो मेला मध्यें एक टेंबिला होता अल्लेराव; त्याच्याकडे नाहीं माझें चित्त लागलें; नाहीं, नाहीं तें नाहींच नाहीं.

**जयपाळ.**—काय, सारजाबाई, तुम्हीं आल्या दिवसा॰ पासून काय पाहातां ?

**सारजा.**—पाहायाचें काय ? अरे, तुझ्यावर कांहीं निमित्त व्यायाचें आहे ? तूं बावगा असशील तर तुझें वेडें वांकडें पाहायाचें ! पाहतें मिळून इतकें, कीं तुझ्या तोंडावर दिवसेंदिवस जास्ती ग्लानि दिसते. तुझें चित्त कसें उद्विग्न दिसतें. केव्हां केव्हां तूं असे सुस्कारे टाकतोस कीं, कोणी म्हणेल तुझ्या ऱ्हदयांत सहस्र शल्यें सलताहेत. जयपाळा, उगाच नको चोरूं. कांहीं तरी ऱ्हद्रोगानें तूं झुरत आहेस. काय जें असेल तें मजजवळ बोल. हें पाहा, कांहीं तूं बोल-

लास, तरी बाहेर फुटण्याची शंका धरूं नको. मी एकदां गोष्ट पोटांत घातली, म्हणजे ब्रह्मयानें प्रयत्न केला तरी बाहेर पडायाची नाहीं, मग इतरांची काय कथा! आणखीं सांगतें, तुला ही व्यथा होऊन फार दिवस झाले नाहींत. ऐकून घे माझें तूं; हो, ही सारजा आहे.

**जयपाळ.**—सारजाबाई, तुम्हीं ओळखलें खरें; माझें चित्त उदास आहे; परंतु ही आज काळची स्थिति नाहीं. मी आल्या दिवसापासून असाच आहे.

**सारजा.**—(हांसून) तें खरें, तें समजलें; पण बाबा, परदेशांत आपला आपण विवेक करावा. नाहीं तर माझ्यासारिख्या म्हातारीला मन मोकळें करून दुःख सांगावें. हा मेला कुढेपणा कांहीं सुख द्यावयाचा नाहीं बरें, ठाऊक असूंदे तुला. म्हाताऱ्या माणसाचें तुला सांगतें एक एक ऐकत जावें. तूं असा कोणत्या संकटांत आहेस मला सांग, आणि या सारजेचा अनुभव तर पाहा!

**जयपाळ.**—माझें दुःख सांगून उपयोग नाहीं; त्याला या जगांत उपाय सांपडणार नाहीं. सारजाबाई, उगाच कशाला आग्रह करितां?

**सारजा.**—अरे, समजलें जयपाळा, पुरे; आणखी काय सांगशील तूं? खरेंच, तुझ्या सारख्याला सांगणें कठिण खरेंच. पण ही सारजा सुतानें स्वर्ग गांठणारी. त्याची इतकी काळजी कशाला पाहिजे? तुझ्या मनोगतासारखें झालें म्हणजे झालें कीं नाहीं?

**जयपाळ.**—सारजाबाई, तुम्हीं काय म्हणतां कोण

जाणें. माझ्या मनोगतासारिखें करणें तुमच्या हातीं कसें आहे ? छे, छे, तुमचा कांहीं मलताच समज पडला असेल नाहीं तर–

**सारजा.**–अरे मी सुइण, मला फसवायाला कशाचें पाहातोस तूं ? बरी आठवण झाली; जयपाळा, सरकार कोणीकडे गेले आहेतरे ? रोज कागदपत्रें येत असतील तेव्हां तुला वित्तंबात वातमी असेल.

**जयपाळ.**–सरकारांना वाड्यांतून आज्ञापत्र आलें होतें, त्याप्रमाणें ते गेले आहेत. कांहीं मांडलिक राजांचा करभार थकला आहे, त्याचा उलगडा करून घेण्यासाठीं मुतालिक नेमून छत्रपतींनीं त्यांस पाठविलें आहे.

**सारजा.**–असें काय! अरे, सरकार तिकडे गेल्यावर बाईसाहेबांच्या भेटीला तूं गेला होतास ?

**जयपाळ.**–कां बरें, सारजाई, तुम्हांला असें वाटतें कीं, मी दर्शन घेतल्याशिवाय राहतों ? माझ्या अन्नदात्या त्या, हें मी आजन्मांत विसरणार नाहीं बरें.

**सारजा.**–खरें आहे बाबा. विसरून कसें होईल. देवाच्या इथें झडती आहेना! आपण माणसांनीं विसरून काय होतें ? बरें, तूं रोज दर्शनाला जातोस तेव्हां आतां तुझ्याही ध्यानांत आलें असेल. बाईसाहेबांची वृत्ति भारी पालटलेली दिसते, नाहीं ? अरे, काय सांगूं ? निजल्या ठिकाणच्या उठत सुद्धां नाहींत. निजल्या निजल्या हळूच आरशाकडे दृष्टि फेंकितात; तीच दृष्टि आपल्या शरीराकडे वळवितात. लागलीच उसासा टाकितात. लागलीच अनाथासारिखें तोंड

करून पलंगावर आंग टाकून देतात. आजच्या साऱ्या दिवसांत पन्नास सुद्धां शब्द तोंडांतून निघाले नसतील. घासभरसुद्धां अन्न पोटांत गेलें नसेल. जयपाळा, खरें म्हणशील तर, त्यांची अशी उत्साहरहित प्रकृति पाहून मला बाबा रडूं येतें. असें कां म्हणतोस, कसेंही झालें, तरी आज शें पन्नास मनुष्यांचें त्यांच्या पदरीं अन्न आहे.

**जयपाळ.**—सरकारच्या जाण्यानें इतकी बाईसाहेबांना व्यथा झाली काय ? सारजा बाई, येथें राहिल्या दिवसापासून मला वाटत होतें कीं, आमच्या यजमानयजमानणीची जशी परस्पर प्रीति आहे तशी थोड्यांची; आणि आज तुम्हीं सांगतां यावरून तर खात्रीच झाली.

**सारजा.**—(हंसून) जयपाळा, हा एवढा प्रीतीचा बलवत्तर ओघ अशा रमणीय स्थानापासून ज्या प्रदेशीं वाहतो, त्या प्रदेशाचें काय भाग्य वर्णावें !

**जयपाळ.**—त्यांत काय संशय ? आपले यजमान भाग्यशालीच खरे.

**सारजा.**—परंतु बाबा, कितीएक पुरुष असे असतात कीं, तें भाग्य त्यांजकडे उडी घेत असतां त्यांस दिसत नाहीं. बरं जयपाळा, खरेंच सांग; आपल्या स्वामिणीसारख्या कोण्या रूपवतीचें तुझ्या ठिकाणीं जर चित्त जडलें असलें, ती जर तुजकरितां झुरत असली, तुजकरितां आरशांत पाहात असली, तुजकरितां आपलें शरीर न्याहाळीत असली, तुजकरितां ग्लानि पावत असली, तुजकरितां मौन धारण करीत असली, तुजकरितां अन्नत्याग करीत असली, थोडक्यांत सांगतें तुझ्या

संयोगार्थ शतावधि नवस करीत असली, तर तूं कसें करिशील ?

**जयपाळ.**—सारजाबाई तुम्हीं आज फारशी थट्टा काय मांडिली ?

**सारजा.**—नाहीं, पण उगीच विचारितें. (हंसून) तिच्या म्लान मुखाकडे हास्यवदन करून पाहशील कीं नाहीं ? तिच्या स्फुरण पावलेल्या अधराचें चुंबन करून तिचा दारुण ताप दूर करिशील कीं नाहीं ?

**जयपाळ.**—सारजाबाई, मी तुमच्याशीं आज बोललों इतका कधींच कोणाशीं बोलत नसतों. तुमच्या विचकट प्रश्नाचें उत्तर माझ्यानें देववत नाहीं.

**सारजा.**—हा मेल्या कठोरा ! अरे, माझ्या प्रश्नाचें उत्तर दे. त्यांत कल्याण आहे. या सारजेनें कधीं कोणाचें वांकडें केलें नाहीं.

**जयपाळ.**—सारजाबाई, तुमचा प्रश्न चमत्कारिक, त्याला मी काय उत्तर देऊं ?

**सारजा.**—अरे, उत्तराचें कां तुला संकट पडलें? जयपाळा आतां तुला सर्व फोडून सांगतें. आपल्या स्वामिणीचें अंतःकरण तूं आल्यादिवसापासून तुजवर बसलें आहे. या घटकेस त्यांना सरकारचा वियोग नव्हे, तुझें कठोर हृदय ताप देत आहे. तूं त्यांना किती प्रिय झाला आहेस म्हणून सांगूं ? अरे, अहोरात्र तुझी मूर्ति त्यांच्या डोळ्यांपुढें उभी असते. जयपाळानें अशी शिकार केली; जयपाळानें असा वाघ मारिला; जयपाळ असें लिहितो; जयपाळ असें बोलतो; जयपाळ असा दिसतो; सारावेळ हें चालत असतें. काल मला एकीकडे बो-

लावून आपलें सर्व दुःख त्यांणीं सांगितलें; आणि म्हणाल्या, "सारजे, तूं चतुर आहेस; तूं शाहणी आहेस; तुजवर माझा पूर्ण विश्वास आहे; तर कसेंही करून त्या जयपाळाची आणि माझी एकांतस्थानीं गाट घालून दे. त्याजवांचून बाकीचीं सुखें असून नाहीं. तशीं वाटतात" जयपाळा, आतां कसें ?

**जयपाळ.**—सारजाबाई, तुमच्या शब्दांनीं माझें अंतःकरण फाटून गेलें. शिव, शिव, शिव, शिव, काय तुम्हीं अघोर पातक मजकडून करविण्याविषयीं झटतां, येथून तुम्हीं तरी उठून चला नाहीं तर मी तरी जातों. हर, हर, हर, हर, देवा, हें फुटकें दैव माझ्याच कसें हात धुऊन पाठीस लागलें आहे ?

**सारजा.**—अहारे मेल्या, भद्रकपाळी ! अरे, होय म्हण, तुझें काय जातें ? अरे, मेल्या गोड खायाला मिळेल; उंच निजायाला मिळेल; नागिणीसारख्या बायकोशीं भोग मिळेल—तूं कां वेडा होतोस ? दैव स्वतः आणून पुढें सुग्रासाचें ताट ठेवितें, आणि तूं कां नको म्हणतोस.—अहारे दळ्या !—जयपाळा असें करूं नको, माझें ऐक.

**जयपाळ.**—शिवाय गुरवे नमः सारजाबाई तुम्हीं राक्षसी आहां. कां उगाच माझा अंत पाहातां. येथून निघून चला; नाहीं तर हीच पुढची वही फेकतों अंगावर अरेरे, काय दुष्ट घातकी स्वभाव !—सारजाबाई, हात जोडतों, पायां पडतों, नाक घांसतों, तुम्हीं येथून उठून चला.

**सारजा.**—बाबा, तुला कंटाळा आला असला तर बस-

त नाहीं वरें! ही जातें. पण सांगून ठेवितें, हूं म्हण, आणि घे साधून, त्यासारिखें सुख नाहीं.

**जयपाळ.**—मला नको तुमचें सुख. तुम्हीं निघून तोंड काळें करा, म्हणजे मला सगळें पावलें.

**सारजा.**—वरें बाबा, तसेंच कां होईना. ही गेलें पाहा.

( निघून जाते. )

---

## प्रवेश ३.

### कमळजाबाई आणि सारजा.

**कमळजाबाई.**—(हातावर कपाळ टेंकून डोळे झांकून स्वस्थ मंचकावर बसली आहे) (हळूच) अग, कोणीग, दार उघडलें. कोण आहे?

**सारजा.**—कोणी नाहीं; बाई, मी सारजा.

**कमळजाबाई.**—ये बैस.—

**सारजा.**—कां, आज फार मलुल दिसतां बाईसाहेब? तिकडे जाऊन बोलतां बोलतां हळूच युक्तीनें गोष्ट काढली.

**कमळजाबाई.**—( डोळे उघडू ) काय ह्मटलेंस? कशाची गोष्ट?—हं हं, असें (पुन: डोळे झांकते.)

**सारजा**—बाई, कोमळ हृदयाला सहसा पाषाण-हृदयाची गांट पडत नाहीं. मला—

**कमळजाबाई.**—काय, काय म्हटलेंस? माझें चित्त तुजकडे नव्हतें.

**सारजा.**—नाहीं. म्हटलें, जशाला तसें प्राप्त व्हाव-याचेंच—आज तास दोन तास मी त्याशीं बोलत बसलें

होतें. हो, तर का काम मधेंच टाकतें? परंतु सांगतें बाईसाहेब, शाहाणा तो शाहाणा. शाहाण्या माणसाची बलाय दूर. एकादें मेलें वेडसर असतें तर तेव्हांच हो म्हणतें; हात जोडतें; पायां पडतें; नाना तऱ्हा करितें. हा काशीकर साऱ्या मुलखाचा सावध.

**कमळजाबाई.**—सारजे, तुझ्या वकिलीचा तपशील नको.

**सारजा.**—मी युक्तियुक्तीनें, युक्तियुक्तीनेंच गोष्ट काढिली; पण बाई, त्याणें अशी मुद्रा फिरविली, आणि असा राग आलासें दाखविलें कीं, कोणी म्हणेल, हा मेला शुकाचा दुसरा अवतार! पण मी सुतानें स्वर्ग गांठणारी. मी तेव्हांच ओळखलं कीं, हा सगळा भांगभत्तुरा आहे. दाखवायाला डोळा येवढाला फाडलान; आणि रक्त काढलेंसें दाखवलेन; परंतु अशा बाहेरच्या स्वरूपानें जर अंतर्याम लपवितां येतें, तर मग काय न होतें? सगळी त्याची हिकमत मी समजलें. आतां माझी म्हातारीची एक बुद्धि ऐका, तो आहे सावध. त्याचा काय मतलब कीं, ही गोष्ट आपणाशिवाय आणि त्याच्याशिवाय तिसऱ्या माणसाला ठाऊक असूं नये. तेव्हां आतां असं करा, त्याला सहज कामासाटीं म्हणून बोलावून आणा. आणखी काढतां काढतां हळूच गोष्ट काढा. आपला सहज निरोप जाऊंद्या; म्हणजे पाहा कसा धापा टाकीत येतो. बाईसाहेब, आपणाला पाहून त्याचें चित्त विकार-रहित राहील तरी कसें? आपण गोष्ट काढिली पुरे, कीं तो वश झाला.

**कमळजाबाई.**—सारजे, गोष्ट साध्य दिसत नाहीं. काय करूं, ही दुष्ट पापवासना कशी इतकें बळ पावली? तो जसा शरीरानें सुंदर दिसतो, तसाच मनानेंही सुंदर आहे. बरें समज, मी त्याजवळ गोष्ट काढिली, आणि त्यानें जर माझा धिक्कार केला आणि मला जारिणी म्हटलें, तर मग तो अपमान सहन करून कसा जीव ठेवूं? (दुःखाचा उसासा टाकून पुनः डोळे झांकून पूर्ववत् हातावर डोकें ठेवून पडते).

**सारजा.**—(मनांत) इकडे असें तिकडे तसें—बाईसाहेब, इतका धीर नका टाकूं. अहो मोठे मोठे कुर्र ह्मणतां आले, तर याची काय कथा? जाळें तर पसरा, जर पक्षी आंत न सांपडला आणि पंख फडफडावून उडून गेला, तर मला विचारा. मी राहतें बाहेर उभी. आंत आला म्हणजे बाहेर पाहारा माझा.

**कमळजाबाई.**—बरें, जा बाई आतां आपल्या कामाला. उद्यां जयपाळ भेटायाला आला म्हणजे मी आंत आहें म्हणून सांगून इकडे पाठीव.

( सारजा निघून जाते. )

---

## प्रवेश ४.

(स्थळ—कमळजाबाईचा महाल.)

**कमळजाबाई आणि भ्रतार.**

**भ्रतार.**—वाहवारे वाहवा, पाहावें तेव्हां झोंप. दिवसा पाहा, रात्रीं पाहा, केव्हांही पाहा, आपली झोंप—डोळे उघडा, महाराज, एकदां कोण आलें आहे पाहा तर खरं! (तिला हातानें हालवितो).

**कमळजाबाई.**–(हात झुगारून देऊन) माझ्या अंगाला हात नाहीं लावायाचा सांगतें साफ.

**भ्रतार.**–अबाबा, काय रागाचा फटकारा हा! गुन्हा तर बाबा कांहीं आठवत नाहीं. मग काय असेल तें असो.

**कमळजाबाई.**–झालें एकदाचें दरबार ? इतक्यांत वरें यावेंसें वाटलें ? (उसासा टाकून) देवा व्यर्थरे, बायकांची जात.

**भ्रतार.**–अरेरे देवा देवा, कायरे देवा, संकटांत घातलेस ? पाटावरचें ताटावर, ताटावरचें पाटावर होत आहे; केवढें हें संकट तरी !

**कमळजाबाई**–करा, आणखी छळ करा. सोसणें मेलें बायकांच्या पाठीस लागलेंच आहे. मेली पुरुषाची जातच दुष्ट आणि कृतघ्न.

**भ्रतार.**–काय काय, पुरुषांनीं काय आपलें घोंड मारलें आहे ?

**कमळजाबाई.**–ठीकच आहे, एकासारखे एक. त्याचा कोणाला राग यायाचा आहे ? फुकट, हा जन्म खरें, अगदीं फुकट (डोळ्यांतून पाणी काढिते.)

**भ्रतार.**–(मनांत) अरे बेटच्या हा शुद्ध विनोद दिसत नाहीं. येथं कांहीं तरी खोल आहे–(प्रेमालिंगन देऊन उघड) सखाबाई, अश्रूंचें काय कारण ? हें रडूं कां ?–अरे, अधिकाधिक ! अग, पुरे कर. हे उदकपाट कोणतें मानसिक दुःख वाहून नेतात ? तुझ्या एका नेत्रबिंदूनें माझें सर्व धैर्य गिळिलें.

**कमळजाबाई.**–काय सांगून फळ ! बायकांचें कोण

ऐकितें ? बायकांचें कोण रक्षण करितें !–देवा हा प्राण जाईल तरी बरें.

**भ्रतार.**–अशीं कठोर वचनें कांग बोलतेस ? इतके कष्ट देणाऱ्या अशा कोणत्या व्यथेनें गांजली गेलीस ? कोणी उन्मत्तपणानें तुझी अवज्ञा केली असेल, अथवा तुला दांडगें उत्तर दिलें असेल अथवा कोणत्याही तऱ्हेनें तुझा अपमान केला असेल, तर निःशंक मजजवळ बोल.

**कमळजाबाई.**–काय मेली बोलण्याची बूज ? झालें तर बोलून उपयोग. बायकांचें रक्षण कोणी करीत नाहीं. (डोळे पुसूं लागते.)

**भ्रतार.**–अग लाजाहोमास प्रदक्षिणा घालतांना जो हात सलज्जमुख करून धरूं दिलास त्याच हाताला आज स्पर्श करितांच नागिणीसारिखी कां फणाणतेस ? ज्यासाठीं मोठमोठे राजपुत्र झगडत होते, तो हा सुंदर देह नको कां म्हणतेस ? तुझ्या संरक्षणासाठीं स्वतःची आहुति देण्यास मी तयार असतां बायकांचें संरक्षण कोण करितें, म्हणून कां दुःखोद्गार काढितेस ? सखे आटप हें रडें आटप. किती जीव तोडतोडून सांगूं ? या तुझ्या आरक्त नेत्रांकडे माझ्यानें क्षणमात्र सुद्धां पाहवत नाहीं.

**कमळजाबाई.**–(डोळे पुसून) तो मेला कृतघ्न घातकी चांडाळ–मेल्याचा सत्यानास होओ ! मेल्याचे हात चुलींत जाओत. (डोळयांतून पाणी काढते)–मी कोण मेल्याला वाटलें, काय माझ्यामध्यें वांकडें पाहिलेन, म्हणून मेला निर्लज्ज दांडगा येथें आला होता ?

**भ्रतार**.—पुरे पुरे, समजलों कां खट्टू मन तें. कोणत्या उन्मत्त पशूची माझ्या मागें येथें येण्याची छाती झाली होती बोल. बोल लवकर. त्याच्या नरड्याचा घोट घेतों.

**कमळजाबाई**.—मेला दांडगेश्वर, आपली पहिली स्थिति विसरला. परवांच्या दिवशीं दोन प्रहरीं मी निजायाला ह्मणून येथें आलें, आणि पलंगावर पडलें न पडलें इतक्यांत मेल्या राक्षसानें दारापाशीं डोकावलें. रोजच्या सारखा कामकाजाला आला असेल म्हणून मी आंत बोलाविलें आणि जयपाळा, कांहीं पत्रवित्र आलें कायरे, म्हणून विचारिलें. कशाचें पत्र आणि कशाचें काय ! पापबुद्धि मेला हुच्चभाई ! मेल्यानें दार लोटलें आणि वळकट हात धरिला ( स्फुंद स्फुंदून रडूं लागते. )

**भ्रतार**.—काय काय, पुनः बोल; सगळें बोल; रडूं नको; त्या हरामखोराच्या हातापायांत मणामणाच्या बेड्या ठोकतों. असें अर्धें अर्धें बोलूं नको त्या लुच्यानें हात धरिला ! सगळें सगळें बोल काय तें.

**कमळजाबाई**.—सगळें काय बोलूं ? मेल्यानें हात धरिला तेंव्हां मी मोठ्यानें ओरडलें आणि रडूं लागलें. मग माझें रडें ऐकून तिकडून सारजा रडत ओरडत आंत येऊं लागली. हें पाहून मेला पळाला, तों वाटेंत सारजेनें आंगावरचें धोतर धरिलें तें हें ( दाखविते ) धोतर पाहा, कसें फेकून देऊन निसटून गेला—इतकें करून सवरून दिसायाला मेला कसा गायमुख्या. आतां एक सांगतें, जर त्या चंडाळाचें तोंड मला दिसलें, तर

हा जीव टेवणार नाहीं. आडांत उडी टाकीन, सोमल खाईन, कोणत्या तरी उपायानें या यातनेंतून सुटेन.

आपल्या अन्नाचा विचार करः आणि काय करणें तें करा (पुनः पाणी काढिते).

**भ्रतार.**—तूं कांहीं काळजी करूं नको. पुरे कर हें रडणें. तुझा साध्वीचा संताप त्याचा नाश केल्या-शिवाय राहणार नाहीं. त्या लुच्चा कृतघ्नावर पुरा सूड उगवीन तेव्हां पुनः अन्न घेईन. अरे उन्मत्ता, मस्ता, दांत खात व ओंठ चावीत बाहेर पडतो.

---

## प्रवेश १.

(स्थल—सदाशिवपुरींतील 'राजवाडा.)

**राजा, प्रधान आणि रक्षक.**

**राजा.**—प्रधानजी, आतां काय उपाय करावा तें बोला. हा काय ईश्वरी क्षोभ समजावा कीं काय?

**प्रधानजी.**—भगवंताच्या कृपेंकरून अशीं दुश्चिन्हें आजपर्यंत आमच्या राज्यांत ठाऊक नव्हतीं.

**राजा.**—याचा कांहीं तरी निर्णय झाला पाहिजे.

**प्रधानजी.**—काय विनंती करूं महाराज ! माझीही अक्कल गुंग झाली आहे.

**रक्षक.**—महाराज, या गोष्टीचा विचार कसेंही करून झालाच पाहिजे. आज सात रात्रीं जो चमत्कार आम्हीं पाहतों तो अझूनपर्यंत पायांजवळ वर्णन केला नाहीं, आज्ञा असल्यास निवेदन करितों.

**राजा.**—रक्षक, जो कांहीं चमत्कार तुमच्या दृष्टीस पडला असेल तो लवकर समजंवा.

**रक्षक.**—आज्ञा; कृष्णपक्षाच्या नवमीपासून काल अमावास्येपर्यंत आम्हीं पाहात होतों. रात्रीं जेव्हां माणसांची चाहूल सुद्धां बंद होते, शहराचे रस्ते निर्जन अरण्यापेक्षांही उजाड दिसतात, पशु रंवथ सोडून बसल्या ठिकाणींच पेंगा घेतात, पक्षी चारा सोडून झाडांच्या डाहळ्यांतून हेलकावत असतात, सर्व वृक्षसमुदाय यत्किंचितही डुलत नसतो, सारांश सर्व विश्व विश्रांतिसुखानुभव घेत आहे असें दिसतें; खालीं, वर, बाजूस, जिकडे तिकडे अंधकार भरलेला असतो आणि रात्रीच्या किर्र शब्दाखेरीज दुसरा ध्वनि ऐकूं येत नसतो, तेव्हां अशा मध्यरात्रीच्या भरांत, नदीतीरीं, श्मशानभूमींत, कालेश्वराच्या देवालयांत कोणी स्त्री प्रथम सातदां मृदुहास्य करून नंतर एकाएकीं तितक्याच वेळां भयंकर रुदन करिते.

**राजा.**—असा प्रकार आज सातदिवस तुमच्या दृष्टीस पडत असतां ती बाई कोण, येते कोठून, हंसते कां, व रडते कां, याचा शोध तुम्ही कसा लावला नाहीं ?

**रक्षक.**—महाराजांनीं विनंती ऐकावी. हा प्रकार दुसरेच दिवशीं मीं प्रधानजीच्या कानांवर घातला, त्यावरून ते सर्व मंत्रिमंडळ बरोबर घेऊन मजसुद्धां त्या स्मशानभूमीकडे जाऊं लागले. याचें कसें काय फळ प्राप्त झालें तें प्रधानजीच चरणांस विदित करतील.

**प्रधानजी.**—महाराज, ह्याचाच ठावठिकाण लावण्याकरितां आम्हीं निघालों. नदी गांठली; स्मशान गांठलें; देऊळ गांठलें; येथपर्यंत त्या बाईचें रुदन ऐकूं येत होतें ; आणि सभामंडपांत पाऊल मात्र टाकिलें तों

ती स्त्री एकदम गुप्त झाली. याप्रमाणें आम्ही रोज तिच्या शोधार्थ जातों, व याप्रमाणें ती रोज गुप्त होते.

**राजा.**—जें ऐकावें तें विशेष.—या गोष्टीचा आणि माझ्या स्वप्नाचा कांहीं तरी निःसंशय संबंध आहे.

**प्रधानजी.**—महाराज, या सर्व गोष्टींचा उलगडा होण्यास मला एक मार्ग दिसतो. विनंती करण्यास आज्ञा असावी.

**राजा.**—बोला.

**प्रधानजी.**—जी आज्ञा; या शहरांतील शास्त्री, पंडित, वैदिक, मंत्रि व ज्योतिषी यांना बोलावून आणून सभा करावी आणि या गोष्टीचा अर्थ त्यांस पुसावा; म्हणजे कोणी ना कोणी आपल्या विद्यासामर्थ्यें करून त्याचें स्पष्टीकरण करतील.

**रक्षक.**—महाराज, प्रधानजी यथार्थ बोलतात.

**राजा.**—ठीक आहे तर. आज्ञापत्रें लिहून सर्व जाणते जाणते बोलावून आणा. या गोष्टीस विलंब कामाचा नाहीं.

**प्रधानजी.**—जी आज्ञा ; उठा तर रक्षक.

**रक्षक.**—जी ; आज्ञा घेतों महाराज.

**राजा.**—बरं आहे.

(प्रधान व रक्षक निघून जातात.)

---

## प्रवेश २.

### मनू, माणकू, आणि सुभाना.

**सुभाना.**—रामराम मानकुवा, रामराम. आव कुनि-कड पवड्या परवाळी.

**माणकू.**—कशाच घरवाळी राव! हित बसल्यात कालपासन फाक्या, भल तुमीबी!

**सुभाना.**—आव हित कुनाला न्हाईत! अल राव, तुमास्नी वाटत योक मीच कामाचा.

**माणकू.**—न्हाइव पन आमच्या फजितिला बगा त्वाड न्हाइ. काय राव ज्ये हाल झाल त्ये काय पुसू नका—या मनवा! मनवात बगा—म्हनत्यात न्हाइ— उंबराच फूल झाल्यात.

(मनू येतो.)

**सुभाना.**—रामराम मनवा! आव कुनिकड आज आठ दीस डुइ दिलीती! घरीबी गाट न्हाइ, पान्यावरबी गाट न्हाइ, वाड्यामंदीबी गाट न्हाइ! कस काय, हाय-तरी काय?

**मनू.**—छचे राव, ती धामधूम तुमी पुसूच नका. घटकमंदि हिकड अन घटकमंदि तिकड. ग्ये लोक धाव या येशिला, नीग तितन जा त्या संभुम्हादवाला. पळ पळ तितन पळ वाड्यामंदि, ह्यो योकसारका कार-काना चाललाया! रात न्हाइ, दिस न्हाइ, येकसारक पुरावलय बगा.

**सुभाना.**—कारन?

**मनू.**—भल तुमच राव, पडलात सुकामंदी; राह्या-तली मानस! बगन नग, उटन नग, चोकशी करन नग. ह्य वाइसाव, ह्य ताइसाब, ह्य आकासाव कराव अन सवस्त पान्यावर झोप घ्येवी. हित जालिया मुलुकभर फरपाट.

**सुभाना.**—आव पन कारन!

**माणकू.**—आव कारन तुमी हित इचारा. या राव, फजितिला त्वाड न्हाई म्हंगतोन! कोन योक सटवी आवा वगा राती त्ये तिकड मशान जाग्यात, वरडा करती. आन वगा तिला धराया समोत्यान काळोका-मंदी पचीस तीस असामी अल्लक गुमान वसावल. आन काय राव सांगू, त्येमंदी मलावी दिला उगाच ढकलूननी!

**सुभाना.**—आर वाव्वार वाव्वा, फाकडा शिपाई!

**माणकू.**—आव राव उगच. आल यकादीस रक्षक अन म्हनल करार उव कोनकोन सनदी हायत त्ये. आमी व्हायलो उव, अन असच वगुन लावलाकि सपाटा त्येनी! हा म्हन भला उच हाय, काडार भाइर याला; हा म्हन भला लट हाय, काडा याला. थू त्ये-च्या राव, मी उचवी पडलो अन लटवी पडलो! अन काय पुसता कता! धरला, वडला, मला नेला मशानां-त. अन तितच सदा व्हायलो असतो, पर वगा भगवा-न सारती; काडलन त्येन भाइर त्येतुनवी.

**यनू.**—आर भगवानान कसकस काडलर तुला भाईर?

**माणकू.**—त्ये काय राव सादल म्हनून सादल इतकच. तित योक योक गोसावी कंदी कंदी येऊन व्हातो. भगवानाला करन, त्येदिशीच तित आला व्हता. त्यो माज्या सारकाच उच आन लट वी हं! आन काय युगुत लडावली! त्येला दिला आमचा पोशाक, आन त्येचा घातला आमी, अन सूं निसाटलो. जो निसाटलो वगा त्ये घर गाटल. घर गाटल, आन "उगाड रांड दार उगाड" म्हनून जवा का दिली बायकोभोती

दंगाल उडवून, तवा तिन विगिच्याग कवाड उगाडल. मग काय पुसता राव, आडना घातला अन सवास्त निजलो. तितपासन आज तलूक कोन य्योक भाइर निगालाय! आज सवाविवा हाय म्हनून सोडलाया आसरा.

**मनू.**—आर मर्दा तु न्हाईस असा पुकारा न्हाइ झाला ?

**माणकू.**—तित कशाचा व्हतो पुकारा! आव दोन हजार सनद्यांमदून तीस असामी न्येलल. कोन कुनाला वळाकत! त्या तिसामंदी योक व्हता वळकी-चा, पर आमि त्येचा हात दावला.

**सुभाना.**—काय हिकमत! काय हिकमत!—आल राव सकाराम बावा, वाड्यामदुन कायव! (सखाराम येतो.)

**मनू.**—कायर सकाराम, कुनीकडन आलास ?

**सखाराम.**—काय राव पुसता! वाड्यामंदी बगा काय मोज मोज चाललिया.

**माणकू.**—कस काय चाललयर!

**सखाराम.**—छ्ये मर्दा, आज इद्यान इद्यान वामनांना लइ नामी दक्सना परापत होत्ये.

**माणकू.**—अर अस काय चाललया ?

**सखाराम.**—आज भली पाच पन्नास वामन सकाळ-पासन तांगडल्यात महाराज याकुच प्रस्न घालत्यात आन उकाल म्हनत्यात. त्ये हिगड तिगड पात्यात, काइ बाइ उत्तर कर्त्यात, पर त्ये कुट पटत! काय मर्दा दुर्दशा उडालिया—(मोठ्यानें हंसतो)

**माणकू**—आनिक!—चला व सुबानवा तिकड.

**सखाराम.**—वामन वगा अस करीत बसल्यात. येक म्हंगतो आज दवादस तितिला पूर्नमेला गाट आलिया. चंद्र बारा घंटीचा हाय. तवा सरकार, प्रस्न काइ वंगाळ न्हाई! येक वगा अशी अशी (बोटें चाळ-वितो) लागलाया वोट घालाया! येक वगा वडवड पाटीवर ऱ्येगा वडतोया! वडतोय पुसतोय, वडतोय पुसतोय! येक वगा असा दातान वट चाऊन, आडच्या-कड वगून, नंदी बैलावानी अस अस, मानला हिसक देतोया! जनु आलया ह्यच्या ध्यॆनांत! अस राव. करीत बसल्यात, पर समद येरुत पिरत्न.

**माणकू.**—आर, चला किर आपुन जाऊनशेनी वगू. सकाराम, आपनाला कस दिसलर?

**सखाराम.**—आर भाइरच्या पान्यावर उन्ह न्हाइल मजी इतून तितून दिसत. चला सुबानवा चलता?

**सुभाना.**—कस मनवा? तुमचा तर पाराच हाय म्हना

**मनू.**—चला चला, तित का बसाना? चला या.

(निघून जातात.)

---

## प्रवेश ३.

( स्थल—दरबाराची जागा. )

**राजा, मंत्रि आणि पंडित.**

**राजा.**—या गोष्टीचा निर्णय झाला पाहिजे. स्नान, संध्या, भोजन, आदिकरून सर्व व्यवहार तोंपर्यंत बंद.

**१ ला पंडित.**—(हळूच) अच्युतशास्त्री, राजोक्ति श्रवण केली ना?

**अच्युतशास्त्री.**—अहो, त्यांतलें असें आहे—मी म्हणतों यद्यपि तत्रापि बाह्यत्वचेंतून अंतर्यामीचा बोध कोठें होतो.

**२ रा पंडित.**—नाहीं, त्याला ग्रंथाधार आहे; परंतु प्रथमारंभापासून अमानुष कृति पडली; अतएव गार्भितार्थ विवक्षित होत नाहीं. दीक्षितासारिखें निष्फळ भाषण करून काय उपयोग? उपहासास्पद मात्र होणार.

**सदानंदशास्त्री.**—( दीक्षितास ) काय हो दीक्षित, जर याथातथ्य ज्ञान होत नव्हतें तर आपण अजागलस्तनवत् किमर्थ संभाषण केलें बरें !

**दीक्षित.**—अहो, त्यांत अनेक धोरणें आहेत; तुम्हां शास्त्र्यांसारिखे आम्हीं फक्त रुपावलीच्या जोरावर चालूं लागलों तर निर्वाह लागणार नाहीं. ( अंमळ हळू ) तुमच्या जवळ म्हणून गोष्ट बोलावयाची—महाराजांच्या स्वप्नाचा उलगडा स्वप्नांतच झाला आहे, हें ज्ञान आम्हांला कोठें होतें ! ( अगदीं हळू ) सहज एकादें खरें दिसेलसें सांगून दिलें म्हणजे इतक्या ब्राह्मणांचें कार्य होईल; द्विजांवरची भक्ति उडणार नाहीं; सर्वच अनर्थ टळतील; अशा संकेतानें आम्हीं बोललों. ( मोठ्यानें ) असें आहे,

"सानुकूले जगन्नाथे विकृतं सुकृतं भवेत्."

**नरहरभट्ट.**—ब्राह्मणांस अडकविल्यानें उलगडा होतो? त्याचें इतकेंच. अनुष्ठानें बसवावीं, पारायणें चालवावीं, ब्राह्मणसंतर्पणें करावीं. होणें जाणें ईश्वराधीन.

**जितेंद्रियभट्ट.**—ते म्हणतील, "होणें जाणें ईश्वरा-

धीन" मग अनुष्ठानें कशास ? अहो असें पाहा, कलियुगांत गोब्राह्मणावर तशी निष्ठा कोठें उरली आहे ? नाहीं तर केव्हांच देवळांचीं आवारें ब्राह्मणांनीं भरून गेलीं असतीं. (हळू) तसें सांगणारे कारभारी तरी आहेत का आतां, (त्याही पेक्षां हळू) राजे तरी ? कशास बोलतां नरहरभट्ट ! भ्रांति आहे हो तुम्हांस!

**नरहरभट्ट.**–अहो अहो, ऐका; हें एक सोंग आलें. ( दाराशीं. )

**भालदार.**–अर शीर आंत आज समद्यांसनी मोकळीक. जा, जाऊनशेनी कर अरज.

**एक पुरुष.**–नग बा; सरकारच्या म्होर उब व्हाऊन रुबरू उत्तर करन व्हाव नग; कायबी व्हइना तिकड !

( भालदार चोपदार बळेनें आंत शिरकवितात. )

**एक पुरुष.**–अर नग, नग, म्हनतोनी !

**भालदार.**–( पुकारतात ) अर्जदार महाराज.

**राजा.**–अरे कायरे, कोणरे; यावेळेस याला कशासाठीं आंत येऊं दिलारे ?–कोणरे तूं ?

**तो पुरुष.**–(कांपत कांपत मुजरा करून) जी सरकार, ह्या पायांची आन, जर मी खोटा अरज करीन तर. त्येनी मला उगच आमंदी शिरकावल–माझा अन्याव न्हाई सरकार.

**राजा.**–अमात्य, दाराशीं कोण असे उद्दाम आहेत ? चवकशी करा.

**अमात्य.**–आज्ञा सरकार; पण माझी एक विनंती आहे. दारावर मनाजी नाईक आहे, आणि त्याचे

लोक दांडगेपणा करणारे नव्हत. या माणसाला प्रश्न करण्याची आज्ञा असावी.

**अमात्य.**—कायरे भागू, मुत्पाकाकडे असतोस नाहीं का तूं?

**भागू.**—जी व्हय, आज सातसापासूनशेनी मी तिकडच हाय. अंबूजी माजा बापी तिकडच व्हता, अन कोंडाजी त्याचा बा—माजा आजा त्योबी सरकार आपल्या तिरतरूपानीं—

**अमात्य.**—अरे पुरे, ती हकीगत नको. विचारतां तेवेढ्याचं उत्तर कर म्हणजे झालें.

**भागू.**—जी व्हय, न्हाई म्हटल आपल्या तिरतरूपांनीं तेलाबी तितच लावला व्हता.

**अमात्य.**—बरं समजलें; तूं येथें कशाकरितां आलास?

**भागू.**—जी न्हाई सरकार, आपल्या पायांची आन, मला उगं आमंदी घुशिवला. सरकार मायबाप; तारनारबी आपुन, मारनारबी आपुन.

**राजा.**—अरे भिऊं नको, घाबरूं नको.

**अमात्य.**—अरे तुला कोणी आंत घुशिवलें?

**भागू.**—मनाजी नायकान सरकार.

**अमात्य.**—तूं कांहीं मनाजीजवळ बोलला होतास?

**भागू.**—त्येवड मातर खर सरकार. तेचीजवळ याक गोष्ट बोललो व्हतो.

**अमात्य.**—असें, आतां आलास रस्त्यावर.

**भागू.**—न्हाई सरकार माजा अन्याव न्हाई. मी नसतो आमंदी आलो पर त्येनी—

**अमात्य.**—अरे भागू भिऊं नको. आलास म्हणून

काहीं हरकत नाहीं. मनाजी नायकाजवळ काय बोललास तेवढं सांग.—इकडे पाहा, तो ज्याला आंत पाठवितो त्याला निदान शेलापागोटें तरी मिळतें. समजलास? अगदीं भिऊं नको. बिनधोक बोल.

**भागू**.—जी सरकार, मनाजी नायकापाशीं इक्तेंच बोललों. माजीवर सरकार दोनवर्षांपूर्वी दोघातिघा लुच्यांनीं आळ घातला. मी म्हन सरकारच्या ताटांत ईस कालवल. आन त्येवरून मला सरकार इनाकारन ठेप दिली. ते आज दोन म्हईन जाल तिनन मला सोडूनशेनी पुना जाग्यावर घेतल.

**अमात्य**.—पुढं?

**भागू**.—जी सरकार, त्येच्या अदुगर तीन दीस योकसारक सपन पड. मी जशी सरकार दूदसाकर कालवूनशेनी हुजीर आनली आन ती सरकारानीं घेऊनशेनी मला जसं मुंडासं भांदल सरकार.

**अमात्य**.—मग?

**भागू**.—मग सरकार अरुत समजावा म्हनूनशेनी समद्यासनी इचइचारून दमलो. पर त्ये म्हनून उकलना. त्यांत सरकार योक शाना व्हता. जयपाळ जयपाळ म्हनत त्येला. त्येन अकर उलधडा केला. अन सरकार त्येन बोलल्यासारक जाल.

**अमात्य**.—असा शाहाणा माणूस तुरुंगांतरे कशाला आला?

**भागू**.—त्ये काय सांगूं सरकार! पन कसा आला समद नवल करित्यात. कारन त्यो लई देवभगत हाय सरकार.

**अमात्य.**—सरकार, मनाजीनें याजकरितां याला आंत पाठविलें. आज ज्याअर्थी सर्वांसच मोकळीक आहे त्याअर्थी त्यालाही आणून पाहावें. आज्ञा असली तर आणवितों.

**राजा**—त्याला काय हरकत! स्वप्नांतल्या उलगड्या-सारखा उलगडा करण्याचें सामर्थ्य असेल त्यानें विन-धोक येथें यावें. बोलवा त्याला.

**अमात्य.**—अरे कोण आहेरे? जा, मनाजी नायका-ला म्हणावें त्याला घेऊन ये.

**सेवक.**—आज्ञा.

( जासूद जयपाळास घेऊन येतो. )

**भालदार चोपदार.**—जयपाळ, महाराज.

**जयपाळ.**—( मुजरा करून हात जोडतो. )

**अमात्य.**—जयपाळ तुमचेंच नांव?

**जयपाळ.**—जी माझेंच नांव जयपाळ.

**राजा.**—आम्हीं असें ऐकिलें आहे कीं, स्वप्नांचे अर्थ सांगण्यांत तुम्हीं फार कुशल आहां. परवां रात्रीं मला एक स्वप्न पडलें, त्याचा अर्थ स्पष्ट व्हावा म्हणून हे शास्त्री पंडित बोलाविले; परंतु याच्यांतून एकाचें सांगणें दुस-ऱ्याच्या सांगण्याशीं जमत नाहीं, आणि जमलें तरी माझ्या खात्रीस पडत नाहीं; कारण माझ्या स्वप्नाचा अर्थ असा आहे असें कोणीं महापुरुषानें मला स्वप्नांतच सांगितलें. तो अर्थ माझ्या ध्यानांत जरी नाहीं तरी यांच्या सांगण्यांत आणि त्यांत फार अंतर आहे अशी माझी खात्री आहे. तुमच्या मध्यें उलगडा करण्याचें सामर्थ्य असल्यास बोला.

**जयपाळ.**—सरकारांनीं स्वप्न बोलावें.

**राजा.**—स्वप्न असें पाहिलें कीं, मी वाड्यांतून निघून गंगातीरीं गेलों आणि तेथें पाहतों तों अमर्याद पूर आला असल्यामुळें, ती गंगाबाई दुथड्यांचें उल्लंघन करून, महावेगानें "फूंफूं" असा शब्द करीत चालली होती. कोणी म्हणेल ही वया गिरिराजजनकावर रुसून तट्ट फुगून, गाऱ्हाणें गातच आपल्या प्रियपात्र रत्नाकराकडे जात आहे कीं काय कोणजाणे! इतक्यांत तिची ती शीघ्रगति मंद झाली; तिच्या प्रचंड लाटा कमी झाल्या; तिचें विस्तीर्ण पात्र आकुंचित झालें. तिचें गढूळ उदक स्वच्छ स्फटिकासारखें झालें; सारांश कोणी म्हणेल सख्या रत्नाकरानें अंजारून गोंजारून, लडिवाळपणानें मांडीवर घेऊन इचें सांत्वन केलें. इकडे आसमंताद्भागींच्या प्रदेशांत नानातऱ्हांचीं धान्यें इतकीं विपुल उगवलेलीं दिसलीं कीं, आज पृथ्वीनें आपलें सर्वच वैभव बाहेर काढलें कीं काय असा मला घटकाभर भास झाला. जयपाळा, सरासरी दोन अडीच घटकांच्या आंत हा सातदां चमत्कार पाहिला. मग परतावें म्हणून निघालों तों एकाएकीं गंगाबाईचें होतें तें उदक आटूं लागलें. आटतां आटतां, पांच सात पुरुष पाणी असावयाच्या ठिकाणीं, नेत्रस्पर्शास टिपूसभर देखील उरलें नाहीं. तिच्या मध्यें विहार करून सुखानें राहणारे जे मत्स्यादि जीव, त्यांणीं तळमळ तळमळ करून पटापटा प्राण टाकले. चहूं बाजूंच्या धान्यांची राख झाली. जिकडे दृष्टि द्यावी तिकडे वालुकामय दिसूं लागलें. हाही चमत्कार सातदां पाहिला.

जयपाळा, या स्वप्नाचा जर यथार्थ अर्थ सांगशील, तर तुझ्या योग्यतेस पारावार नाहीं असें करीन.

**जयपाल.**—महाराज, भगवंताची आपणावर पूर्ण कृपा आहे; कारण कीं त्याणें दयाळू होऊन, पुढें सर्व पृथ्वीवर जें संकट येऊन पडणार तें या पूर्वसूचक स्वप्नानें आपणांस जाणविलें आहे. या स्वप्नाचा अर्थ असा दिसतो कीं, यापुढें सात वर्षेंपर्यंत यथाकालीं वर्षाव होईल. पृथ्वी यथाकालीं यथायोग्य धान्यानें व्याप्त होईल, महर्घता हा शब्दही लोक विसरून जातील; परंतु तीं सात वर्षें लोटल्यानंतर या सर्वसुखाचा एकदम वचपा निघेल. मेघ उदकाचा संचयही करणार नाहींत. धरित्री धान्याचें बोटुकही दाखविणार नाहीं. सर्व प्राणिमात्र जिकजिक करतील. सारांश जशीं तीं सात वर्षें आनंदाचीं तशीं हीं दुःखाचीं जातील. हे राजाधिराज या महा आक्रांताच्या समयीं, सर्व भूतलाचा कनवाळूपणानें समाचार घेण्याचें श्रेय आपणास देण्याची भगवदिच्छा दिसते. याकरितां या इच्छेनुरूप वर्तण्यास आपण समर्थ होण्याचे यत्न करावे. पहिल्या सप्तकांत सर्व मुलखांतील दाणागोटा विकत घेऊन पुढील सप्तकांत उपयोगीं लावावा. शहरोशहरीं, प्रांतोप्रांतीं धान्याधीश नेमून तजवीज ठेवावी. महाराज, अशानें आपली कीर्ति युगानुयुगीं सुद्धां प्राणिमात्र गातील.

**राजा.**—जयपाळा, होयरे होय! हाच स्वप्नांतील उलगडा बाबा, तूं कोण आहेस, आणि हें स्वप्न तूं कसें स्पष्ट केलेंस? तुजजवळ अशी कोणती मंत्रविद्या आहे?

**जयपाळ.**—महाराज, हा आपला सेवक मंत्रविद्येंतील एक अक्षरसुद्धां जाणत नाहीं. आपल्या स्वप्नाचा गांवांत पुकारा झाला त्यादिवशीं रात्रीं कोणी सन्याशानें त्याचा अर्थ मला सांगितला. ती नारायणमूर्ति अर्थ सांगून तेथल्यातेथेंच अदृश्य झाली असें मला भासलें. मग काय खरें खोटें असेल तें असो.

**राजा.**—जयपाळा, तें कांहीं असो, तूं आज मोठें कार्य केलेंस खरें. आज तूं सर्व जगाला तारलेंस असें म्हटलें असतां बाध येणार नाहीं; याकरितां आतां माझी आज्ञा ऐक. तूंच या माझ्या राज्यांत धान्याधिपति हो, आणि तूंच यथायोग्य तजवीज ठेव. अहो अमात्य, आजपासून जयपाळ माझ्याठिकाणीं समजा. ज्याला परमेश्वरानें ही ब्रह्मगुह्य गोष्ट सांगितली त्याला प्रतिभूप केलें असतां परमेश्वराच्या इच्छेसच अनुसरून चाललों असें होईल. जयपाळा, आजपासून तूं माझ्या उजव्या बाजूस तक्तावर बसत जा. तुला प्रतिनिधीचीं वस्त्रें देतों हीं घे. सर्व राज्यकारभार स्वतंत्रतेनें पाहा. मुख्य प्रधानाच्या छत्रचामरांस शोभीव. तुला यश प्राप्त होओ, आणि तुजकरवीं मला प्राप्त होओ. अमात्य,—सूचना—

**अमात्य.**—जी—( भालदाराकडे पाहातो.)

**भालदार.**—महाराज, राजाधिराज, भूपति; (पुकारतात.)

---

## प्रवेश ४.

**कमळजाबाईचा भ्रतार आणि जयपाळराज—**

**क० भ्रतार.**—त्यावेळेस तुमच्या शिरच्छेदाविषयींच

आज्ञा देणार होतों—पाहा काय अनर्थ—आतां तें सारें विसरा, हा पदर पसरतों, मला क्षमाकरा. मी मूर्ख, मी अविचारी—बरें झालें.

**जयपाळराज.**—त्यांत आपणांकडे काय आहे? नेमानेमच तसा. तसें झालें नसतें तर आज हा दिवस कशाला दिसता!

**क० भ्रतार.**—प्रथम जेव्हां तिणें सर्व अन्याय कबूल केला तेव्हां तिचीं दोन खंडें करावीं अशा हेतूनें हातीं शस्त्र होतें तेंच तिजवर उगारिलें. इतका क्रोध आला होता; परंतु तें शस्त्र तरी कशाला ऐकतें? तत्काळ खालीं पडलें.

**जयपाळराज.**—जी रणांगणांत क्रूर दुरभिमानी शत्रूंचें मात्र रक्तपान करणारी तरवार ती आपल्याच स्वामिणीवर कशी फिरेल!

**क० भ्रतार**—खालीं पडली तसा एकदम विचार सुचला कीं, अरेरे! आज पुनः घोर पातक करणार होतों. पश्चात्ताप पावलेल्या स्त्रीहत्येचा दोष व्यर्थ माथ्यावर घेणार होतों—असो तीही आतां फार दिवस राहात नाहीं. आजउद्यांची सोबतीण दिसते.

**जयपाळराज.**—हें काय म्हणतां महाराज? बाई-साहेबांची प्रकृति फार बिघडली आहे काय?

**क० भ्रतार.**—आजउद्यांची सोबतीण.

**जयपाळराज.**—अरेरे! इतकी प्रकृति कशानें बिघडली?

**क० भ्रतार.**—वर्ष दोनवर्षें क्षयाच्याच भावनेनें झुरत होती आणि काल परवांपासून ज्वर होऊन ही स्थिति प्राप्त झाली आहे.

**जयपाळराज.**—बाईसाहेबांची आज्ञा असली तर—

**क० भ्रतार.**—किती दयाशील स्वभाव हा! याकरितांच, तुम्हांला तेथवर नेण्याकरितांच आलों आहें. खरें म्हणाल तर तिची अत्यावस्था पाहून, मनांत तिजविषयीं उद्भवलेली निष्ठुरबुद्धि जेथल्या तेथें विराली. ती खरोखर क्षमेस पात्र झाली आहे, आणि म्हणूनच तुम्हांस तोंड दाखवायास आलों. नाहीं तर जयपाळराज—

**जयपाळराज.**—त्याविषयीं एक शब्दही उच्चारूं नये. जें झालें तें झालें. आपण उभयतां जो माझा परामर्ष घेत होतां त्याखेरीज सर्व गतगोष्टी मी विसरलों. आज्ञेप्रमाणें येण्यास हा निघालों.

**क० भ्रतार.**—किती उदार स्वभाव! अरे माझ्या जयपाळा—जयपाळराज—( जातात.)

---

## प्रवेश ५.

### कमळजाबाई, भ्रतार आणि जयपाळराज.

**जयपाळराज.**—छे, छे, छे! हें काय वेड; मातुश्री हें काय!

**कमळजाबाई.**—( रडत रडत ) जयपाळराज, मला घातकिणीला, मला जारिणीला कशाला मातुश्री म्हणतां? ( भ्रतारास) दया, दया, आतां मजवर दया करा. जेथें मी खरोखर पुत्राचें नातें ठेवावें तेथें—देवा, मी कोण राक्षशीण—नाहीं, राक्षशिणीचेंही मन अशा पापबुद्धीनें विटाळत नसेल.—जेव्हां प्रथम गोष्ट बोललें तेव्हांच कां माझें गर्दन उडविलें नाहीं. या आतां तरी, द्या. करा.

**भ्रतार.**–अशा प्रसंगीं कोण दया करणार नाहीं ? मी तुझा अन्याय विसरलों; परंतु जयपाळराज–अग दुष्टे, या महापुरुषास काय व्यर्थ संकट सोसण्यास लावलेंस!

**जयपाळराज.**--नेमानेमच तसा होता त्यांत बाई-कडे काय दोष ?

**कमळजाबाई**–जयपाळराज, दया, मजवर पूर्ण दया करा. हे यमदूत वेणी धरून मला फरफरा ओढि-ताहेत.–न्या न्या; बांधा, खुशाल तापलेल्या लोखंडी खांबाशीं मला बांधा; पोळवा, वाटेल त्या पदार्थांनीं मला पोळवा; डागा, डागा, माझें सर्व आंग डागून काढा. अग आईग, आतां हे हजारो साप मला वेष्टि-तील, हे हजारो विंचू मला नांग्या मारितील, हे हजारो हत्ती मला तुडवितील, हे हजारो सिंह मला फाडितील. अग वाईग, आतां हा कोरड्याचा मार कसा सोसूं ! देवा, देवा, देवा कसेंरे देवा !–( निश्चेष्टित पडते.)

**जयपाळराज.**–अरे आतां नीट होत्या, आणि इत-क्यांत असें काय झालें !

**क० भ्रतार.**–( दासीस ) अग सावध करा. दोन शब्द बोलण्यासाटीं तिचा प्राण घुटमळत आहे.

**जयपाळराज.**–आतां कींहो नीट बोलत होत्या !

**भ्रतार.**–काल रात्रीं पासून हिची अशीच दशा झाली आहे. घटकेंत शुद्धीवर असते, घटकेंत वेड्या-सारिखी बडबड करिते, घटकेंत निश्चेष्टित पडते.

**जयपाळराज.**–काय कठीण समय हा !

**क० भ्रतार.**–मागचें सर्व विसरलों असें तुमच्या तोंडून ऐकावें एवढी मात्र आतां तिची इच्छा.

**जयपाळराज.**—आपणापाशीं तेथेंच विनंती केली कीं, आपण उभयतां जो माझा परामर्ष घेत होतां, त्याखेरीज इतर सर्व गतगोष्टी मी विसरलों. ईश्वरी संकेतापुढें उपाय नाहीं. त्यांना पापवासना नच व्हावी; परंतु झाली. अत्युत्तम स्थळींही एकादे वेळीं कांटेरें झाड उगवूं पाहातें, नाहीं तर बाईसाहेबांचा आयुष्यक्रम खरोखरी वर्णनीय असे.

**भ्रतार.**—खरें, खरें, जयपाळराज, खरें म्हणतां. ही तशीच होती अझून. अझून बरी होओ.

**कमळजाबाई.**—सोडा, सोडा; आतां मला सोडा. नाहींरे नाहीं; नाहीं बरें नाहीं; तेवढी तेवढीच पापबुद्धि.

**जयपाळराज.**—मातुश्री, आपण अशा कां ओरडतां? अहिल्या, द्रौपदीसारख्या साध्वींनांही पापबुद्धीनें सोडिलें नाहीं, म्हणून काय लोकांत त्यांची तेवढ्याकरितां मान्यता बुडाली काय?

**कमळजाबाई.**—कोण, जयपाळराज बोलतात! जयपाळराज काय!

**जयपाळराज.**—होय मातुश्री, मी जयपाळ.

**कमळजाबाई.**—जयपाळराज, माझे दोन शब्द ऐका. दोनच, म्हणजे मग हा देह ठेवितें; आतां जी तुम्हांशीं बोलते ही कुसुमचापानें विंधिलेली, काममदानें अंध झालेली, परपुरुषसंगासाठीं वेडावलेली, बटीक नव्हे; तर पश्चात्तापानें दंडिलेली, यमपाशानें बांधिलेली, तंद्री लागलेली, पतिचरणापाशीं लीन झालेली कमळजा आहे.

( भ्रताराकडे पाहून ) होय, या, या, चरणापाशीं लीन—

( मान वांकवून पडते. )

**जयपाळराज.**—धरा, धरा, पुनः बेशुद्ध झाल्या. असे मुक्ताफळासारखे जिचे बोल ती कमळजा कशी नव्हे ? मातुश्री बोला.

**भ्रतार.**—आतां कशाचें बोला? डोळे पाहा, नाडी पाहा. झालें, सर्व आटोपलें. बोल बोल, सखे आणखी एकदां तरी बोल. असे गोड शब्द माझ्या कानीं पुनः कशानें पडणार! खरोखरीच देह ठेविला. अरे भगवंता केवढा घाला.हा !

**जयपाळराज.**—ईश्वरी नेमणूकच तितकी; त्याचा शोक करून काय होणार ?

**भ्रतार.**—हा तृतीय विवाह ! जयपाळराज, माझ्या सारखा दुःखी पुरुष कोठें तरी असेल कायहो ? तिसरी बायको, परंतु तीही दोन दिवस जास्त राहिली नाहीं.— हिचा माझ्या समक्ष तरी प्राण गेला हिणें माझ्या मांडीवर तरी डोकं ठेवून डोळे मिटले. पूर्वीच्या दोघींना तेंही मिळालें नव्हतें. तिघीही गेल्या. व्यर्थ, व्यर्थ, व्यर्थ. लोक संसारांत सुख आहे म्हणतात. हें सुख पाहा ! एक, दोन, तीन ! हा आमचा संसार !

( कमळजाबाईच्या प्रेताकडे पाहतो. )

**जयपाळराज.**—(इतरांस) तयारी करा. आतां काय?

( तयारी कारितात. )

# अंक ४.

## प्रवेश १.

### चंद्रदेवराज आणि अहिल्याबाई.

**अहिल्याबाई.**—आतां आज नाहीं उद्यां ही वया

बाहेर जायाची. हं; पोरी असल्या काय नसल्या काय; मेल्या वाढवाव्या, वाढवाव्या आणि लोकांच्या गळ्यांत बांधाव्या. एक मुलगा असता—पण नाहीं देवाजीच्या मनांत.

**चंद्रदेवराज.**—अग तूं कां खंत करितेस? त्याच सुखी असोत आणि नीट नांदोत म्हणजे झालें. लोकांच्या गळ्यांत बांधायाच्या म्हणतेस, परंतु ज्यांच्या गळ्यांत हे मंतरलेले ताईत असतात त्यांच्या सर्व मानसिक दु:खबाधा नाहींशा होतात. या गळ्यांत बांधलेल्या ताइतांना पुरुष किती जपत असतात बरें? आम्हीं कशाला बोलून दाखविलें पाहिजे? आमच्या ताइताला ठाऊक आहेच.

**अहिल्याबाई.**—पुरे; (एवढंच) पुरुषांना तेवढें गोड-गोड, गोडगोड बोलायाचें ठाऊक असतें;—पण बाई मला आतां अशी डोंगराएवढी काळजी येऊन पडली आहे. या आपल्या प्रभावतीला एकदा शाहणा सुरता नवरा मिळाला म्हणजे सुटलें, मग देवा दाखविलींस तिचीं दोन लेकरें तर दाखीव, न दाखविलींस, तर न दाखीव. (चंद्रदेवराजाकडे बोट करून) अशीं डोळे मिटवून अखेरी साधीव म्हणजे झालें. सगळा शेवट गोड झाला.

**चंद्रदेवराज.**—प्रभावतीला कसा चांगला नवरा मिळेल हीच काळजी रात्रंदिवस मला लागली आहे. दुसरें कांहीं सुचत नाहीं. हिला आतां पंधरावें वर्ष लागलें असेल नाहीं?

**अहिल्याबाई.**—हो, पंधरावें आखाडांतच लागलें. मनांतून असें आहे कीं, जा मेलें, आतां एवढीच उज-

बापाची राहिली आहे, कसेंही करून इचें थाटामाटानें लग्न करावें.

**चंद्रदेवराज.**–अग या सर्व राज्याची न्यायाधिशीण तूं, तुला देवानें कमी केलें आहे! म्हणशील तसा समारंभ करीन. त्याजविषयीं काळजी नाहीं, परंतु हिजसमान रूपानें आणि गुणानें असा कोण शोधून काढूं? बरं आपण तसाही शोधुन कोणी काढिला आणि त्यावर जर तिचें प्रेम नसलें तर काय उपयोग? ज्याच्या स्वाधीन आपण गाय करणार तो आपणाला जरी गोपाल वाटला तरी जर तिला कसाव वाटतो तर त्यापासून तिला कोणतें सुख प्राप्त होणार! शिवाय कुलीन क्षत्रियांत कन्येच्या मताशिवाय तिचें लग्न झालेलें कोठें तरी पाहिलें आहेस? या सर्व गोष्टी मनांत आल्या म्हणजे असें वाटतें कीं, जेव्हां प्रभावतीला आणि तिच्या नवऱ्याला एकमेकांकडे वांकडी दृष्टि करून पाहतांना आणि चोरून हंसतांना पाहीन तेव्हांच हा जीव खालीं पडेल.

**अहिल्याबाई**–तें खरें, पण लांबण इकडूनच चालली आहे. राजे मानकरी मागणीं घालघालून जातात; पण येथेंच निश्चय होत नाहीं. आतां ही वाटाघाट तरी किती दिवस चालायाची बाई कोण जाणे. एकदा कसेंही करून लवकर ठरवावें गडे.

**चंद्रदेवराज**–वेडीग वेडी, अगदी वेडी आहेस.

**अहिल्याबाई**–आज समजलें का?

**चंद्रदेवराज**–अग तर असें पाहा, कीं ज्यांच्यानें माझ्या सारख्या जुन्या भोळ्या म्हाताऱ्याचें स्थिरावलेलें

मन वश करवेना ते त्या नव्या चाणक्ष तरुण पोरीचें चंचल मन कसें वश करितील ? आजपर्यंत ज्यांच्या साइया माटीं झाल्या ते सर्व एकापेक्षां एक असे महाशांख आहेत. कोणी बापाच्या लौकिकावर आले, कोणी चुलत्याच्या, कोणी आजाच्या; कोणी इनामाच्या जोरावर, कोणी हत्ती घोड्यांच्या मदावर, कोणी अधिकाराच्या तोऱ्यावर, जितके येताल तितके माझी लक्ष्मी पाहा, माझें वैभव पाहा असें म्हणतात; परंतु इला वाहाण्याकरितां आणलेलें हें माझें सुमन पाहा असें कोणीही म्हणत नाहीं. अशा नवऱ्याला घेऊन ती काय करील, व अशा जावयाला घेऊन तूं काय करशील ? जर आज कोणा मूर्खाच्या स्वाधीन केली तर पुढें तिच्या पासंगासही न पुरणाऱ्या, परंतु आपआपल्या नवऱ्यांच्या शहाणपणावर थोरवी पावलेल्या अशा स्त्रियांकडे पाहून माझी प्रभावती कपाळावर हात मारून घेईल आणि बाबांनीं पैक्याशीं माझें लग्न लावलें म्हणेल, तेव्हां ते तिचे तिखट वाग्बाण मला देवलोकाहूनही ओढून काढितील. याकरितां तुला वारंवार सांगत असतों कीं, उतावळी होऊं नकोस. प्रभावतीचें आजच वय गेलें आहे असें नाहीं. लग्नघटिका चांगली लागली तर बरें, नाहीं तर ती सर्व आयुष्यांतल्या घटका कष्टतर करिते.

**अहिल्याबाई.**—नाहीं, तसें नाहीं; मी कांहीं आज हट्टच घेऊन बसलें असें नाहीं. पण आपला एक पाश विलकाच उरला आहे—परंतु असें असेल, तर नाहींग बाई अशा मेल्या ढला माझें लेकरूं देणार! त्या परीस लागला

थोडा उशीर तर लागला—एवढेंच कीं, झालें आणि लवकर झालें म्हणजे दिसायालाही लोकांत अंमळ, दुसरें काय ?—पण हो गडे बरी आठवण झाली, आज आतांच वाड्यांतून आज्ञापत्र घेऊन हुजऱ्या आला होता. जवळच द्या बरें, बाईसाहेब, खुद्द महाराजांनीं लिहून दिलें आहे म्हणाला. मग काय आहे कोण जाणे?—असा गडे माझा विसराळू स्वभाव आहे. आपली तेव्हांच गेलें विसरून.

**चंद्रदेवराज.**—कोठें, कोठें आहे, आण पाहूं. लवकर लवकर आण.

**अहिल्याबाई**—आतां आणतें पण ! (आणून देते).

**चंद्रदेवराज.**—( पत्र वाचून ) उद्यां जरूर जरूर बोलाविलें आहे.

**अहिल्याबाई.**—कशाचें आमंत्रण आलें हें! कांहींना कांहीं बाई आपलें काम उभेंच. कोठें तंटा तोडायास बाहेर गांवीं तर जायाचें नाहींना ?

**चंद्रदेवराज.**—बहुधा तसेंच असावें.

**अहिल्याबाई.**—जा बाई, या मेल्या फिरण्यानेंच त्रास दिला आहे.

**चंद्रदेवराज.**—मग आम्ही उगीच म्हणतों कीं, चाकरी चाकरी काय, सुळावरची पोळी ?

**अहिल्याबाई.**—अहाहा !

**चंद्रदेवराज.**—अहाहा म्हणजे यांत कांहीं संशय आहे कीं काय ?

**अहिल्याबाई.**—मग कशाला करावी तर ! पण आशा कोठें सुटते ? तोंडानेंच बोलावें तेवढें. महिना

महिना, दोन दोन महिने बाहेर असायाचें तर कांहीं असें वाटत नसेल कीं, नको बाबा आतां ही दगदग; झाली मेली पुष्कळ चाकरी. आतां आपला स्वस्थ हरि हरि म्हणत बसेन. खरें आणखी किती दिवस करायाची ही चाकरी ?

**चंद्रदेवराज.**—एवढें या प्रभावतीचें लग्न झालें म्हणजे मला चाकरी नको आणि फाकरी नको. जाईन एक दिवस महाराजांपाशीं, घट्ट पाय धरीन आणि विनंती करीन कीं, इतके दिवस आपल्या इच्छेनें आणि भगवंताच्या कृपेनें या दासानें एकनिष्ठ भावानें स्वामिसेवा केली. आतां वयातीत झाला आहे व शक्तिही गेली आहे, तर खात्रीस पडल्यास जामातांना आश्रय देऊन याला घरीं बसण्याची आज्ञा व्हावी. तुला खरेंच सांगतों, प्रभावतीसाठीं म्हणून या संसारांत माझा जीव गुंततो; वय लहान, पण त्या पोरीला जें शहाणपण आहे तें मोटमोठ्या बायकांना सुद्धां नसेल. तिला सद्गुणसंपन्न नवरा मिळाला म्हणजे मग परलोकाशिवाय दुसऱ्या कशाची इच्छा करीत नाहीं.

**अहिल्याबाई.**—असें काय मेलें अभद्र बोलावें गडे !

**चंद्रदेवराज.**—अग, अभद्र कशाचें, तें उघडच आहे. आतां सांगतों एवढें काम कर. युक्तीनेंच एकांतीं प्रभावतीशीं बोलतां बोलतां लग्नाच्या गोष्टी काढ आणि म्हण कीं, अमक्या अमक्याला तुला द्यावी असा माझा फार हेतु आहे. हें ऐकून तिची मुद्रा कशी होते, ती कशी हालते, कशी बोलते, तें सारें बारीक ध्यानांत घे आणि युक्तिप्रयुक्तीनें तिचें हृद्-

त काढ. मी वाड्यांतून जाऊन येतों. आठवण राहील? ए विसराळू, आठवण राहीलना?

**अहिल्याबाई.**—पाहा पाहा, कसें आहे तें! एकाद्याला वाटावें हिला मेलीला कशाचीच आठवण राहत नाहीं; पण येणें केव्हांशी होईल.

**चंद्रदेवराज.**—येईन तेव्हां.

**अहिल्याबाई.**—पाहा कसें सरळ बोलणें आहे!

**चंद्रदेवराज.**—आतां आलें आहे तुझ्यामनांतून भांडायाचें. जाऊंदे कसें?

**अहिल्याबाई.**—आणखीं माझ्याच मनांतून आलें आहे! पाहा कसा उफराटा न्याय.

**चंद्रदेवराज.**—बोलतच उभा राहिलों तर संध्याकाळपर्यंत सोडणार नाहींस. (जातो.)

---

## प्रवेश २.

### राजा आणि चंद्रदेवराज.

**राजा.**—या चंद्रदेवराज, कालचें पत्र पोहोंचलें?

**चंद्रदेवराज.**—आज्ञेनुरूप हजर झालों आहें.

**राजा.**—न्यायखात्यांतलें कामकाज कसें, सुरळीत चाललें आहेना?

**चंद्रदेवराज.**—सुरळीत चाललें आहे, मग महाराजांच्या नजरेस काय येत असेल तें खरें.

**राजा.**—आपण असल्यावर आमच्या काय बावगें नजरेस यावयाचें आहे? तें असो; परंतु तूर्त आपणांवर एक शब्द टाकावा असें मनांतून आहे.

**चंद्रदेवराज.**—महाराज, हें अवकृपेचें बोलणें दिसतें.

सेवकावर शब्द टाकायाचा आहे असें ह्मणणें हा फार संकोच. आपल्या कोणत्याही आज्ञा अशास्त्र नसतात, मग उगाच कां विलंब? महाराजांनीं निःशंक आज्ञा करावी.

**राजा.**—चंद्रदेवराज, काम फार नाजूक आहे. येथल्या येथें हो म्हणण्याजोगें नाहीं.

**चंद्रदेवराज.**—पायांपाशीं एकच विनंती. कांहीं असलें तरी आज्ञा व्हावी.

**राजा**—बरें तर सांगतों ऐका; तुमच्या मुलीला वरयोजना आम्ही केली आहे. तुमच्या संमताशिवाय केली याचा मात्र राग नसावा.

**चंद्रदेवराज.**—त्यांत कशाचा राग? महाराज सर्वांचे मायबाप. महाराजांनीं आपल्या लेकराची काळजी वाहिली हें ठीकच झालें.

**राजा.**—चंद्रदेवराज, तुम्हांला असा जावई शोधून काढला आहे कीं, राज्यांतले यच्चयावत् आईबापही तुमचा हेवा करितील. मग यच्चयावत् कन्या प्रभावतीचा करितील हें कशाला सांगावें? माझ्या कपाळीं जर कन्यारत्न असतें तर तेंच त्याला अर्पिलें असतें; परंतु नाहीं तेव्हां उपाय नाहीं. प्रभावतीवर पोटच्या लेकीसारखीच माझी ममता आहे याकरितां एवढें कन्यादान माझ्या हातून करवा.

**चंद्रदेवराज.**—काय हा गौरव महाराज! आपण जें कराल तें यथायोग्यच कराल. ज्या भाग्यवान पुरुषानें आपली कृपा साधिली, त्याला प्रभावती दिली असतां आपण ठीकच केलेंसें होईल. सेवकाची एक मात्र विनंती आहे ती स्वामींनीं ऐकिली पाहिजे.

**राजा.**—काय, बोला.

**चंद्रदेवराज.**—ज्या सर्व क्षत्रियगणांचे आपण रवि आहां, त्या सर्व क्षत्रियगणांत पुरातन कालापासून चाल चालत आली आहे कीं, कन्येचा विवाह व्हावयाचा तर तिच्या मनोदयानुरूप व्हावा. तेव्हां महाराजांनीं तिचें अनुमोदन घ्यावें. महाराजांच्या इच्छेस ती आड येणार नाहीं, कारण ती आपणांस पित्यासारिखेंच लेखिते. विनंती बोलण्याविषयीं आज्ञा झाली ह्मणून कानावर मजकूर घातला.

**राजा.**—(हंसून) बहुधा या विनंतींत सर्वच मागून घेतलें.

**चंद्रदेवराज.**—देणारे समर्थ म्हणून मागणारे मागतात. आमच्या जावयांचें नांव गांव विचारण्याविषयीं परवानगी असावी.

**राजा.**—धान्याधिपति जयपाळराज, ज्यांच्या शहाणपणाची व सद्गुणांची सर्व मुलखांत ख्याति झाली आहे.

**चंद्रदेवराज.**—जयपाळराज, धान्याधिपति जयपाळराज !

**राजा.**—होय.

**चंद्रदेवराज.**—महाराज, माझें पूर्ण समाधान झालें. ईश्वर तिला त्याच पुरुषाविषयीं बुद्धि देओ म्हणजे झालें. आहा, जयपाळराज जर जावई मिळेल तर मग आणखी काय पाहिजे ? आजपर्यंत ज्यांनीं मागणीं घातलीं त्यांतून एकालाही त्याच्या नखाग्राची सर नाहीं. महाराज, तिचा मनोदय समजून घेऊन विनंती करण्यास पुनः उदायिक येतां.

**राजा**.—कुलानें, शीलानें, वयानें, रूपानें सर्व गोष्टींनीं हा मी योजिलेला जोडा समान आहे.

**चंद्रदेवराज**.—महाराज यथार्थ बोलतात.

**राजा**.—सख्य अशांचंच होत असतें. ही जयपाळराजांची प्रतिमा घेऊन प्रभावतीला दाखवा. प्रतिमांनीं पुष्कळांचीं कामं झालेलीं आहेत.

**चंद्रदेवराज**.—( हंसून, ) अनुभव आहेच. येण्याची आज्ञा असावी.

**राजा**.—बरें आहे.

( चंद्रदेवराज जातात. )

---

## प्रवेश ३.

### राजा आणि जयपाळराज.

**जयपाळराज**.—मुजरा करतों महाराज.

**राजा**.—या धान्याधिपति, बसा.

**जयपाळराज**.—आज्ञा, बसतों.

**राजा**.—आतां या आमच्या चातकवत् प्रजांना तुम्ही आमचे धान्याधिपति मेघवत् आहां.

**जयपाळराज**.—महाराजांसारखी दयाळु वरुणमूर्ति प्रसन्न असतां मेघांना काय तोटा ? हजारो मेघ उत्पन्न होतील.

**राजा**.—तें खरें; परंतु हा यथाकालीं उत्पन्न झालेला मेघ प्रसादिक दिसतो. याजकडे सहज पाहिलें असतां असा भास होतो कीं, वत्सलतारूप जीवनानें हा डवडवलेला आहे. जसा तो मेघ अवचित, अवर्षण पडलेल्या स्थळीं जातो तसाच हाही जाईल अशी

चित्ताची पक्की खात्री होते, याजकरितां ईश्वर करो आणि या एका मेघापासून भूतलाचा दाह हरण करणाऱ्या अशा या सदृश अनेक मेघावलि उत्पन्न होओत; ( हंसून )-कां जयपाळराज, कां बोलत नाहीं.

**जयपाळराज.**—महाराजांचा पूर्ण मनोदय समजलों नाहीं.

**राजा.**—( हंसून ) ज्यांना स्वप्नांचीं अत्यंत क्लिष्ट गूढें समजतात त्यांना हें साधारण बोलण्यांतलें क्षुद्र गूढ समजणें कठीण खरेंच! आतां उघड करून सांगतों तर. आमच्या मनांतून तुमचा विवाह व्हावा असें आहे, यावर तुमचें कांहीं म्हणणें असल्यास कळवा.

**जयपाळराज.**—महाराजांपाशीं विनंती करण्यास हा दास असमर्थ आहे.

**राजा.**—असमर्थ कां? बायको कशी मिळेल ही शंका मनांत क्षणभर सुद्धां आणूं नका; कारण थोडक्यांत सांगतों ती रूपानें व गुणानें केवळ भूदेवता होय. तिच्याशीं विलास भोगितांना तुम्हांला असें वाटेल कीं, हे भोग इंद्रास नंदनवनांत इंद्राणीपासूनही प्राप्त होत नसतील. प्रभावती हें अमोल्य रत्न तुमच्या कंठीं पाहावें अशी आमची व या राज्यांतील सर्वांची इच्छा आहे. बोला, विवाहनिश्चयाच्या प्रसंगीं अधोमुख शोभत नाहीं.

**जयपाळराज.**—महाराज, माझा सर्व वृत्तांत मी पायांपाशीं विदित केला आहे.

**राजा.**—नाहीं कोणी म्हटलें?

**जयपाळराज.**—त्यावरून माझें कुल जरी प्राचीन

कालापासून नामांकित आहे तरी धनसंपन्न नाहीं हें दृष्टोत्पत्तीस आलेंच असेल. महाराजांचा वाडा जिला माहेरासारखा तिला सासरही त्याच जोडीचें पाहिजे.

**राजा.**—या गोष्टीची काळजी माहेरच्या माणसांनीं वाळगावयाची.

**जयपाळराज.**—मी या मुलखांतला राहणारा नाहीं.

**राजा.**—क्षत्रियकन्या आपल्या पतीपाशीं वास करण्यासाटीं सप्तसमुद्रही धिक्कारितात.

**जयपाळराज.**—अशा, शुद्ध दैवावर हवाला टेवून आलेल्या प्राण्यास तशा योग्यतेची कन्या साजणार नाहीं.

**राजा.**—अशा शुद्ध भलाईवर हवाला ठेवून वाढलेल्या प्राण्यास तशा योग्यतेचीच मात्र कन्या साजेल.

**जयपाळराज**—महाराजांनीं माझी ही विज्ञप्ति मान्य केलीच पाहिजे. (सुस्कारा टाकितो.)

**राजा.**—धान्याधिपतींनीं माझी ही आज्ञा ऐकिलीच पाहिजे—कां, कष्टी झाल्यासारिखा सुस्कारा कां टाकितां? जयपाळराज, स्त्रीरत्नाच्या मोलाविषयीं तुम्ही इतके अजाण आहां काय? अहो ज्याला त्या सुखाचा अनुभव नाहीं, तो यावज्जन्म बापुडाच खरा. त्याणें ऐहिक सुखांचा अत्युत्तम मासलाच पाहिला नाहीं. स्त्री सर्व सुखांचें माहेर असें जें म्हटलें आहे तें यत्किंचितही खोटें नाहीं. ज्या घरामध्यें ती वास करीत नाहीं तें घर भव्य सुशोभित इमारत असूनही गोसाव्याची मटीच; आणि जेथें ती वास करित तें घर जरी मोडकी धर्मशाळा असलें तरी महालक्ष्मीचें वासस्थानच.

जयपाळराज, त्या शून्य मंदिरांत तुमचा वेळ तरी कसा जातो ?

**जयपाळराज.**–महाराजांनीं स्त्रीसुखाचें यथार्थ वर्णन केलें, परंतु.–

**राजा.**–जर तुम्हांला यथार्थ वर्णन वाटतें तर मग परंतु कां ? मग त्याविषयीं इतके उदासीन कां ? सेनापतीच्या येथें जो चमत्कार पाहिला त्यापासून स्त्रियांविषयीं मला वाटतें, तुमचें मन विटलें.

**जयपाळराज.**–नाहीं. महाराज असें कसें होईल.? कमळजाबाई अत्यंत गुणसंपन्न होती. मग तिच्या कारणानें स्त्रियांच्या ठिकाणीं मन कसें तिटकारा घेईल. स्त्रिया स्वभावानें जात्या सरल व निष्कपट असतात, यामुळें एकादे वेळीं त्यांतून एकादी मायिकाच्या जाळ्यांत गुंतून पडते म्हणून मी सर्वांवर आरोप ठेवणारा नव्हे.

**राजा.**–तर मग माझा एकच प्रश्न. विवाहकार्याच्या गोष्टी काढिल्या असतां तुम्ही औदासीन्य कां धारण करितां ?

**जयपाळराज.**–महाराजांचा आग्रहच दिसतो त्याअर्थी विनंती करितों. आपण हंसाल म्हणून इतकावेळ लाजत होतों.

**राजा.**–कां वरं, लाजण्याचं कारण काय ?

**जयपाळराज**–कामदेवाच्या गोष्टी समवयस्कांपाशींच असाव्या.

**राजा.**–हं हं ? एकूण तुमचें हृदय तुमचें नाहीं असें बोलण्याचा भाव. हा नवाच बूट निघाला. आम्ही घटवटना जी ही मांडिली आहे ती व्यर्थच तर!

असें; तरी म्हटलें जयपाळराज इतके आळेपिळे कां घेतात !

**जयपाळराज.**—( हंसून ) यासाठींच विनंती करि-त नव्हतों.

**राजा.**—जयपाळराज, तर मग आतां सांगाच; कोणत्या कुशल रमणीपाशीं तुमचें चित्त हरपलें ? कोणती महाभाग्यशालिनी तुमच्या अंतःकरणमंदिरांत विहार करिते ?

**जयपाळराज.**—महाराज, यापेक्षां कोणती दुष्ट तुम्हांवर कोरडा चालविते, कोणती कृत्या तुम्हांवर इंगा फिरविते असें म्हटलें असतां अधिक शोभेल ?

**राजा.**—खरें म्हणतां. आम्हांला वाटत होतें कीं, तुम्ही अझून मोकळेच आहां; त्या कुठल्या घेरल्याशिवाय राहायाला! हा तुमचा वृत्तांत आजपर्यंत तुम्हीं आम्हांपाशीं चोरला होता. बोला आतां.

**जयपाळराज.**—काय बोलूं महाराज? आपल्या राज्यांत नुक्ताच आलों होतों आणि सेनापतींच्या येथें नुक्ताच राहिलों होतों, तों सेनापतींनीं वाघाच्या शिकारीचा समारंभ केला. तो समारंभ पाहण्यास कितीएक कुलीन स्त्रियाही आल्या होत्या. त्याप्रसंगीं त्यांच्या संरक्षणार्थ जे होते त्यांत मीही उभा होतों पुढें बापांवर प्रसंग गुदरतो अशी जेव्हां हाकाहाक झाली तेव्हां, मी पुढें सरलों आणि भगवदिच्छेनें तो वाघ मारिला. तेव्हां त्या तेथील प्रसन्न झालेल्या स्त्रियांत अतिलावण्यसंपन्न एक कुमारी पाहिली. तिला पाहतांच अज्ञातपूर्व असा चमत्कारिक विकार मनांत

उद्भवला. असें वाटूं लागलें कीं, विधीनें गांठ मारिलीच असेल, तर इलाच योजून मारिलें असेल. त्यावेळीं पुष्कळ विवेक केला; परंतु हा मनाचा ग्रह जाईना. असें पुष्कळ म्हणून पाहिलें कीं, अरे मूर्खा, ती कोणा राजकुलाचें भूषण असेल; आणि तूं भडक्या मारीत फिरणारा भिकारी आहेस. तिची इच्छा धरून कधींही कृतार्थ होणार नाहींस. याकरितां तिची मूर्ति विसर आणि आपल्या कामधंद्यास लाग. असा बहुत प्रकारें विवेक केला; परंतु हें ओढाळ मन उपदेशास आंवरेना. कांहीं करावयास लागलों तथापि त्याणें तेथें धांव घ्यावी. तें चक्र, तो समाज, ती स्त्रियांची जागा; ती तिची उभी, वांकून, अतिहर्षानें शिकारीकडे पाहणारी मूर्ति,—हीं डोळ्यांपुढून जाईनात. मग त्या दिवशीं शपथ वाहून घेतली कीं, ही जी कोणी माझें मन चंचल करणारी, हीच जर प्राप्त होईल तर मात्र स्त्रीसुखाचा अनुभव घ्यावयाचा. नाहीं तर संसारांत असून विरक्तपणांत दिवस घालवावयाचे. हा कृतसंकेत निष्फल न व्हावा म्हणून महाराजांपाशीं विनंती करीत होतों.

**राजा.**—फार उत्कृष्ट संकल्प.

**जयपाळराज.**—महाराजांच्या आग्रहावरून हा माझ्या अंतःस्थितीचा गुह्य वृत्तांत चरणापाशीं विदित केला. आतां पुनः विज्ञप्ति करितों कीं, स्वरत राहण्याचा माझा निश्चय महाराजांनीं पार पाडावा.

**राजा.**—जयपाळराज, तुमचा सर्वच इतिहास चमत्कारिक आहे, मग हाही कां नसेल? त्या सुंदरीचें नांव गांव तुम्हांला माहीत आहे?

**जयपाळराज**.—महाराज, तें कांहींएक ठाऊक नाहीं. आपली कृपा या पदवीस चढेल हें स्वप्नांत सुद्धां नव्हतें, तेव्हां तिच्या प्राप्तीचा दिवस येईल असें मी समजलोंच नाहीं, आणि म्हणून ती कोण, कोणाची मुलगी, कोठें राहते, कोठें वागते या गोष्टीचा मी बिलकुल शोध केला नाहीं.

**राजा**.—अशा शपथा त्रेतायुगांत व द्वापारयुगांत दीर्घ हटवादी क्षत्रिय घेत होते असें पुराणांतरीं ऐकितों; परंतु या कलियुगांत कोणी असा बाणेदार बहादर असेल असें वाटत नव्हतें. आतां हा हट्ट सोडा, आणि संसाराचें अवलंबन करून गृहस्थाश्रमाचे धर्म स्वीकारा.

**जयपाळराज**.—महाराज सर्वांचे धर्मपालक आहेत.

**राजा**.—हें वेडें बोलणें मला नको.—(प्रभावतीच्या प्रतिमेकडे पाहून) काय अमोलिक रत्न हें. ही पाहतांच तुमच्या हृदयसिंहासनावर बसलेली तत्काळ पदच्युत होईल. ही मूर्तिमंत महालक्ष्मी पाहा. (प्रतिमा पुढें करितो)

**राजा**.—हं हं, धान्याधिपति, भलत्याच स्त्रीवर डोळे कसे खिळितां! अझून रखून पाहाणें संपत नाहीं! ठीक नव्हे हो ठीक नव्हे. (मोठ्यानें हंसतो.)

**जयपाळराज**.—(हंसून) महाराज विनंति करण्याविषयीं आज्ञा असावी.

**राजा**.—काय विनंती?

**जयपाळराज**.—महाराज जो दिवस नेमितील त्या दिवशीं मजकडून तयारी आहे. महाराजांनीं आज मला अत्यंत विस्मयांत घातलें.

**राजा.**—कांहो, एकदम लग्नदिवसावर कसे आलां?

**जयपाळराज.**—महाराज, मला पदोपदीं ईश्वरी साक्ष दिसते. त्याणेंच मजवर कृपा करण्याचें मनावर घेतलें आहे; आणि त्या कामावर आपणांसारिख्या महान समर्थांची योजना केली आहे.

**राजा.**—अहो, काय झालें काय ?

**जयपाळराज.**—साखर खाणारा त्याला देव देणारा! ही प्रतिमा पाहतांच ह्रदयांतील मूर्ति पदच्युत होण्याबद्दल त्याच पदावर अधिक स्थैर्य पावली. ज्या रमणीनें तेथें मन ओढलें, व जी त्या दिवसापासून अझूनपर्यंत मजवर स्वामित्व करिते तिचीच ही छाया. आज महाराजांचे किती उपकार आठवूं ?

**राजा.**—ही फार चांगली नीति बाबा. सुंदरशी बायको दिसते तर म्हणालें चला आमची ती हीच म्हणूं! खासा न्याय !

**जयपाळराज.**—आतां थट्टेला भिऊन काय होणार?

**राजा.**—आतां शपथेचें तर देणें कांहीं उरलें नाहींना ?

**जयपाळराज.**—महाराजांपासून देणगी घेणें मात्र उरलें आहे.

( चंद्रदेवराज आंत डोकावतात. )

**राजा.**—कोण आहे, कोणी डोकावलें ?

**चंद्रदेवराज.**—एकांत चालला असल्यास आणखी घटकाभरानें येईन.

**राजा.**—एकांत खरा; परंतु त्यांत तुमचीही गरज आहे. या बसा. कसें काय ?

**चंद्रदेवराज.**—आतांच विनंती करूं ?

**राजा.**—कां, कांहीं हरकत आहे काय ?

**चंद्रदेवराज.**—हरकत कशाची ? जिकडेतिकडे आनंदच आनंद करून आलों.

**राजा.**—मग काय तर, बोला सर्व वृत्तांत.

**चंद्रदेवराज.**—प्रथम गोष्ट काढतांच प्रभावतीनें चिमणीसारखें तोंड केलें. तिची मुद्रा फिक्की पडली. डोळे लांब केलेन आणि तिजकडे दीनासारखी तटस्थ पाहूं लागली. नंतर अग प्रभावती असें काय, असें काय, बोल असें जेव्हां लाडुकपणानें विचारिलें आणि अंगावरून हात फिरविला तेव्हां स्फुंदस्फुंदून रडूं लागली आणि म्हणूं लागली कीं, माझा कां इतक्यांत कंटाळा करितां, मला कां इतक्यांत बाहेर घालितां. तिला धान्याधिपतीचें कुलशील सांगितलें, त्यांची पदवी सांगितली, त्यांचे गुण सांगितले, त्यांच्यावर लोकभक्ति किती आहे, राजभक्ति किती आहे हें सांगितलें, परंतु कांहीं केल्या तिची समजूत म्हणून पडेना. तिणें एक हट्ट धरिला. "मला इतक्यांत लग्न करावयाचें नाहीं."

**राजा.**—काय चमत्कार पाहा ! मग ?

**चंद्रदेवराज.**—मोठ्या विवंचनेंत पडलों. मग तिच्या आईनें हळूच तिच्या मनांतली गोष्ट काढून घेतली. त्याला तरी पक्का प्रहर लागला !

**राजा.**—पोर बेटी भारी खोल.

**चंद्रदेवराज.**—पक्या प्रहरानें त्या पोरीनें सांगितलें. सांगायला तिला आणखीं एक प्रहर लागला ! त्यांतला सारांश मिळून इतका.—म्हणाली मी गेलें होतें राणीसा-

हेवांवरोवर शिकार पाहायाला. तेथें सेनापतीच्या घरा-ण्यांतल्या कोणी पुरुषानें महाप्रताप केला. आतां तु-म्हांला जर मला द्यावयाचीच तर त्याला शोधून काढा आणि द्या. नाहीं तर पुनः लग्नाचें नांव काढूं नका.

**राजा.**—धान्याधिपति, कसें खडखडीत उत्तर.

**चंद्रदेवराज**—मला हा सर्व इतिहास आपणापासून समजलाच होता. मग ती धान्याधिपतींची प्रतिमा काढून तिला दाखविली. ती पाहतांच, काय चमत्कार सांगूं तुम्हांला जयपाळराज? बेटा फिक-टपणा एकदम कीं हो पळाला! खुदकन् हंसली आ-णि चटकन् आम्हांकडे पाहून एका निमिषमात्रांत हंसत हंसत खालीं पाहूं लागली. मग काय तें आईचें ह्रदय! तिणें प्रभावतीला घट्ट पोटाशीं धरिलें; आणि तिचीही हंसतां हंसतां पुरेवाट झाली. त्यांचा तो आनंद पाहून माझेंही ह्रदय भरून आलें. मलाही वाटूं लागलें कीं, आज मी कृतार्थ झालों. आज माझ्या मुलीला यथायोग्य नवरा मिळाला. आतां जामातांकडून काय उशीर असेल तो असो.

**राजा.**—( हंसून ) जामात तर एका पायावर उभेच आहेत. ते म्हणतात उद्यांच मुहूर्त असेल तर फार चांगलें.

**चंद्रदेवराज.**—तर मग महाराजांनीं मुहूर्ताची यो-जना करावीच. प्रभावती महाराजांचीच मुलगी असें समजावें. जयपाळराज, आजपर्यंत तिचें आम्ही पाल-णपोषण केलें. आतां ती आम्हांला दूर व तिला आम्ही दूर असें होणार. आपल्या पदरांत आपण घेतां त्या-

अर्थी नीट तिचें संरक्षण करावें हें सांगणें नकोच; परंतु पोटचा गोळा म्हणून माया बोलविते. आमच्या पाशीं काय, बाळपण काढिलें; परंतु आतां तिचा सर्व जन्म आपणांपाशीं जावयाचा. तेव्हां तिच्यावर कृपादृष्टि असावी. तुम्ही दोघें नीट नांदा आणि आमचा आणि तुमच्या पित्याचा दोघांचाही नीट शेवट करा म्हणजे झालें.—प्रभावतीचा स्वभाव,—आतां आमची तर मुलगीच, आम्ही काय सांगावें; परंतु सहवासाअंतीं समजेल,—फार गरीब. अत्यंत गरीब. असें नाहीं असें, असें सुद्धां म्हणणार नाहीं. अशी आपल्या आज्ञेंत राहील कीं, आपण तर नवल करालच; परंतु सर्व लोक नवल करितील. असो; सारांश काय, सर्वस्वी पदरांत घातली आहे. सांभाळ करणें आपणांकडे.

**जयपाळराज.**—भगवंता, असे धनी, असे श्वशुर आणि अशी धर्मपत्नी तूं देतोस आणखीं या जगांत कोणतें सुख मागावयाचें राहिलें? हे मला साजतील अशी योग्यता मात्र दे.

**चंद्रदेवराज.**—महाराज, आज्ञा घेतों आतां.

**जयपाळराज.**—मीही आज्ञा घेतों. माझ्याकडचा सर्व भार महाराजांवर आहे. (जातात.)

---

## प्रवेश ४.

### नरहरदेव आणि जयगोविंददेव.

**नरहरदेव**—कां जयगोविंददेव, आतांशी स्वारी असते कोठें? लग्नसमारंभांत दंग असाल. काय महाराजांनीं थाट दिला होताहो उडवून! एकूण राजकु-

ळांतल्या पुरुषाचें देखील अशा तडाक्यानें लग्न होत नसेल.

**जयगोविंददेव.**—अहो तें काय पुसतां. जिकडे पाहावें तिकडे गर्दीच गर्दी. काय माणूस रावत होतें कांहीं अंत आहे ? ज्याला त्याला असें वाटे कीं, या कार्यांतलें थोडें बहुत जितकें आपण काम उचलूं तितका प्रसादच समजावयाचा.

**नरहरदेव.**—खरें बाबा. अहो त्या जानोसघरांत पुढच्या दारून मागच्या दारीं जर जावयाचें असलें तर ही अशी दोहों हातांनीं मंडळी दूर करावी लागत असे.

**जयगोविंददेव.**—जेव्हां अंतरपट धरला, ब्राह्मण मंगळाष्टकें ह्मणूं लागले, सुस्वर वाद्यांचा गजर चालू झाला, तोफांची आणि बंदुकांची फेर झडूं लागली, तेव्हांचा काय चमत्कार सांगूं तुम्हांला ? त्या वाड्याच्या चाऱ्ही बाजू "सुमुहूर्त सावधान" अशा शब्दांनीं नादावल्या, आणि जिकडून तिकडून अक्षतांची वृष्टि झाली. अहाहा, असा महोत्सव आपण तर पूर्वी कधीं पाहिला नव्हता. केवळ शुद्ध निर्मल आनंदानें घर भरून गेलें; आणि हें आपल्या कन्येच्या विवाहसमयीं असें पाहून तीं उभयतां वृद्ध मातापितरें आनंदाश्रु ढाळूं लागलीं. अहिल्याबाईच्यानें तर रडूं आवरेना. कन्येकडे पाही, जामाताकडे पाही आणि डोळ्यांवाटें पाणी काढी.

**नरहरदेव.**—आणि वधू ?

**जयगोविंददेव.**—ती तर पूर्ण विधुच दिसत होती.

विची सुप्रभा पाहून असें वाटलें कीं, धन्य जयपाळराज. पूर्वजन्मींची तपश्चर्या सबळ म्हणून अशी नक्षत्रांना लाजविणारी प्रिया त्यांना प्राप्त झाली. तिच्या चर्येवर हर्ष व खेद दोनही विकार स्पष्ट झाले होते. मुखश्री तेजःपुंज आणि नेत्र उदकानें भरलेले. कोणी म्हणेल तेथून वाहणाऱ्या उदकधारांनींच ही पुष्पवटिका इतकी प्रफुल्लित केली कीं काय कोण जाणे!

**नरहरदेव.**—यांत इतकेंच कमी पडलें कीं, वास्तविक वऱ्हाडी म्हणायास कोणी नव्हते. हा सोहळा पाहण्यास जयपाळराजांचे मातापितर असायाचे होते.

**जयगोविंददेव.**—या गोष्टीची त्यांनाही थोडी खंत वाटली. असाच उद्गार त्यांणीं मुखांतून काढला होता.

**नरहरदेव.**—अहो, असें सर्वच यथास्थित कसें असेल? या लोकींची कांहीं तरी खूण पाहिजे कीं नको?—बरें आतां आपली नेमणूक कोणीकडे आहे?

**जयगोविंददेव.**—आतां इकडे धान्यखात्यांत नेमणूक झालीना!

**नरहरदेव.**—ही कशीकाय तजवीज केली आहे?

**जयगोविंददेव.**—या राज्यांतील सर्व प्रांतांत ज्या त्या गांवीं हरतऱ्हेच्या धान्याचीं कोठारें घालण्याविषयीं हुकूम झाला आहे. त्यांत दर दहा गांवच्या कोठाऱ्यांवर एक धान्याधीश नेमिला आहे. दहा धान्याधीशांवर एक धान्याधिपति आणि या सर्वांवर मुख्य प्रधान महाधान्याधिपति जयपाळराज.

**नरहरदेव.**—यांत तुमची कशी काय योजना झाली आहे?

**जयगोविंददेव.**—तुम्हांला मनाजी नाईक टाऊक असतील—काय बेटा नशीबाचा जोर आहे पाहा—पूर्वी या मनाजीची साठ्या प्याद्यांत नेमणूक होती. पुढें आपल्या एकनिष्ठ स्वभावानें व शहाणपणानें पन्नास प्याद्यांत नाईक झाला. आतां जयपाळराजांचा उदय होतांच एकदम धान्याधीशाची पदवी प्राप्त झाली—इतकें खरें कीं, जरी लिहिणें पुसणें जितक्यास तितकेंच, तरी मोठा धूर्त व सरळमार्गी—या धान्याधीशाच्या हाताखालीं मुख्य लेखकाची जागा आम्हांस दिली आहे.

**नरहरदेव.**—कायहो, मनाजीची तेथें इतकी तारीफ कोणी केली? कोणाचा वशिला पोहोंचला?

**जयगोविंददेव.**—त्यांची त्याची पूर्वींचीच ओळख आहे. मागें कधींकाळीं जयपाळराजावर माणकोजीनीं कांहीं उपकार केले आहेत असें म्हणतात. मग काय असेल ईश्वर जाणे.

**नरहरदेव.**—बरें, आपलें ठाणें कोणतें?

**जयगोविंददेव.**—हेंच शहर. आणि आसपासचे नऊ गांव, ठाणें शहरच.

**नरहरदेव.**—येऊं आम्ही एक दिवस मौज पाहायाला.

**जयगोविंददेव.**—ठीक आहे. धान्यें काय, जिकडून तिकडून आणून ओतिताहेत. प्रातःकाळापासून सायंकाळपावेतों खळ नाहीं.

**नरहरदेव.**—येतों आतां. नमस्कार. (जातात.)

# अंक ५.

## प्रवेश १.

(स्थल)–धान्याधीशाची कचेरी.

**पहिली भिकारीण.**–दादा, तुमास्नी मस्त पुन्न लागल. ह्ये पाठीवर ल्येकरू बगा, ह्ये काकत, आज दोन दीस काइ न्हाई–

"माज्या दादाला लागल पुन्न;
माजा दादा व्हइल धन्न;
माज्यां दादाला न्हाई उन्न;
माजा दादा देतो जुन्न"–

दादा, काइच न्हाई या लेकरास्नी. रातभर खुडखुडखुड करत्यात.

**पहिला कारकून.**–अग जा जा तिकडे जा. येथें काय आम्ही जुन्यापान्याचें दुकान घातलें आहे?

**पहिली भिकारीण.**–अस का जी म्हंगता? मुठभर खायाला तरी द्या, काइच न्हाई.

**दुसरा कारकून**–अग बाई तिकडे जा. तो दोत उघडला आहे पाहा.

**दुसरा भिकारी.**–नारायणा, कृपा कररे देवा.–नमस्कार हो महाराज.

**पहिला कारकून.**–नमस्कार.

**दुसरा भिकारी**–लांबून तिकडून श्वेतनगराहून आलों. कोणाचा आधार नाहीं. दोन मुठी धान्य द्याल तर पाहा, ब्राह्मण वांचतो. भगवंता तुझी मर्जी आणीक काय!

**पहिला कारकून.**—कोण बेटी कटकट! अरे इकडे काय आहे! कोणरे बाहेर, कोणी गुमास्ते आहेत कीं नाहींत?

**दुसरा कारकून.**—भटजी बोवा, दक्षणेचें काम तिकडे चाललें आहे. तिकडे जावें.

**दुसरा भिकारी.**—ठीक आहे. नमस्कार.

**पहिला कारकून.**—नमस्कार.

**पहिला गुमास्ता.**—पंचाण्णव, शाण्णव; शाण्णव, सत्याण्णव; ठेवा ठेवा येथेंच ठेवा. तुझ्या सत्याण्णव गोण्या झाल्या, अॅ. चलरे, तुझ्या मोज. एक, एक; दोन—चल लवकर आटोप.

**जयगोविंददेव.**—किती उपसल्यारे आज गोण्या? हं, आळसूं नकारे बाबांनो, झपाझप काम चालूंद्या. आली संध्याकाळ होत.

**गुमास्ता.**—अग पण थांब बया! अगोदर ह्याला देतों आणि मग तुला. अशी गर्दी नको उडवूं!

**मनाजीराव**—अर, ह्योबी दरोजा खुल्ला करा. जयगोविंदद्येव, आव जयगोविंद—

**जयगोविंद.**—जी.

**मनाजीराव.**—ह्योबी दरोजा खुल्ला करा. येउद्या हिगडवी आरजदार. हा गुमास्ता न्येमा हित. तिगड वगू कस चाललया—भल भल; ठीक हाय.—तुमी कुटलर आरजदार?

**पहिला अर्जदार.**—आमि सरकार तुळजाइच. या पायावगर कुट्ट, कुट कुट्ट थारा न्हायला न्हाई.

**मानाजीराव.**—आन तुमीर?

**दुसरा अर्जदार.**–आमि सरकार गायपुरांतल.

**मनाजीराव.**–(निरखून पाहून) आन् तुमी कुटल ऱ्हानार व ?

**अर्जदार.**–आम्ही दूरचे आहों.

**मनाजीराव.**–आव पन कुटल ?

**तिसरा अर्जदार.**–आम्ही विश्वनगरींत राहात असतों.

**मनाजीराव.**–तरीच!–तलवारीच काय कारन व ? आन् ढालच वी ? लडाइविडाई करायची हाय जनु ! तलवारी काय कारनासाटी !

**तिसरा अर्जदार**–आम्ही क्षत्रिय आहों.

**मनाजीराव.**–व्हइ व्हय, त्ये सार मी जानतो ! हिगड या. तितन उटून हिगड या. तुमी सा असाम्या–आमि इक्त चालिवलया त्ये अशा करता न्हाइ काय ? बर बर ! या माज्या मागन.

**तिसरा अर्जदार.**–आपण काय म्हणतां तें सेव-काच्या लक्षांत आलें नाहीं.

**मनाजीराव**–हिगड या म्हंगतो न्हव ! स्येवक, आन् ह्ये आन् त्ये, बोलनत लई चखोट ! चला या. अशान कुट कारन सादत असत्यात !

**तिसरा अर्जदार.**–आज्ञा ऐकणें येथें भाग आहे. मर्जी असेल तिकडे चलावें.

**मनाजीराव.**–या तर माज्या मागनच या.

(जातात.)

---

## प्रवेश २.

### जयपाळराज, प्रभावतीबाई आणि मुलगा चंद्रकेतु

**जयपाळराज.**—या, या, या ! या तुम्ही लुच्चे !

**चंद्रकेतु.**—अं अं—( तोंड फिरवितो. )

**प्रभावतीबाई.**—जा—कसें शाहाणें बाळ आहे. तो हातांत खाऊ पाहा. अरे जा !

**चंद्रकेतु.**—अं अं; मी नाहीं जा.

**प्रभावतीबाई.**—मी नाहीं ज्या ( वेडावणें आणते. )

**चंद्रकेतु.**—कांग तूं ?

**प्रभावतीबाई.**—"कांग तूं" कसें तेव्हांच करितां येतें. जा बाळा; माझें बाळ कसें शाहणें आहे.

**जयपाळराज.**—बाळ्या, हा काऊ पाहा काऊ.

**चंद्रकेतु.**—दे माना. माना दे.

**प्रभावतीबाई.**—अरे जा तर.

**जयपाळराज.**—चल तर चल.

**चंद्रकेतु.**—दे माना, माजा काऊ दे माना. माजा काऊ.

**जयपाळराज.**—तुझ्या देवाचा गुलामा. चला चला—( प्रभावतीबाईच्या कडेवरून ओढून घेतो )—हा घे हा घे.

**प्रभावतीबाई.**—बाळ्या, कोणरे तं ?

**चंद्रकेतु.**—(खाऊ खात) बाब्बा, बाब्बा, बाब्बा—(जय० आणि प्रभा० हंसतात.)

**प्रभावतीबाई.**—गोड दिलें म्हणजे जसा मुंगळा मग! मला देरे.

**चंद्रकेतु**—कुते आहे? झाला. (तोंडांत धरून हात हालवितो.)

**प्रभावतीबाई**—कसा सोदा आहे पाहा! आणि हें तोंडांतलें कायरे? घेतें काढून.

**चंद्रकेतु**—ह! मालीन.

**जयपाळराज.**—मुलगा पण पुरा मातृभक्त!

**प्रभावतीबाई**—तरी येथें दवतो थोडासा. मुलांमुलांत खेळत असला म्हणजे पाहावी त्याची दांडगाई.

**जयपाळराज.**—बाहेर नेला म्हणजे तरी बुजतो का कांहीं.

—**प्रभावतीबाई.**—तो कुठे कोणाच्या देवाला नाहीं बुजायचा.—वाड्यांत नेला म्हणजे मग तर चेवतो जसा

**जयपाळराज**—कां बरें?

**प्रभावतीबाई**—अगोदर राणीसाहेबांना मुलांची हौस थोडी? आणि त्यांत याचे चार पाहिले म्हणजे त्यांना कोठें ठेवूं आणि कोठें न ठेवूं असें होतें. त्या कांहींना कांहीं कुचेष्टा काढितात; म्हणजे झाला आरंभ. अग बाई बाई, तेथें गेलें म्हणजे कांहीं उपाय नाहीसें करितो.

**जयपाळराज.**—ही आई सांगते! अहाग आई भागूबाई!

**प्रभावतीबाई**—आई काय करील बाई?

**जयपाळराज.**—आईनें दापावें बाई!

**प्रभावतीबाई.**—तर येवढेंसें लेकरूं आणि त्याला येव्हांपासून दाप, आणि हें आणि तें?

**जयपाळराज.**—तर! तर! तर!

**प्रभावतीबाई.**—पण अगोदर त्या कोठें दापूं देतात. अम्मळ हूं केलें म्हणजे लागलीच गागतात. तूं बाई येथें लेंकराला बोलूं नको म्हणतात. आपला आईपणा घरीं ठेवीत जा. लेंकरूं अम्मळ खेळतें तर त्याला मेलें खेळूं देखील देईनास. असें करून रागावतात. मग कोणाची बाई प्राज्ञा पुढें बोलायाची! पाहा हां आतां तेथलें नांव काढतें म्हणजे पाहा कसें करील.—मी चाललें वाडयांत. चलाग बायांनो मेणा आणायाला सांगा. चाललें बरें ! (पदर डोक्यावर घेते.)

**चंद्रकेतु.**—अं ; घ्ये, घ्ये माना ; मी येतों.

**जयपाळराज.**—नाहीं जायाचें.

**चंद्रकेतु.**—जायाचें. मी आलों. घे गले.

**जयपाळराज.**—नाहीं जायाचें.

**चंद्रकेतु**—(ओरडून) जायाचें जा. तुझें काय जातले ? माना घे गले ? (रडूं लागतो.)

**प्रभावतीबाई.**—ये, ये तूं. ये माझे छोनुकली. ये बरें ये. नाहीं जात बरें ? नकाग सांगूं आणायाला. (पदर काढिते) ललायाला काय झालें बाळी ? माझा राजबिंडागबाई राजबिंडा. (मुके घेते.)

**चंद्रकेतु.**—चल बाल्यांत; ने मला तिक्के.

**जयपाळराज.**—गेलें कां रडूं आतां !

**प्रभावतीबाई**—मेलें डोळ्याला पाणी होतें कोठें तें!

**चंद्रकेतु.**—चल कीगे ? तुझें काय जातें.

**प्रभावतीबाई.**—तर, माझें काय जायाचें आहे! तेवढाच उद्योग मला.

**चंद्रकेतु.**—तिते कसा पुकल, इक्का इक्का काऊ आहे. ने मला मी नाहीं जा.

**प्रभावतीबाई.**—कसाग मस्या छोनैं छकडा बोलतो! बाळ्या बाळ्या, ही मौज पाहिलीस रे तूं? कशी छांदील आहे पाहा.

**चंद्रकेतु.**—कुते आहे ?

**प्रभावतीबाई.**—ही पाहा. ही घे.

**चंद्रकेतु.**—दे. काछी मौज माझी. (खेळूं लागतो.)

**जयपाळराज.**—हें नातवंड जर आमच्या महाराजांच्या दृष्टीस पडतें, ही बाललीला जर ते पाहते तर त्यांना धन्य झाली असती. याचे बोबडे बोल ऐकून किती हर्ष पावते !

**प्रभावतीबाई.**—खरं गडे, त्यांना काय करूं आणि काय नाहीं, असें झालें असतें. आतां असतील तरी कोठें म्हणून समजावें बाई?

**जयपाळराज.**—घरीं बोलावणें पाठविलें, तर तो देशच त्यांणीं सोडिला. आम्हांला हें ऐश्वर्य ईश्वरानें दिलें असतां ते कदाचित् रानांतून अन्न अन्न करीत फिरत असतील! भगवंता, तूं त्यांचा साह्यकारी आहेस.

**प्रभावतीबाई.**—हा कडाका जिकडे तिकडे असाच जर पडला असला, तर येथें कधींना कधीं तरी येतील. बारकाईनें असा शोध ठेवावा कीं, लागलीच लोकांनीं ओळखून इकडे आणावे.

**जयपाळराज.**—मी आपली त्याविषयीं पराकाष्ठा करीत आहें. देव करो आणि त्यांचा शोध लागो.

त्यांचे चेहेरे वर्णन करून, एकूनएक बारिकसारीक खाणाखुणा सांगून सर्व कामगार लोकांस मी खुद्द कळविलें आहे, कीं अमक्या अमक्या देशचे, असे असे लोक आले असतां वोळखणी न करितां, त्यांस इकडे आणावें. त्यांना पाहून मी कधीं तृप्त होईन, आणि (थट्टेनें) हीं दोन रत्न दाखवून त्यांना कधीं तृप्त करीन असें मला झालें आहे.

**प्रभावतीबाई.**—(हंसून) अहा, काय मेलीं रत्नं धडाना गोडाचीं! होयरे बाळ्या तूं रत्नरे?

**चंद्रकेतु.**—लत्नले, लत्नले!

**जयपाळराज.**—हें जास्त कीं हें जास्त कोण जाणे. दोघांनाही आपणाकडून सारखें करावें झालें!

(दोघांचेही मुके घेतो.)

**प्रभावतीबाई.**—म्हटलें काय सारखें करायाचें कोण जाणे! ही हिताचीच गोष्ट झाली.—बाहेर जायाची वेळ झाली का इतक्यांत?

**जयपाळराज.**—आपणाकडून नाहींच व्हावयाची, पण कांहीं तरी सरकारी काम पाहिलें पाहिजे कीं नको!

**प्रभावतीबाई.**—मी नको म्हटलें का? एवढा वेळ तरी कोणीं सांगितलं बसायाला?

**जयपाळराज.**—यांनीं. (पुनः गालाचा मुका घेतो.)

**प्रभावतीबाई.**—आतां, वेडच लागलं अगदीं!

**जयपाळराज.**—लागूंदे जा. (निघून जातो)

---

## प्रवेश ३.

### जयपाळराज आणि मनाजीराव.

**जयपाळराज**—कोण मनाजीराव! येऊन बराच वेळ झाला वाटतें. मीही आतां बाहेर जावयाच्याच तयारींत होतों.

**मनाजीराव.**—न्हाई, वाढोळ झाला नाहीं.

**जयपाळराज**—कांहीं नवलविशेष ?

**मनाजीराव**—काइ थोडभूत.

**जयपाळराज.**—कांहीं तरी असल्याशिवाय स्वारीचें येणें कशाला होईल!

**मनाजीराव**—आपला बंदुवरग समदा आल्यावानी वाटतोया

**जयपाळराज**—कशावरून!

**मनाजीराव.**—जी आपून सांगितलेल्या खाना खुना झाडून साऱ्या जमल्यात. नाव, गाव, ठिकाना, तिरतरूपांच नाव, मातुसरीच नाव झाडून सार म्या इचारून घेतल.

**जयपाळराज.**—वाहावारे वाहवा! आतांच त्यांची आठवण झाली होती—आणखीं कोणी ?

**मनाजीराव.**—जी, आनिक कुनी दिसत न्हाइता—मग कशी आज्ञा ?

**जयपाळराज.**—दुसरें तिसरें काय आहे ? स्वभाव पालटले आहेत किंवा नाहींत याची परीक्षा करून ओळख द्यावयाची. त्यांचे त्यांजपाशीं आपलें आपणापाशीं. निदान आमच्या महाराजांचा तरी पत्ता लागेल.

मीही वाड्यांत निघालोंच आहें. तेथें त्यांना आणा म्हणजे सर्व पूसपास करूं.

**मनाजीराव.**—जी, येतो तर.

**जयपाळराज.**—ठीक आहे. (मनाजी जातो.)

---

## प्रवेश ४.

### जयपाळराज, मनाजीराव आणि जयपाळराजांचा बंधुवर्ग.

**मनाजीराव.**—हे आल. जोहार करत्यात.

**जयपाळराज**—कायहो तुम्ही कोठले राहणार ?

**दुर्मति.**—महाराज, आम्ही विश्वनगरींत राहात होतां.

**जयपाळराज.**—मग ती नगरी कां सोडावीसें वाटलें ? स्वस्थ सुखानें दिवस घालविण्यांत चित्ताची समाधानी राहीना असें वाटतें.

**दुर्मति व मणिपाळ**.—महाराज ?

**मनाजीराव.**—आव येक कुनी तरी बोला.

**विचित्रवीर्य.**—महाराज, काय आज्ञा झाली ?

**जयपाळराज.**—स्वदेश सोडून इकडे कां येणें केलें?

**विचित्रवीर्य.**—पोटासाठीं महाराज. घरीं अन्न मिळेना, आईबाप, बायका पोरें, उपाशीं मरूं लागलीं—

**मनाजीराव**—पर ह्यो मुलूक कां ?

**विचित्रवीर्य.**—ह्या मुलखांत धान्याची समृद्धि आहे असें ऐकिलें; आणि धान्याधिपतींच्या दयाळू स्वभावाचीही कीर्ति ऐकिली.

**जयपाळराज.**–असें असें, एवढ्याकरितां आलां काय ? आणि याखेरीज तुमचा दुसरा हेतु आहे असें सिद्ध झालें तर ?

**विचित्रवीर्य.**–आमचा दुसरा काय हेतु असणार! विनंती मान्य करून धान्याची आज्ञा व्हावी, म्हणजे महाराजांसमक्ष परततों.

**जयपाळराज.**–तोंवर कार्यसिद्धि होत आहे ! ती झाल्यावर कोण परतणार नाहीं ! तुम्ही आमच्या शत्रूंचे हेर आहां असें जर सिद्ध झालें, तर मग पुढें वाट कशी ?

**विचित्रवीर्य.**–आपल्या शत्रूंचे हेर महाराज !

**जयपाळराज.**–हो हो, आमच्या शत्रूंचे हेर.

**विचित्रवीर्य.**–महाराज म्हणतील तर निरुपाय आहे; परंतु अशा भानगडींत हे सेवक आजपर्यंत पडले नाहींत.

**जयपाळराज.**–तर आम्ही उगेच बोलतों !

**विचित्रवीर्य.**–आम्ही कसें म्हणूं ? आपण, हजारो लोकांचे पोषणकर्ते, आम्हांवरच विनाकारण शिस्त कां धरतील ?

**जयपाळराज.**–हें तुम्हीच पाहा. तुम्ही जर खरे असतां, तर जसे इतके धान्य घेऊन जातात तसे तुम्हीही गेलां असतां. परंतु तुम्हांला कारस्थानें केलीं पाहिजेत ! नसत्या उठाठेवी तुम्हांला ! आज तुमचा घडा भरला त्याला आम्ही काय करावें ?

**विचित्रवीर्य.**–महाराज, नसत्या उठाठेवी आम्हांला कशाला पाहिजेत? आपण प्रभु आहां; आपल्या

पायांवर हात ठेवून विनंती करितों कीं वृद्ध मातापित-रांच्या आज्ञेवरून धान्य मिळविण्याकरितां मात्र येथें आलों.

**जयपाळराज.**—काय, तुम्ही सारे एकाच घरचे!

**विचित्रवीर्य.**—एकाच घरचे महाराज. आम्ही सारे बंधु आहों.

**जयपाळराज.**—सख्खे.

**विचित्रवीर्य.**—सख्खे महाराज.

**मनाजीराव.**—मजी जूट वरा. फुटाया नग. अनिक कुनी हायता कि न्हाई?

**जयपाळराज.**—हो, हा तपास केला पाहिजे. काय खरें असेल तें सांगा. तुमचा पक्का शोध लाविला पाहिजे.

**मनाजीराव.**—त्येला काय येळ हाय! न सांगतिला ह्य तर काय, अमास्नी लिवता येत न्हाई काय? लिऊनशेनी आनू.

**जयपाळराज.**—आणि तोंवर हे काय करितील येथें?

**मनाजीराव.**—काय करतिला मर्जी? काइबी करतिला! बसतिला हित न्हाय तर बंदीत. त्येत कुनाच काय जायाच हाय!

**जयपाळराज.**—खाशी तोड; परंतु ते कां न सांगतील?—तुम्ही म्हणाल हे इतकी पूसपास कां करितात तर तसं जर न केलें तर हे दिवस कठीण आहेत. आम्ही जाऊं धर्म करायाला आणि आमच्या पाठीस कर्म लागलं म्हणजे? याकरितां ज्या कोणाचा आम्हांला संशय येईल त्याचें घरदार, सगेसोयरे, यांचा

तपास करून आलेल्या संशयाची फेड करावी लागते. तेव्हां आम्ही विचारितों याचा राग न आणितां खरी हकीकत सांगा, आणि खुशाल लागेल तितकें धान्य घेऊन चला.

**मणिपाळ.**—आम्ही चोर नाहीं अथवां चहाड नाहीं; मग कितीही हकीगत विचारिली तरी सांगण्यास बाध कोणता ?

**जयपाळराज**—पूर्वीं कोण बोलत होते तेच बोला.

**विचित्रवीर्य**—जी, आज्ञा.

**जयपाळराज**—बोला तर; तुम्हांला आणखीं बंधु आहेत कीं नाहींत.

**विचित्रवीर्य.**—आम्हांला आणखी कोणी बंधु उरले नाहींत.

**जयपाळराज.**—तुमच्या तीर्थरूपांचें नांव काय ?

**विचित्रवीर्य.**—त्यांना भीमसेनमहाराज म्हणतात.

**जयपाळराज.**—ते आतां कोठें आहेत?

**विचित्रवीर्य.**—सर्व कुटुंबसमुदाय घेऊन यादेशीं आले आहेत.

**जयपाळराज.**—या देशीं आले आहेत !

**विचित्रवीर्य**—होय महाराज, यादेशीं आले आहेत.

**जयपाळराज**—या देशीं !

**विचित्रवीर्य**—होय, या देशीं.—त्यांचा वृद्धापकाल जर आपण पाहातां, तर आपलें चित्त तत्काल दयार्द्र झालें असतें. महाराज, निदान त्यांजकरितां तरी एकदा धान्य देऊन आमची रवानगी करावी. (सुस्कारा टाकून ) काय आम्ही पुत्र !

**जयपाळराज.**—कांहो श्रमी झाल्यासारखें कां करितां ?

**विचित्रवीर्य**—महाराज, श्रमी होऊं यांत नवल नाहीं.

**जयपाळराज.**—कां बरें ?

**दुर्मति.**—आमच्या श्रमाचें इतरांना काय ?

**जयपाळराज.**—बरें तर; तुम्ही आपली सर्व हकीकत सांगत नाहीं तर मी तुमची येथून सुटका होऊं देत नाहीं. मनाजीराव, यांचे तीर्थरूप कोठें आहेत तें विचारून घेऊन त्यांना धरून आणा, आणि त्यांची बारीक चौकशी करा. तोंपर्यंत यांना अडकवून ठेवा.—सांगा तुमच्या तीर्थरूपांचा पत्ता.

**दुर्मति.**—कशासाठीं महाराज ?

**जयपाळराज.**—त्यांना पकडून आणून चौकशी केली पाहिजे.

**दुर्मति.**—तर काय एका पुत्राचा ठिकाण नाहीं म्हणून बाकीचेही सर्व मेले काय ? महाराज, आमच्या तीर्थरूपांना आपण चोरासारखें पकडून आणणार !

**जयपाळराज.**—तें काय बोललांहो आतां ! एकाचा ठिकाण नाहीं म्हणून सर्वही मेले काय असें जें म्हणतां तो कोणहो एक ?

**दुर्मति.**—ती गोष्ट येथें बोलण्याचें कारण नव्हतें, परंतु रागाच्या आवेशांत फटकन तोंडांतून निघाली.

**मनाजीराव**—आव पन काय ती गोष्ट ?

**विचित्रवीर्य.**—आपण जर प्रथमपासून आमच्या संकटाकडे पाहून प्रीतिपूर्वक प्रश्न करितां, तर तेंही

गृहच्छिद्र मोकळें केलें असतें. परंतु ज्या अर्थी आम्ही हेर ठरलों, व आमचे वृद्ध तीर्थरूप चोरटे ठरले त्या अर्थी जास्त बोलून उपयोग दिसत नाहीं.

**जयपाळराज.**—हें पाहा, विनाकारण रागावून कांहीं होईल नाहीं. बरें तें सारें राहो; हा जो उद्गार आपोआप तुमच्या मुखांतून निघाला हा स्पष्ट समजेसा करून आमचें समाधान करा; म्हणजे आणखी जास्त कांहीं एक न पुसतां तुमची पाठवणी करूं.

**विचित्रवीर्य.**—महाराजांनीं शब्द दिला ?

**जयपाळराज.**—हो दिला.

**विचित्रवीर्य.**—महाराज, आम्हांला एक परमगुणी सापत्न बंधु होता.

**जयपाळराज.**—मग त्याचें काय झालें ?

**विचित्रवीर्य.**—आमच्या तीर्थरूपांची त्याजवर परम भक्ति होती.

**जयपालराज.**—पुत्रावर पित्याची भक्ति असतच आहे!

**विचित्रवीर्य.**—आपण खरें म्हणतां, परंतु त्याजवर अत्यंतच होती. प्रथमविवाहाचा तेवढाच असे, आणि तोही फार सुशील.

**जयपालराज.**—बरें मग ?

**विचित्रवीर्य.**—आम्हां दुष्टांना तें पाहवलें नाहीं.

**जयपाळराज.**—तर ?

**विचित्रवीर्य.**—पूर्ण अभय आहे महाराज ?

**जयपाळराज.**—पूर्ण अभय.

**विचित्रवीर्य.**—त्याला आम्ही दुष्टांनीं, कट करून निबिड अरण्यांत, खोल गुहेंत सोडून दिला.

**जयपाळराज.**—पुढें !

**विचित्रवीर्य.**—त्यापुढें त्याची वाट काय झाली तें अजून पर्यंत आम्हांस ठाऊक नाहीं.—हे जयपाळा, अरे तें कृत्य आमचा रोज सूड उगवीत आहे. कसेरे आम्ही निष्ठुर झालों होतों.—महाराज, आपणच पाहा आम्ही आमच्या तीर्थरूपांशीं पुत्राच्या नात्यानें किती वागलों?

**मणिपाळ.**—आणि त्या गोष्टीचा पुरा पश्चात्ताप होत असतां पुनः त्यांना संकटांत आमच्यानें कसें पाहवेल ?

**दुर्मति.**—जर आपण त्यांना धरून आणणार असलां तर अगोदर आम्हां सर्वांचें येथें शिरच्छेदन करावें.

**मणिपाळ.**—महाराज जर न करितील, तर आम्ही साहस करून तसें करण्याचें अगत्य पाडूं.

**जयपाळराज.**—मनाजीराव, पाहा ?

**मनाजीराव.**—जी काइवी झाल तरी वागाच घरान !

**मणिपाळ.**—महाराज, कशी ती एकदां लवकर आज्ञा व्हावी.

**जयपाळराज.**—शाबास मणिपाळा;—तुमचें बोलणें ऐकून मला फार आनंद झाला. तुमच्या वृद्ध पित-रांस कशाचीही तूट पडणार नाहीं. तुमचे तीर्थरूप तेच माझे तीर्थरूप. तुम्ही माझे बंधु. मी तुमचा जयपाळ. नीट पाहा माझे तोंडाकडे आणि मला ओळखा. आतां मनांत कशाचीही चिंता धरूं नका. हें सर्व वैभव तुमचें आहे. तीर्थरूप मात्र कोठें आहेत तें लवकर सांगा म्हणजे त्यांना आणवूं.

**विचित्रवीर्य.**—अरे होयरे होय ! आमचा जयपा-

ळच हा खरा! मला प्रथमपासूनच कसेंसें वाटत होतें.

**दुर्मति.**—जयपाळराज, आम्हांला क्षमा करा. आम्ही गुन्हेगार खरे, परंतु केल्या कर्माचा आम्हांस पुरा पश्चात्ताप झाला आहे.

**जयपाळराज.**—त्याजविषयीं आतां बोलूं नका. हा तसा समय नव्हे, चला तीर्थरूपाना घरीं आणूं आणि आनंद करूं. ( जातात. )

---

## प्रवेश ५.

**जयपाळराज, भीमसेनमहाराज, ( तीर्थरूप ) बंधुवर्ग, प्रभावतीबाई आणि चंद्रकेतु.**

**भीमसेनमहाराज.**—अरे हें सारें स्वप्न कायरे? हा सारा भास तर नव्हेना! काय, माझा जयपाळच माझ्या समोर उभा आहे! अरे चांडाळांनो, अजून तरी खरें बोला. नव्हे नव्हे, हा माझा जयपाळ नव्हे; माझा जयपाळ तो हा नव्हे. त्याला जाऊन आज बारा वर्षें झालीं. आतां तो कशाचा परततो! म्हाताऱ्या, आतां तुला कशाचा जयपाळ भेटतो! माझा जयपाळ वनांत गेला; मझा जयपाळ नाहींसा झाला; माझा जयपाळ स्वर्गी गेला. ( डोळे भरून येतात. )

**जयपाळराज.**—नाहीं महाराज, आपला जयपाळ तोच हा. मी आपलाच. मला ओळखा. आपण जर आतां हा माझा नव्हे म्हणाल, तर मग मात्र या प्राण्यासारिखा अनाथ पृथ्वीवर कोणी नाहीं.

**दुर्मति.**—होय महाराज, आपला पुत्र जयपाळ तो हाच. आतां व्यर्थ शोक पुरे.

**भीमसेनमहाराज.**—कायरे दुर्मति, माझा जयपाळ अजून जिवंत आहे कायरे? कायरे मणिपाळा, त्याची तुमची गांठ पडली नाहींना? जयपाळा, जयपाळा, असा कोणीकडे भटकलास!

**मणिपाळ.**—सर्व अन्याय आम्ही कबूल केला आहे. आम्ही आपली भलतीच समजूत घातली होती अशी जी आतांच विनंती केली ही मात्र खरी. हा जयपाळ पुढें उभा आहे. आम्ही दुष्टांनीं घात चिंतिला, परंतु कृपाळु परमेश्वरानें कल्याण केलें.

**भीमसेनमहाराज.**—या जयपाळा, मला पुन्हा कडकडून भेट. आज बारा वर्षें तुजकरितां रडून रडून डोळे मंद झाले. अरे ज्या मला कोसावरचा पदार्थ ओळखूं येत होता त्या मला माझा जयपाळ दोन पावलांच्या अंतरावरचा दिसत नाहीं.

( पितापुत्र भेटतात. )

**प्रभावतीबाई.**—( आंत येऊन नमस्कार करिते. )

**विचित्रवीर्य.**—वहिनी नमस्कार करितात.

**भीमसेन म०.**—कोणगे बाई?

**प्रभावतीबाई**—मी प्रभावती.

**विचित्रवीर्य.**—जयपाळराजांची बायको.

**भीमसेनम०.**—जयपाळा, तुझी बायको काय रे?—मुली, अष्टपुत्रा सौभाग्यवती हो. कोणाचीग बाई मुलगी तूं?

**जयपाळराज.**—( हंसत ) येथें मुख्य न्यायाधीश आहेत.

**प्रभावतीबाई.**—(मुलास) जा, नमस्कार कर.

**चंद्रकेतु**—तूं कलीनस !

**प्रभावतीबाई**—अरे मी केला. तूं कर आतां. जा, असें म्हणूं नये.

(हळूहळू जवळ जाऊन नमस्कार करितो.)

**विचित्रवीर्य.**—धाकटा नातु नमस्कार करितो.

**भीमसेनम०.**—कोण ? जयपाळा तुझा मुलगा ? —या तुम्ही, या तुम्ही. अरे वाहवारे वाहवा ! एक मुकू देरे बाळा, छांदालसा. (मुका घेऊन)—काय गोल आहेले मुकू ? बाळा मी कोण रे ?

**चंद्रकेतु.**—माना काय ताऊक ?

**जयपाळराज**—आजोबा बरें ? कोण ?

**चंद्रकेतु.**—आदुबा.

**दुर्मति**—म्हणजे कोण रे ?

**चंद्रकेतु**—म्हंजे ? म्हंजे आदुबा. (सर्व हंसतात.)

**भीमसेनम०.**—तुझें नांव काय रे बाळा?

**चंद्रकेतु**—तंदूलकेतु.

**भीमसेनम०**—काय ?

**जयपाळराज.**—चंद्रकेतु.

**भीमसेनम०**—तंदूलकेतु काय ? तंदूलकेतु, तूं कोणाबरोबर येथें आलास ?

**चंद्रकेतु.**—मी घोल्यावलून आलो. कच्छा छांदाल, पऽहला पऽहला, घोला आहे माजा !

**भीमसेनम०.**—आम्हांला दाखव रे बाळा तो तुझा घोडा.

**चंद्रकेतु**—मालील तुमाला. मना कुते मालतो ? मना नाहींच मालीत. (सर्व हंसतात.)

**भीमसेनम०**—मुली, मुलगा हुशार आहे.

(प्रभावती लाजते.)

**चंद्रकेतु.**—आन् मी कथा अथ्था घेल्यावल वथलो आन् तो कथा अथ्था उलाला ! नाहीं ग वाई ? (प्र० हंसते)—तुम्हांला कुते येते बथ्या !

**भीमसेनम०.**—नाहीं रे बाळा, आम्हांला कशानें येतें ? तूं शिकवशील ?

**चंद्रकेतु**—माझ्या फुलें वताल घेल्यावल ?

**भीमसेनम०.**—हो; शिकायाचेंच आम्हांला. मग पुढें कां नाहीं बसणार रे बाबा ? मुली, आज रात्रीं याची दृष्टि काढ बरें ? बाळा, आणखी एक मुकू दे पाहूं ?

**चंद्रकेतु.**—आतां नाहीं गले.

**भीमसेनम०**—गुलामा, तुझे काय दोन चव्वल खर्च होतात त्यांत ! (मुके घेतो)—आज केवढा आनंदाचा दिवस मला उगवला ! जयपाळा, तुजसारिखाच तुझा मुलगा पराक्रमी व भाग्यशाली होओ !

**जयपाळराज**—वडिलांच्या आशीर्वादानें सर्व कांहीं होईल.—आपण येणार ही बातमी काल वाड्यांत छत्रपतींना समजल्यावरून मला आज्ञा झाली कीं आपणांस भेटवावें.

**भीमसेनम०.**—फार उत्तम गोष्ट आहे. अरे राजद्वारीं रिक्तहस्त जाऊं नये बरें ? कांहीं तिकडचे पदार्थ असतील ते काढा.

**जयपाळराज.**—पूर्वेकडे येथून पंधरा कोसांवर माणिकपूर महाल आहे तो तुम्हांस व तुमचे कुटुंबास

वंशपरंपरेनें इनाम दिला आहे अशा अर्थाची सनद करून छत्रपतींनीं आपल्या हातानें तिजवर मोर्तब केलें आहे. नको नको पुष्कळ म्हटलें, परंतु उपाय चालेना. उद्यां भेटीच्या वेळीं ती सनद हातावर ठेवितील.

**भीमसेनम०.**—ते देणार समर्थच आहेत. पुढें तुम्ही मात्र एकत्र, एकविचारें राहून त्यांच्या कृपेस योग्यपात्र आहों असें दाखवा—मला आतां थोड्याच दिवसांत वरचें बोलावणें येईल हें माझी मनदेवता मला सांगते. तर या जयपाळा, या विचित्रवीर्या, एक मात्र करा. ऐकलें रे दुर्मति, जरी मी येथें देह ठेवला तरी माझ्या अस्ती स्वदेशीं नेऊन ब्रह्मतीर्थांत टाका. करालनारे; मणिपाळा, वीरभद्रा, शूरसेना, विसरूं नका बरें! आतां एवढेंच तुम्हां पुत्रांपाशीं मागणें आहे.—जयपाळा, आमची तर्तूद राखण्यांत आज तुला फार श्रम झाले आहेत. जा बाबा थोडी विश्रांति घे.

**जयपाळराज.**—आपणही थकून भागून आलां आहां तर विश्रांति घ्यावयास चलावें.

(सर्व निघून जातात.)

## विदूषक आणि सूत्रधार.

**विदूषक.**—कायरे सूत्रधारा, हा काशीकरपणा कोठें शिकलास?

**सूत्रधार.**—कोणता काशीकरपणारे बावा?

**विदूषक.**—हं हं! तुला वाटतें विदूषक म्हणजे काय पदार्थ आहे! अक्कलवंताच्या गाभ्या आम्हांला अगदी कोपऱ्यांत राज्य दिलेंस हें कसें काय?

**सूत्रधार.**—अहो आपण कां कोपऱ्यांत बसतां! असे या समोर.

**विदूषक.**—येऊन तोंडावरच्या माशा मारीत बसूं कायरे वा! ऐकिलं, ऐकिलें; म्हटलें तुझें नाटक ऐकिलें; चालला नाटक करायाला!

**सूत्रधार.**—कांरे बावा तुझें काय बिघडलें?

**विदूषक.**—नाहीं नाहीं, म्हटलें ऐकिलें; तुझें नाटक ऐकिलें.

**सूत्रधार.**—अरे, हो हो म्हटलें ऐकिलेंस. मग म्हणतोस काय?

**विदूषक.**— असा वर्दळीवर नको येऊं; पण म्हटलें ऐकिलें. चालला नाटक करायाला!

**सूत्रधार.**—आणखी एकदा.

**विदूषक.**—आणखी एकदा कशाला? समग्र ऐकिलें. समजली कारागिरी. एक आर्या मिळेना—एक श्लोक मिळेना—एक ओंवी मिळेना—बृहस्पति नाटक करतो! कशी रंग लागावी—दिंडी—साक्या—पदें—चूर्णिका कीं लोकांनीं म्हणावें यंव.

**सूत्रधार.**—नाटकालारे हीं कशाला पाहिजेत? अरे

मोटे मोठे म्हणतात कीं, तुझे श्लोक—आर्या, दिंड्या हीं सर्व या रंगभूमीवर झांकून ठेवावीं.

**विदूषक.**—तुझे थोर थोर आहेत मोटे शाहाणे. भं-ल्या माणसा, याकरितां विदूषक लागत असतो. अरे तें इकडे सोंपवून द्यावयाचें होतें. ऐशी बहार दिली असती उडवून! तुला पाहायाचा आहे आमच्या कवि-तेचा मासला? थोडक्यांत तुजवर नक्षा करितों ऐक.

ओंवी.

"ऐकाहो सकळ जन"

सूत्रधारा, नीट खुबी पाहा. अंतीं 'जन' शब्द आला आहे. शेवटीं 'न'.

"ऐकाहो सकळ जन। देऊनियां पूर्ण मन"

जन, मन. कां, कशी आहे सांगड! आणखी खुबी आहे "पूर्ण मन" पूर्ण शब्दाची ठेवण पाहा. नाहीं तर अर्धे मन जाईल केळें खायाला व अर्धे मन राहील इकडे. तसें नाहीं, म्हणून म्हणतात "पूर्ण मन."

"देऊनियां पूर्ण मन। चोरूनी नेणार हा धन"

"तुमचीयें सर्वस्वी."

पाहा एखादा तुमचें म्हणता! तीं बेटीं साधारणाचीं कामें. आम्ही तुमचीयें म्हणतों.

**सूत्रधार.**—अहाहा! एकून खरे कवि आपण!

**विदूषक**—बोलूं नको ऐक. आणखी म्हणतात—

"हा मायिक सूत्रधारू। उगाच हाकितो बडिवारू"

'बडिवारू' शब्दाचा ज्ञानोबांनीं उपयोग केला आहे बरं काय! उगीच काल आजच्या शब्दांची यो-जना करणार नव्हत हे "बडिवारू"—काय शब्द आहे!

"दावोनियां तयातें जोरू"

"जोरू" म्हणजे समजलास? जसें सूत्रधाराचें धारू केलें, जसें वडिवाराचें वडिवारू केलें तसें जोराचें "जोरू"

**सूत्रधार.**—वाः ऐकून स्वर्ग पाताळ एक करणारी कविता बावा!

**विदूषक.**—"दावोनियां तयातें जोरू"
"मार्गस्थ करावा पैं"

कां "पैं" ची खुमारी कशी आहे? खुबी सांगतों तुला सूत्रधारा. ओंवीचा एक चरण गेला, म्हणजे दुसऱ्या चरणांत बावाच 'पैं" ढकलून!—श्लोक.

**सूत्रधार.**—श्रोते म्हणतात फार कष्ट झाले. आतां पुरे करावें.

**विदूषक.**—आमची, आमची कविता ऐकून कष्ट झाले! अरे तूं आहेस कोठें! आमची कविता ऐकून श्रोत्यांना कष्ट झाले!

**सूत्रधार.**—भलत्याचें भलतेंच. तसें नव्हे. असें म्हणेल त्याची जिव्हा झडो! श्रोते तर हृष्ट झाले; परंतु आपणाला कष्ट झाले असें त्यांचें म्हणणें.

**विदूषक.**—अरे आम्हांला कशाचे कष्ट होतात! आम्ही कवि म्हणजे प्रसादी पुरुष. आमची प्रासादिक वाणी. कष्टाची भीतिच धरूं नको तूं

**सूत्रधार.**—(हळू) मूर्ति कोपऱ्यांत बसली होती ती बरी होती.

**विदूषक.**—काय, काय म्हटलेंस? कुरकुर कशाची लावितोस. अरे ऐकवतों तोंवर घे ऐकून, मग बसशील हाका मारीत.

**सूत्रधार.**—म्हणूनच म्हटलें आपण स्वस्थ बसावें. न जाणो आपली वाणी देवदूतांच्या कानीं पडली आणि त्यांना अशी इच्छा झाली कीं, आपल्या मेळ्यांत अग्रभागीं या मूर्तीस नेऊन बसवावें. तर मग? आम्हां मृत्युलोकींच्यांचें कांहीं चालावयाचें आहे? उगाच त्यांणीं सत्कारपूर्वक धरून नेलें म्हणजे आपलीं पोरेंबाळें रडतील तीं रडतील आणि त्यांजबरोबर आम्हांला हेळ ओढावे लागतील. तेंही असो. रडूं घटिकाभर, पण पुनः वाणी नाहींना ऐकायला सांपडणार? ती पुष्कळ दिवस आपण ऐकवावी म्हणून विश्रांति घेण्याविषयीं बोललों.

**विदूषक.**—काय, लाख रुपयांची गोष्ट बोललास सूत्रधारा. माझ्या गुणाचें पूर्ण ज्ञान तुलाच झालें आहे. काय सांगूं? तुला जिवाची गोष्ट सांगतों. माझ्या पाठीमागें कविता चालेल कीं नाहीं याचा वारंवार संदेह प्राप्त होतो. मग अतोनात खेदानें चित्त व्याप्त होतें. असें वाटतें कीं, देवा हा मी कवितारूप वृक्ष या लोकीं लाविला; परंतु याला यथेच्छ आज्य घालून याची ज्वाला कोण प्रज्वलित करील आणि याच्या लाटा कोण सर्व देशभर पसरील तो पसरो.

**सूत्रधार.**—विदूषक महाराज, एकूण आपली कविताशक्ति साधारण बोलण्यांत सुद्धां झकाकते. वृक्ष, आज्य, ज्वाला, लाटा, काय अद्वितीय श्रेणी एकसारखी ना!

**विदूषक.**—अरे काय, उपाय चालत नाहीं. उपमेवर उपमा, उपमेवर उपमा, अशा सुचतात कीं अनर्थ होतो.

**सूत्रधार.**—अनर्थच खरा!

**विदूषक.**—पण यापासून आम्हांला कांहीं सुख

आहे काय ? आम्हांपाशीं गुण आहे हें लोकांना कोठें सहन होतें ? अरे, तुक्या म्हणून एक लहानसा कवि होऊन गेला. त्यानें म्हटलें आहे.

"नीचपण बरवें देवा"

"न चले कोणाचाही हेवा" ऐकिलेंस काय?

"महापुरें झाडें जाती। तेथें लोहाळे राहती."

"लोहाळे राहती"; या राहतीच्या ठिकाणीं "नीजती" असें असतें म्हणजे फार शोभलें असतें.

"महापुरें झाडें जाती। तेथें लोहाळे नीजती"

**सूत्रधार.**—मला वाटतें "मरती" असें जर असतें तर फारच शोभलें असतें.

**विदूषक.**—छे बेट्या, अर्थाचा अनर्थ नको करूं. तुला त्यातली खुबी नाहीं ठाऊक. "तेथें लोहाळे नीजती"—'नीजती' समजलास 'नीजती'. बरं कसं एक श्लोक देऊं ना ह्मणून?

**सूत्रधार.**—आतां काय सांगूं? अपराध तर होऊन चुकली आहे! पण त्यांतून नसलेंच आम्हांला सोडायाचें तर मग लावा तडाका!

**विदूषक.**—बरं तर तुझी मर्जी. राहूंदे आज आणखीं केव्हां तरी देऊं मौज उडवून. "वेताळ चालिले पूर्वस्थाना" ( जातो. )

**सूत्रधार.**—अहारे पुतळा. बरीच पिडा गेली. आतां आपणही जावें. ( जातो ).

**समाप्त.**

# नाटक,

# थोरले माधवराव पेशवे यांजवर.

राजश्री विनायक जनार्दन कीर्तने,

निसबत एल्फिन्स्तन् कॉलेज,

यांनी रचून

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचिलें;

तें मालकांच्या आज्ञेवरून

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

सन १८७९.

---

किंमत सहा (६) आणे.

( पहिल्या आवृत्तीची )

# प्रस्तावना.

---

कांहीं दिवसांमागें मराठी ज्ञानप्रसारकसभेमध्यें रा. रा. **विनायक जनार्दन कीर्तने** यांनीं **थोरले माधवराव साहेब** यांच्या कारकीर्दीचें वर्णन नाटकरूपानें लिहून वाचिलें. तें ऐकून सर्व सभेस फार आनंद झाला इतकेंच नाहीं, तर रा. रा. **डाक्तर भाऊ दाजी** व रा. सा. **महादेव गोविंद शास्त्री** इत्यादि विद्वान व थोर गृहस्थांच्या स्तुतीसही तें पात्र झालें. असें पाहून याचें लहानसें पुस्तक निराळेंच छापून प्रसिद्ध करावें असें बहुतेक सभासदांस व कितीएक इतर गृहस्थांस वाटल्यावरून, सर्व लोकांस तें सुलभ किमतींत मिळून मराठी नाटकांविषयीं अभिरुचि उत्पन्न व्हावी ह्या हेतूनें हें पुस्तक आम्हीं छापून प्रसिद्ध केलें आहे, तर मराठी भाषेचें कल्याण इच्छिणाऱ्या सर्व लोकांनीं यास यथाशक्ति आश्रय द्यावा हें उचित आहे.

मराठी भाषेंत नाटकें लिहिण्याचा हा प्रारंभच असून या लहानशा नाटकांत नाटककारानें हास्य व करुणा हे रस चांगले उतरून पुस्तक मनोरंजक केलें आहे हें पाहून नवीन ग्रंथकार नाटकसंग्रहानें आपली भाषा ऊर्जित दशेस आणण्यास उद्युक्त होतील अशी आम्हांस पूर्ण आशा आहे.

या पुस्तकांत कोठं कोठं अडाणी लोकांची भाषा आली आहे. या गोष्टीस उपाय नाहीं. कारण, मराठी दरबारांत शिपायापासून तों सरदारापावेतों सर्व हीच भाषा बोलतात. कितीएक ब्राह्मण कारभारी असतात ते मात्र आपण बोलतों असें बोलतात. आणि ज्यापेक्षां ग्रंथकर्त्याचा उद्देश मराठी दरबाराचें वास्तविक स्वरूप दाखविण्याचा आहे त्यापेक्षां पात्रानुरूप भाषाही बदलणें अवश्य पडलें, ही गोष्ट सुज्ञ लोक लक्षांत ठेवितील अशीही आमची आशा आहे.

मुंबई, एप्रिल सन १८६१.

बाळाजी बापूजी साने.

---

( प्रस्तुतच्या आवृत्तीची )

# प्रस्तावना.

ह्या पुस्तकाच्या प्रति हल्लीं अगदींच मिळत नाहींत असें वारंवार पाहण्यांत आल्यावरून, व जेंव्हां जेंव्हां हें पुस्तक वाचावें तेंव्हां तेंव्हां विशेषतः दक्षणी लोकांस ह्या छोटेखानी पुस्तकांतील शृंगार, वीर, करुणा इत्यादि रसांचा शिळेपणा न वाटतां उलटा ताजेपणाच वाटतो, असें आमच्या बहुतेक मित्रांच्या सांगण्यांत आल्यावरून ग्रंथकर्त्याच्या परवानगीनें ही आवृत्ति छापिली आहे. तर, रसिकजन या ऐतिहासिक सुरस नाटकाच्या निदान एका प्रतीचा तरी संग्रह करतील अशी आम्ही त्यांस शिफारस करितों.

म्यानेजर इंदुप्रकाश.

मुंबई, माहे आक्टोबर सन १८७६.

# नाटक.—पहिले माधवराव पेशवे.

## नांदी.

सर्व ब्रह्मांडाच्या उत्पत्तिस्थितिलयांस हेतु जो सच्चिदानंद तो आपलें संरक्षण करो, व मला बुद्धि देओ.

## अंक १ ला.

### प्रवेश १.

**विदूषक**—अरे सूत्रधारा, आज तूं हा कशाचा खटाटोप मांडला आहेसरे? हे लोक काय कारण योजून येथें आले आहेत?

**सूत्रधार**—तुला कांहीं एक वार्ता देखील ठाऊक नाहीं, अं, तर मग तूंरे काय कारण योजून आलास?

**विदूषक**—मी, मी? तूं मला सांगितलेंस कीं, विदूषका, प्रयोजन आहे, चल; म्हणून मी आपला गरीब ब्राह्मण आजचा दिवस तरी तूपपोळी चळचळीत मिळेल अशा बेतानें काखेस सोवळेंभाडें मारून आलों. आणखी सूत्रधारा, हा माझा गुलगाही मी आणिला आहे, पाहा. दुप्पट दक्षिणेचें संधान.

**सूत्रधार**—विदूषका, तूं तर अकलेचा पूर्ण सागर दिसतोस, गड्या.

**विदूषक**—तो कसारे?

**सूत्रधार**—कसारे? अरे, मी काय तुला सांगितलें? मी म्हणालों—विदूषका, तुझें कांहीं प्रयोजन आहे, चल.

**विदूषक**–मग मी काय बोललों? तुला प्रयोजन आहे म्हणजे मेजवानी आहे, चल.

**सूत्रधार**–पुनः आपलेंच. अरे, तुला प्रयोजन नव्हे, तुझें प्रयोजन आहे, चल. प्रयोजन म्हणजे कारण.

**विदूषक**–हं, हं; आतां उमजलों. माझें कारण आहे काय? मग बरें आहे. काय म्हणतोस?

**सूत्रधार**–माझें साहित्य कर.

**विदूषक**–मी असा तुझ्यासारिखा दुतोंडचा नाहीं. प्रयोजन नाहीं म्हणतोस, आणि साहित्य तर कर म्हणतोस. तुझें खरें काय समजावें? मी आपला निघून जातों कसा. नाहीं तर एक काय तें सांग.

**सूत्रधार**–साहित्य म्हणजे पापड, सांडगे, लाडू हें नव्हे, बाबा. साहित्य कर म्हणजे मदत कर. आज माझ्या दैवानें विदूषक तर मला फार विद्वान् मिळाला आहे.

**विदूषक**–असें काय, तें काम माझें. तू आतां काय करणार तें सांग म्हणजे त्यासारखी मदत.

**सूत्रधार**–ऐक तर सांगतों. हे श्रोतेहो, तुम्हीही ऐका. विदूषका, आज मी या लोकांना मराठी दरबारांत नेऊन तेथील हालहवाल दाखविणार. तें कोणतें मराठी दरबार जर म्हणशील तर बाबा, आतांचें नव्हे. ज्या दरबारांत परद्वीपस्थ लोकांच्या आज्ञा चालतात, व राजे केवळ पिंजऱ्यांतील पोपटाप्रमाणें असून स्वसत्तेच्या छायेस देखील ओळखीत नाहींत, अशा ठिकाणीं मी यांना कशासाठीं नेऊं? तर थोरले श्रीमंत माधवराव साहेब पेशवे, कीं ज्यांनीं प्रजेचें पोटच्या

पुत्राप्रमाणें प्रतिपालन केलें, ज्यांचें नांव ऐकिलें असतां मुसलमानांनीं थरथरां कांपावें, व ज्यांच्या वियोगेंकरून सर्व महाराष्ट्रदेश उदासीन होऊन निस्तेज झाला आहे त्या सत्पुरुषाच्या दरवारीं यांस नेतों, आणि तेथील चमत्कार दाखवितों.

**विदूषक**—सूत्रधारा, अशी स्तुति करण्याची तुझी चालच आहे; पण यांना तूं मराठी दरवार कां दाखवितोस हें मी समजलों. अरे, चोराच्या वाटा चोरालाच ठाऊक. तुझ्या मनांत मराठी राज्यांत यांस नेलें म्हणजे दाद ना फिर्याद. सर्व बुचाडून घेऊन अलख गोसांवी करून परत पाठविण्यास चिंता नाहीं. पाहाहो, बावांनो! तुमच्या मनांतून धडपणें घरीं निघून जावयाचें असेल तर आपले चालते व्हा. नाहीं तर पेंढाऱ्यांचे घडगे आले म्हणून समजाच. कां सूत्रधारा, होय कीं नाहीं, बोल.

**सूत्रधार**—तुझें बोडकें बोल आतां. कोणत्या नक्षत्रावर जन्मला कोण जाणे हा राजहंस. शेणाचा दिवा ओंवाळा. कोठें बाप तपश्चर्या करीत बसला होता तें हें रत्न पोटीं आलें. लोकांना या या म्हणून सांगावें, तो हा शहाणा जा जा म्हणून सांगतो. हेंच साहित्य करणार कायरे?

**विदूषक**—सूत्रधाराला राग आला. बरें बावा, जा जा नाहीं, या या म्हणतों. या हो या, आमचा सूत्रधार तुम्हांला मराठी दरबारांत नेऊन लुटणार, या हो या. तुमचीं पागोटीं द्या हो द्या. आमचा सूत्रधार तुम्हांला नेऊन लुटणार, या हो या. झालें आतां?

**सूत्रधार**—झालें म्हणजे, असा दिवटा साह्यकारी असल्यावर होणार नाहीं काय ? पण विदूषका, मराठी राज्य केवळ लुटारू होतें असें तूं समजूं नको. तुझ्या-सारख्या शहाण्याची मात्र ही समजूत. माधवरावाच्या राज्यांत कसें होतें तें आतांच दिसून येईल. तूं घट-काभर स्वस्थ जर असशील तर सर्व चमत्कार दृष्टीस पडतील. (श्रोत्यांस पुन:) हे श्रोतेहो, आतां तयार व्हा; कंबरा बांधा, वायूपेक्षांही जलद वेग देऊन तुमचीं हीं दृश्य जडें येथेंच जों बसलीं आहेत तोंच तुम्हांस सातार्‍यास नेऊन, तेथून पुण्यास आणून, दाखवायाचें तें दाखवून, पुन: येथें सोडितों

(पडदा पडतो.) (सूत्रधार व विदूषक निघून जातात.)

---

## प्रवेश २.

सातारा—राजवाड्यांत दिवाणखान्याबाहेरील जागा.

**सदोबा भालदार व गणोबा चोपदार.**

**सदोबा**—रामराम, गनबा.

**गणोबा**—रामराम, रामराम, सदबा रामराम. कां सदबा, भोजन बिजन करूनशेनी आलां कीं न्हाइव ?

**सदोबा**—त्ये कशाला, गनबा पुसावन्. आज सर-कारकचेरी हाय ना. ह्योच सरकार सवारीची आज्ञा घेऊनशेनी ग्येलो तो. आन वगा वायकोन काइ भाक-र काइ कोरड्यास टचेवलन त्ये बिगिबिगिशी झटादिनी घेतल, अन् वगा भोजन बिगिद्यान आटपुन डोईवर

मुंडासच टये्वल वगा, अन् आलों, ह्योच वगा तुमची गाट पडली वगा.

**गणोबा**—आपुनवी तसच वगा. काय म्हनत्यात न्हाई परसादिन जिन. आज पुन्यासल मुकत्यार आल्यात म्हनुनशेनी इतका थाट केलाया. आपल्या वगन्यांत येकुन असा थाट न्हवताच वगा.

**सदोबा**—अव त्ये काय राव म्हनता तुमी! तालिवार त्ये तालिवार. तुका म्हन उगी न्हाव अन् ज्ये ज्ये व्हइल त्येत्ये पाव. आतां गनवा, तुमी कुनिकड चालला.

**गणोबा**—सरकार स्वारीच सुक होऊनशेनी पोषाक चाललाया म्हनुन दिवानखान्यांत सव्र्यांस्नी वर्दी द्याया चाललों. तयारी आगदि मजी आगदि झालिया. आतां सवारी भाइर येइल. तुमीवी चला चनी. अन् काय.

**सदोबा**—आपुन त तयारच हावोत. हा निगालो वगा, रामराम.

**गणोबा**—रामराम.

( दोघे निघून जातात ).

( पडद्यापलीकडे शब्द होतो. )

---

## प्रवेश ३.

रामराज महाराज छतरपति हिंदुपत बादशाहा, खडी ताजीम. नजर रखो, महाराज.

( रामराजा सिंहासनावर जाऊन बसतो, नंतर मुजरे होतात ).

भालदार चोपदार पुकारता- } रघुनाथराव माधवरा-
त. ( महाराज छतरपति. )- } पेशवे पंत प्रधान.

प्रतिनिधि, अमात्य, सचिव, हिंमतबहादर, सरलश्कर, निंबाळकर, घाटगे, मोहिते, खडी ताजीम महाराज.

( सर्व बसल्यानंतर ).

**रघुनाथराव**–सरकारपायांवर घालण्यासाठीं नानासाहेबाचे चिरंजीव माधवराव आणिले आहेत. आजपर्यंत त्यांचा सरकारांनीं परामर्ष घेतला तसाच यांचाही घेणें होतच आहे. अर्ज मिळोन इतकाच.

**रामराजा**–( माधवरावाकडे बोट दाखवून ) नानासावाचे च्यरंजीव? तोंड त लइ सारकं. जनु त्येच नांव ?

**माधवराव**–सरकार, मला माधव म्हणतात.

**पंतअमात्य**–प्रकृति सौम्य, व माधवराव साहेबांच्या आंगीं लीनता आणि साधेपणा फार.

**रघुनाथराव**–हुशारीहि तशीच आहे.

**निंबाळकर**–दादासाव, माशाच पिल्हु. पऱ्हायला शिकवन नग. सिवाच्या बछ्यास्नी हात्ती दावाया न्हाइ लागत.

**रामराजा**–व्हय, अन्, कां दादा, (रघुनाथरावास) नानासाव बी लइ चांगला परानी. सावध, शाना, अन्, राजकारनी. त्येन बगा येका कामाला शंबर युक्ति लडवून पाग्या.

**रघुनाथराव**–जी, सरकारच्या ध्यानांत असलें म्हणजे झालें.

**रामराजा**–कां माधवराव, आतां तुमी आमचं कार-बारी, तुमच्या तिर्थरुपाचं आमास्नी इस्मरन पाडा, मजी झालं.

**माधवराव**–जी, सरकारपायांची कृपा असली म्हणजे–हा, आमचा सेवकधर्म, चाकरी घेणें पायांकडे आहे.

**सचिव**–ठीक. ( हिम्मतबहादरास ) कां उत्तर कसें योग्य आहे, पाहिलें ना ?

**हिम्मतबहादर**–त्ये ! काय ? सरकारचं इचारनबी लइ गोड; अनि उत्तरबी लइ गोड.

**रामराजा**–खजिन्यावरचं कामगार कुट हायता ? आन अटरा कारखान्यावरचं बी ?

कामगार दोहोंकडील { आज्ञा, हुजर सरकार. वस्त्रांची तयारी आहे, सर्व गोष्टींची तयारी आहे. महाराज.

**रामराजा**–आना, त, वस्त्र.

**खजिनदार**–आज्ञा महाराज. (वस्त्रें आणून देतो).

**रामराजा**–या माधवराव, ध्या.

**रघुनाथराव**–व्हा व्हा, पुढें व्हा.

**रामराजा**–( वस्त्रें दिल्यानंतर ) आतां नीट खबर-दारीनं कारबार करा. नानासावाचं आमासनी लइ दुक झालं, अपरंपार. पन तुमास्नी पाऊन आता संतोस झाला. त्यो वगा हिम्मतभादर, मला मट्टा दुःकाचा दीस ग्येला.

**हिम्मतबहादर**–काय सांगु सरकार. अन् मी सुर्य्यनारायनाला अरग्य देत होतों. अन् पुकारा

झाला नानासाव ग्येल्याचा. अन् सरकार, झाला र झाला घात म्हटलन, आरग्या गळाला. अन् त्योच सरकार-दर्शनाला बातमी घ्येवी म्हनुनशेनी आलो. त्यो परसंग काय? आता टीक झाल.

**तासांवरील**—अकराव्याचा अंवल हाय. घडी भरत आली, महाराज.

(पानसुपारी वांटितात आणि नंतर
कचेरी बरखास्त होते).

---

## प्रवेश ४.

### सूत्रधार व विदूषक.

**वि.**—कायरे सूत्रधारा, कशाचीरे कचेरी ही! विडे वांटणारानें मला वेलदोडे विलदोडे कांहीं दिले नाहींत; अशी कोठें चाल असते?

**सू**—अरे, मग मागायाचें ●तेंस कीं नाहीं?

**वि.**—अरे, तो कोठला खडतर म्हातारा वांटणारा होता; तो लवंगा देखील देईना.

**सू.**—लवंगा तरी तूं मागितल्यास?

**वि.**—मागितल्या म्हणजे! तुझ्या मनांत राहतों कीं काय? पण तो कसला खाट! मला म्हणाला थांव, लंवगांबद्दल तुझ्या घशांत मिर्च्यांची पूड कोंदायास आणितों; नाहीं तर नाहीं, पण हा विदूषकराजाचा मान कायरे! थुः! थुः! थुः! त्या कचेरीच्या तोंडावर थुः! त्या म्हातारड्याच्या तोंडावर थुः!

**सू.**—अहो विदूषकराज, रागावूं नका; पुण्यास तर तुम्ही चला; तुमची चंगाळी देतों उडवून; तेथें माझी

ओळख आहे, पशानें वेलदोडे तुझ्या तोंडांत भरतों. चल तर खरा.

**वि.**—लुच्चा आहेस तूं; त्या म्हातारड्याचा बाप तूं; गुलामा कोल्ह्या, वेलदोडे मात्र खाशील तूं आणि साल-पटें तेवढी माझ्या घशांत कोंदशील.

**सू.**—नाहींरे, त्याची कां तुला काळजी ?

**वि.**—कां काळजी ! माझ्या घशाची मला नको काळजी, तर का तूं बाळगशील ?

**सू.**—पुरेरे बाबा, तुझी बडबड; सोलून दाणे दाणे तुझ्या घशांत घालीन. उमजलास ?

**वि.**—मग चिंता नाहीं; मग चल तर; आतां को-तवालघोड्यासारिखा नाचत येतों; चल: ( दोघे नि-घून जातात ).

---

## अंक २ रा.

## प्रवेश १.

पुणें—शनवारवाड्यांतील कचेरी.

**रामाजीपंत व चिंतोपंत** ( दोघे कारकून ).

**रामाजी.**—कां चिंतोपंत, श्रीमंतांची स्वारी कोणीकडे आहे ? तुम्ही अगदीं जवळ असणारे लोक म्हणून वि-चारितों.

**चिंतो.**—जवळ असणारे, अगदीं जवळ असणारे खरे. श्रीमंत कांहीं राजकारणी वेतांत गुंतले आहेत; तेथेंच रघुनाथराव दादा, सखाराम बापू, त्रिंबकमामा, रामशा-स्त्रीबाबा, आणखी काहीं कांहीं जड पारडीं बसलीं आहेत.

**रामाजी.**—मामा! त्रिंबकराव मामा! अहो, ते दक्षिणेंत गेले होते ना? दोन चार दिवसांपूर्वीं आले वाटतें. ऐकत होतों, तिकडून खंडणी घेऊन येतात म्हणून; वाळाजीपंत म्हणत होते. एकुण मामांची स्वारी आली अँ? ही मंडळी बसून किती वेळ झाला?

**चिंतो**—झाला, तास एक होत आला. काय सांगूं? श्रीमंतांची कामाविषयीं दक्षता, शहाणपण आणि जलदी हीं कांहीं कोणाला साधायाचीं नाहींत. अल्पवयांत असे गुण असणें फार विरळा. पण जाऊं द्या, मला कांहीं कामासाठीं जावयाचें आहे तेव्हां लवकर गेलें पाहिजे. ( निघून जातो ).

---

## प्रवेश २.

**माधवराव साहेब पेशवे, रघुनाथराव दादा, त्रिंबकमामा, रामशास्त्रीबाबा, सखारामपंत, आणखी कोणीकोणी मंडळी.**

**रघुनाथराव**—मामा, माझी मी सल्ला दिली. बोला, आतां परचक्र तर अगदीं नजीक येऊन ठेपलें. काय आंगावर तुटून पडावें, कीं आपण आपल्या गोटांतच लपून असावें. कसें करावें? मला तर बेलाशक आंगावर तुटून पडावें असें वाटतें.

**त्रिंबकमामा**—दादा, मला असें वाटतें. आपण होऊन ऐकून द्या,—आपण होऊन निजामअल्लीच्या आंगावर जाण्याच्या खटपटींत पडूं नये. आपल्या गोटांत मात्र तयारी कडेकोट ठेवावी. तो जवळ आला

म्हणून चिंता नाहीं, आणि त्याहीपेक्षां--हीं आपलीं लष्करें थकून आलीं आहेत. तूर्त आपला कमजोर आहे, तेव्हां सोईची गोष्ट करून त्याची समजूत पाडावी हें बरें. आतां मजकडून म्हणाल तर लढाईला एव्हां याक्षणीं सिद्धता आहे; परंतु उत्तम पक्ष हा दिसतो. यावर श्रीमंत काय म्हणतात तें समजण्यांत आलें पाहिजे.

**रघुना.**–छेः छेः छे, हा अगदीं भिकार सल्ला, यांत कांहीं अर्थ नाहीं. मार जाऊन कधीं पाहिली होती कीं नव्हती, अशी खोडकी जिरवावी त्या यवनाची. मामा म्हणतात अशांत भागूबाईपणा येतो. समरांगण गांठण्यासारखी मौज नाहीं. असेंही करितां जरी पराजय झाला तरी भागूबाईपेक्षां बरें. कां रामशास्त्रीबाबा ?

**रामशास्त्री**–आपणा उभयतांच्या बोलण्यावरून असें अनुमान होतें कीं, वर्तमानकालीं स्वकीय सैन्याचा गौण पक्ष आहे. अतएव युद्धसंग्राम न करितां या व्यतिरिक्त अन्योपायाची योजना करून परचक्राचें निवारण करावें हें उचित दिसतें. तस्मात् मामा जें म्हणतात त्यास माझें अनुमोदन आहे. आतां यावर श्रीमंतांची काय आज्ञा होणें ती होईल.

**माधवराव**–दादा, मामा व शास्त्रीबाबा यांनीं अनुक्रमानें आपापलें म्हणणें कळविलें. सखारामपंत, आतां तुम्ही आपलें कळवा म्हणजे झालें.

**सखारामपंत**–माझो कांहीं निराळा अर्ज नाहीं. दोन्हीही युक्ति आहेत.

**रामशा.**—सखारामपंत, असें बोलण्याची ही वेळ नव्हे.

**त्रिंब.**—दादांचा विचार माझ्या तर पसंतीस मुळींच येत नाहीं. कांहीं करणें तरी प्रसंग पाहून करणें, हा प्रशस्त मार्ग आहे. राज्यकारभारांत युक्तिप्रयुक्ति सर्व ठिकाणीं जोडल्या पाहिजेत. केवळ धर कीं झोडप, मारीन किंवा मरेन असें म्हटल्यानें व्यवस्था होत नसते.

**राघोबा.**—नाहीं तर काय मामा, घरीं बसल्यानें व्यवस्था होत असते ?

**त्रिंबकमामा.**—घरीं बसावें असा विचार मी श्रीमंतांस दिलाच नाहीं; परंतु घरीं बसून कार्यसिद्धि योग्य रीतीनें होत असल्यास त्यांत म्हणजे भागूबाईपणा येतो असें मला वाटत नाहीं. कांहीं होओ, पराजय कां होईना. लढाई करायाचीच, हा अविचाराचा दुराग्रह आहे. दादा, आपण असें बोलतां हाच चमत्कार.

**माधवराव**—हें ठीक नाहीं. अहो दादा, अहो मामा, शत्रूच मात्र वाद करण्यास योग्य. त्याशीं भांडणें सोडून आपण आपल्यांतच कलह मांडला तर कसें ? मामा म्हणतात तें मलाही बरें दिसतें. ज्याअर्थी आपलें लष्कर थकलें आहे व कमीही आहे त्याअर्थी निजामअल्लीची समजूत पाडून त्यास परतवावें हें ठीक, त्यांतच कार्यसिद्धि आहे. यवनांच्या गर्वाचें खंडन करण्यास आणखी पुष्कळ प्रसंग येतील. सखारामपंत, काल निजामअल्लीचा काय निरोप आला तो पुनः सांगा पाहूं ?

**सखारामपंत**—त्या यवनाच्या म्हणण्यांत आपण

त्यास बेदर, औरंगाबाद वगैरे त्याजपासून घेतले-
ले सर्व मुलूख सोडावे.

**माध.**—त्याला अशी थैली लिहा कीं, बेदर आणि औरंगाबाद मिळून आम्ही तुम्हांपासून आज तागाईत साल दरसाल सत्तावीस लाख रुपये घेत हो-तों त्यास ही थैली पाहतांच तुम्ही येथून टाणें उठवून जर निघून गेलां तर बेदर आणि औरंगाबादेबद्दलचे सदरहू २७,००,००० रुपये आम्ही मागणार नाहीं; परंतु ठाणें जर न उठवाल तर पेशव्यांची शक्ति किती आहे हें दाखवूं. लिहा—सखारामपंत अशी थैली लिहू-न आतां शिक्कामोर्तब करावयास घेऊन या.

**सखा.**—जी आज्ञा. लिहून आणतों (निघून जातो. पाठीमागून राघोबादादाही कांहीं काम आहे म्हणून निघून जातात.)

**त्रिंब.**—दादांना राग आला आहे असें दिसतें. आपण युक्ति काढली हीच ठीक. दादांचें बोलणें थोडें अविचाराचें होतें.

**रामशा.**—क्रुद्ध मुद्रा दिसली खरी; परंतु त्यांत अर्थ काय ? झालें हेंच यथायोग्य झालें.

**माधव.**—(हंसून) दादांची प्रकृति थोडी तापट आहे. म्हटलें असतां झालें, यांत त्यांस राग यावा असें कांहींच नाहीं. व असें करण्यांत त्यांचें मन दुखवावें हा आमचा हेतुही नाहीं. असें असतां त्यांना राग आला असें दिसतें. असो, वडील आहेत. (पुनः हंसून) तीर्थरूप गेले त्यांच्या पाठीमागें हेच आमचा सांभाळ कर्ते. तेव्हां राग जरी आला तरी

राहायाचा नाहीं. चला आतां. कोणीकडून एक तर काम उरकलें. दादाची समजूत मग पाडतां येईल. बरें आहे, जा आतां. (सर्व उठून जातात).

---

## प्रवेश ३.

### राघोबादादा व सखारामबापू.

**राघोबा.**—कां सखारामबापू—(रामा दार घे ओढून) कां बापू, चमत्कार कसा आहे पाहिलात ना ? आम्हीं आज इतके दिवस कारभार पाहिला, पण आज मूर्ख ठरलों. आम्हांलाच समजेना; आम्हांलाच उमजेना. काय शाहाणे ते तो मामा आणि तो शास्त्री. माधवराव काल नागवा फिरत होता; अझून तोंडचा जार नाहीं वाळला; ओंठ पिळला तर दूध निघेल, आणि आज मला सवाहात लांब गोष्टी सांगूं लागला. "मामा म्हणतात तें बरें दिसतें, त्यांतच कार्यसिद्धि आहे" असा मला बुद्धिवाद करितो. मी येवढा झालों, माझ्यापेक्षां हा पोर शाहाणा काय हो! काय बापू, एक एक चमत्कार सांगूं? आतांच्या काळचीं पोरेंच अशीं. नाहीं तर मी सांगेन तें याणें निमूटपणें ऐकावें. बरें आतां पाहतों, कसें माझ्याशिवाय राज्य चालतें तें. पाहातों ना आतां, तेथें तोंडानें गोष्टी नाहीं सांगायाच्या. उद्यां उजेडूं तर द्या; साफ आम्ही काम पाहात नाहीं असें मी म्हणणार, हा सगळा पोरवडा होणार. यांत कांहीं अर्थ नाहीं. तुम्हांला सांगतों मी सोडिलें कीं, लागलीच तुम्ही काम सोडा. आणखी जितके आपल्या पक्षाचे

आहेत तितक्यांना अशीच ताकीद द्या. असें केल्यावर माधवराव जर दुसरे दिवशीं पायां न पडेल तर माझें नांवच निराळें. कां कसें ? तुमच्या मनास येत नाहीं असें दिसतें.

**सखा.**—माझ्याकडून ना नाहीं. आपण जो बेत कराल त्यांत मी आहें. जोंपर्यंत या शरीरांत अस्थि आणि चर्म आहेत तोंपर्यंत मी आपणाशिवाय कोठेंही व कधींही राहणार नाहीं. आपण जी आज्ञा कराल ती करण्यास मी सदा तयारच आहें, याविषयीं आपल्या मनांत तिळमात्र संशय येऊं नये.

**राघोबा.**—हीच तर तुमची आमची आणभाक. उद्यां सूर्य जों क्षितिजावर आला नाहीं तोंच माधवरावाच्या कारभारांत घोंटाळा करून सोडितों. आपण कामांतून निघालों म्हणजे अर्थात झालेंच हें, यांत कांहीं संशय नाहीं. हें तुम्ही समजून टेवा. चला आतां आपण जाऊं. उद्यां असें करायाचें बरें ? आज सर्वांना अगदीं ताकीद करून ठेवा.

( दोघे निघून जातात. )

---

## प्रवेश ४.

रघुनाथरावाचा दिवाणखाना.

**रघुनाथराव व आनंदीबाई.**

**रघुना**—( मनाशींच ) काय बेटा चमत्कार ! हं:! शाबास—अरे, मी रघुनाथराव आणि मला असें, हं.! काळच तसा आला आहे. हं.

**आनंदी**—कां आज लवकर येणें झालें ? जायाचें तेंव्हां म्हणायाचें कीं "आज बाबा मला उशीर होईल. कांहीं फार निकडीचें काम आहे" आणि यायाचें तर लवकर. तेंव्हां लोकांनीं त्या बोलण्याचा काय नेम धरावा ?

**रघुनाथ.**—अगे आतां काय, लवकर काय आणि उशीरां काय. सगळाच चमत्कार आहे. आजचें तुला वर्तमान काय ठाऊक आहे ?

**—आनंदी.**—तें काय बाई. येथून गडबडीनें जायाचें, उशारानें येईन म्हणून, तेवढें मात्र मला ठाऊक. काय झालें काय ?

**रघुनाथ.**—अगे, आम्ही म्हणजे त्या माधवरावाला कोठल्या झाडाचा पाला असें वाटतें. उद्यां साफ आम्ही काम पाहात नाहीं म्हणून सांगणार. मग पाहातांना कसा राज्यकारभार चालतो तो. तसेंच सखारामपंत, तसेंच सर्व मंडळी करणार. तूं पाहा तर खरी, त्याची कशी ब्यें करून टाकतों ती.

**आनंदी.**—असें झालें तरी काय ? माधव कांहीं बोलला कीं काय ?

**रघुनाथ.**—अगे बोलायाचें तें काय ? आम्ही सांगितलेलं ऐकत नाहीं आणि तो मामा सांगेल व तो शास्त्री सांगेल तें खरें—तो बाळकृष्णबावांच्या जाग्यावर ठेविला आहेना, तो शास्त्री. पोरखेळ मांडला आहे आणि काय ?

**आनंदी.**—आतां समजलें. हा सगळा त्या रमाचा खेळ आहे. ती दिसायाला मोठी भावडी दिसती; पण

मग बाई मोठी खबरदार बायको आहे हो; तिचा हा सारा खेळ.

**रघुनाथ.**—तें काय ? रमाचा खेळ कसा ? असेल बाबा कोणी सांगावें ? या आतांच्या पोरी काय नवऱ्यांना सांगतील आणि काय नाहीं याचा नेम नाहीं. काय रमाचा खेळ ! कसा कसा, सांग सांग बरें.

**आनंदी.**—मामा जेव्हां आले तेव्हां अगोदर माधवरावाकडे गेले, आणि मग रमाच्या महालांत गेले. तेथें ( रघुनाथरावाकडे बोट दाखवून ) विषयीं कांहीं कांहीं बोलले. "सगळं हातींच असावाचें. स्वभाव कांहीं चांगला नाहीं. माधवरावाचें कांहीं चालूं द्यायाचें नाहीं असा बेत असायाचा"—एक का दोन—अशीच भाकडकथा सांगत होते, ती रखमाई रमाची लुगडें नेशिवणारी ती मला सांगत होती. तेंच रमा लोकांनीं सांगितलेलें ऐकून घेऊन नवऱ्याजवळ बोलली असें वाटतें. नवरा काय मेला दळ्या बाईलबुद्द्या म्हणून असें झालें.

**रघुनाथ.**—असें काय? हें आतलें कोणाला ठाऊक? हीं बायकांचीं सांगणीं आणि नवऱ्यांचीं ऐकणीं आपणाला नव्हतीं कधीं ठाऊक. गादीवर बसलें म्हणजे झालें असें नाहीं कांहीं. बरें आतां पाहतों. कसा कारभार चालतो तें पाहातों. दुसरे दिवशीं जर पायां न पडला माझ्या, आणि दादा कारभार पाहा न म्हणाला, तर तुला उजवी मिशी देईन उतरून.

**आनंदी.**—हो, येईल तर काय झालें. पण मग एक, कितीकां पायां पडेना. मी नाहींच येत. हेंच उत्तर.

मग अर्धें राज्य द्यावें तेव्हां काम पाहावें. असें केलें म्हणजे त्याची खोडकी जिरेल आणि त्या मेल्यांचे डोळे उघडतील.

**रघुनाथ.**—आतां तोच बेत धरला आहे, अर्धे राज्य घेईन तेव्हां काम पाहीन. हाच निश्चय.

---

## अंक ३ रा.

## प्रवेश १.

माधवरावाचा दिवाणखाना.

**माधवराव साहेब, त्रिंबक मामा, गोपाळराव पटवर्धन, आपा बळवंत, मल्हारराव रास्ते, नाना फडनवीस, रामशास्त्री बोवा.**

**त्रिंबक.**—आज इतक्या प्रातःकालीं लगबगीनें बोलावूं कां पाठविलें? जासूद आला आणि आतांच बोलाविलें आहे म्हणाला, म्हणून जपजाप तसाच राहिला; फक्त संध्या झाली होती आणि तसाच आलों.

**माधव.**—ठीक केलें. तसेंच कांहीं निकडीचें काम आहे म्हणून बोलाविलें. जपजाप काय, मग होईल. काल निजाम अल्लीविषयीं निर्णय ठरवून मी आपल्या म्हणण्याप्रमाणें हुकूम दिला. त्यावरून वाटतें दादांस राग आला. आज आपल्या आयनेमहालांतून बाहेर आलों तों दादा, सखारामपंत व आणखीं कितीएक बाहेर उभे होते. तेव्हां काय म्हणून विचारितांच लागलींच राजीनामे दहा पांच असामींचे स्वाधीन केले. मग दादांस मी म्हणालों "असें करण्याचें कारण काय?"

तेव्हां त्यांणीं उत्तर केलें कीं, कारण म्हणून कांहीं नाहीं, उगीच कारभाराची कटकट कशाला पाहिजे म्हणून आम्ही सोडितों मग मी तरी कशाला आग्रह धरूं? तेथून निघालों तो येथें आलों.

**त्रिंबक.**—हा काय विलक्षण राग. त्यांच्या मनांत आम्ही जरी वास्तविक सांगायाचें तें सांगितलें तरी आपण आमचें न ऐकतां आपलें ऐकावें.

**गोपाळ.**—सरकारी कामांत अशा गोष्टींचा राग काय उपयोगी? दादांनीं एवढी तेवढी गोष्ट मनांत धरावी हें ठीक नाहीं.

**माधव.**—तें सगळें खरें; पण येऊन बेतली, पुढें उपाय काय? बोला. मी, शास्त्रीबोवा, आपणाकडून सांगतों, मी म्हणून दादांना तुम्ही याच असें ह्या तोंडा-नें म्हणणार नाहीं. त्यांना वाटलें असेल माधवराव काय पोर आहे, आपणाशिवाय त्याच्या हातून काय होणार? तेव्हां आपणाला एवढें तर पाहिलें पाहिजे कीं, त्यांच्याशिवाय चालतें कीं नाहीं. चाललें तर बरें आहे, ते उमजतील. न चाललें, तर त्यांचा वडील-पणाचा मानच आहे; आपणास त्यांच्या पायां पडायास काय हरकत आहे? कां शास्त्रीबोवा, आपण न्यायाधी-श आहां, एवढा न्याय उलगडा आतां.

**रामशा.**—दादांनीं फार अनुचित कर्म केलें; आ-तां मला हा राजमार्ग दिसतो कीं, आपण कोणी योग्य यथाशास्त्र, यथान्याय वागणारा, चतुर व लोकप्रिय गृह-स्थ पाहून त्यास कारभाराचें प्रमुखत्व देऊन आपण स्वतः राजधर्म पाहवा आणि राजक्रिया चालवाव्या.

आपणांसारख्यांनीं कोणावर अवलंबून असूं नये.

**माधव.**—सर्व गोष्टींत शास्त्रीबोवा आम्हांस गुरूच्या ठिकाणीं आहेत, तेव्हां त्यांचा उपदेश ऐकणें भाग आहे. बरें तर आतां कारभार कोणाला द्यावा?

**गोपाळ.**—त्याविषयीं श्रीमंतांनीं काळजी करूं नये. त्रिंबकमामासारिखे कारभारी केल्यावर काम पहिल्यापेक्षां चांगलें चालेल. त्यांस आज्ञा मात्र व्हावी.

**माधव.**—माझाही विचार असाच आहे. मामांनीं कारभार पाहवा. तसेंच तुम्ही, आपा, मल्हारराव व नाना यांनीं आपआपलीं कामें पाहावीं, न्यायखात्यांत तर (रामशास्त्र्याकडे बोट दाखवून) प्रत्यक्ष ही तेजोरूपी न्यायमूर्तिच उभी आहे. मामा, तुम्ही आजपासून काम पाहण्यास आरंभ करा.

**त्रिंबक.**—आम्हांस काय? जसें सांगणें होईल तसें करायाचें; हे इतके आपले सेवक कामांत असतां दादा रुसून गेले म्हणून चिंता नाहीं निजामअल्ली तर थैली मान्य करून परत निघून गेला. आपण कारभाराविषयीं कांहीं काळजी करूं नये.

**माधव.**—झालें तर, एवढ्याकरितां आज आपणा सर्वांना बोलाविलें होतें. असे सुंदर कारभारी मिळाले, आतां मी निसूर झालों. परवां रामशास्त्रीबोवाच म्हणाले कीं, शरीरास जसे अवयव अथवा इमारतीस जसे खांब तसे राज्यास कारभारी आहेत. जर खांब बळकट असतील तर इमारतही मजबूद राहील. जर अवयव सुदृढ असतील तर शरीरही निरोगी राहील.

**रामशा.**—मला थोडी आज्ञा असावी. आम्ही सर्व शरीराचे अवयव खरे; परंतु या अवयवांकडून चलन-वलन करविणारा शरीरांत आत्मा म्हणून एक असतो, ही उपमा आपणाकडेच येते. असो, आतां आपल्या उपहारास उशीर होईल. ही पुनः मुतपाकांतून वर्दी आली. चला, मामा आता सर्व व्यवस्था तुम्हांस ठेवणें भाग आहे. द्या आज्ञा.

**सर्व.**—आज्ञा व्हावी तर; हुकूम झाल्याप्रमाणें तजवीज करण्यास जातों.

**माधव.**—ठीक आहे. मी हा चाललों. राज्य सुरक्षित चालून लोक सुखी राहोत म्हणजे झालें. ( सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश २.

रमाबाईचा आरसेमहाल.

### माधवराव व रमाबाई.

**रमाबाई**—( पलंगावर निजली होती ती, लगबगीनें उठून ) अग बाई, यावयाचें हें मला ठाऊकही नाहीं. मघां आपा फार घाईनें निघाले आणि म्हणाले कीं, आज फार जरूरीचें काम आहे; तेव्हां वेळ लागेल म्हणून मी आपली निजल्यें होत्यें. झालें का ? असें काय काम होतें.

**माधव.**—होतें. तुम्हांला काय सांगायाचें आहे. बायकांच्या तोंडांत गोष्ट राहत नसते.

**रमा.**—पुरे पुरे. कधीं बाहेर बोललेलें ऐकिलें

आहे का? उगीच मेला जातां येतां टोला द्यावा. येथें कोठें राहतें आहे, आतां माझ्यापाशीं फुटेल पाहा. नाहीं खरेंच. थट्टेनें नाहीं म्हणत. खरेंच काय झालें?

**माधव**.—एकदां सांगितलें तर खरें. सरकारी कामांत बायकांना काय करायाचें आहे? आमचें राज्य आणि आम्ही हवें तें करूं. तुम्हांला काय त्याचें?

**रमा**.—नः, बोलूं नाहीं देणार. मी अर्धांगी आहें म्हटलें, निम्मी सत्ता माझी आहे. मग नको का मला पाहायाला. नाहीं, खरेंच थट्टा नाहीं.

**माधव**.—पाहिलें पाहिजे तर.

**रमा**.—मग नाहीं का सांगत; नाहीं तर नाहीं जा. मी जों जों म्हणावें तों तों अधिकच.

**माधव**.—बरें तर सांगतों; तुम्ही आज निजलांच होतां. मी उठून बाहेर गेलों तों आपले दादा उभे. मी त्यांना कां म्हणून विचारिलें मात्र, इतक्यांत आम्ही काम पाहत नाहीं म्हणाले आणि चालते झाले. तेव्हां अर्थातच दुसरे कारभारी नेमून व्यवस्था ठेवणें भाग आलें; त्रिंवकमामांस कारभार पाहायास सांगितलें, तसेंच गोपाळराव, शामराव, आप्पा, नाना, यांना कामें सांगितलीं. शास्त्रीबोवा ते तर आहेतच.

**रमा**.—तरीच. मामंजींशीं बोलणें झालें तें तर मी येथें ऐकिलेंच; परंतु हें पुढलें ठाऊक नव्हतें. काय चमत्कार! आज आनंदी सासूबाई सकाळपासून आल्या नाहींत कीं बोलल्या नाहींत. मघाशीं मी कुंकूं लावीत बसलें होतें आणि त्या आंगावरून गेल्या; पण जशी कांहीं ओळख आहे कीं नाहीं. मी कोण आणि

त्या कोण. काय मेलें, आपणाला मात्र लोक नांवें ठेवतील असें वाटतें. परवां मला भरजरी पैठणी आणिली, त्यांना वाईट वाटेल म्हणून—सांगून दुसरी जेव्हां आणवून दिली तेव्हां मग मी नेसलें. तसेंच अहिल्याबाईकडून महेश्वराहून भेटीचीं वेणींत गुंफायाचीं मोत्यें आलीं होतीं त्यांतलींही थोडीं त्यांच्या स्वाधीन केलीं तेव्हां मग मी घालूं लागलें. कसेंही करा, संतोष नाहीं. असो, वडील आहेत म्हणून शोभलें जातें. आम्हीं केलें असतें म्हणजे मग—कायग बाई पोरी या! सगळ्या गांवभर डंका केला असता.

**माधव.**—वडीलच आहेत. राग केला तसाच लोभही करितील; परंतु दादांनीं असें करावयाचें नव्हतें. (डोळ्यांत अश्रु आणून) इतक्यांतच त्यांणीं आमच्या तीर्थरूपांचे शेवटचे शब्द विसरावयाचे नव्हते. (उसासा टाकून) त्यांचे ते शब्द माझ्या पुरे ध्यानांत आहेत. माझा हात धरून दादांच्या हातांत दिला आणि म्हणाले; माधवा मी तर चाललों. आणखी एक दोन दिवसांत हें जग मला नाहींसें होईल. आतां एका घटकेंत या संपत्तीचा, या ऐश्वर्याचा व या राज्याचा माझ्याशीं संबंध तुटेल. राज्य करीत असतां या पुण्याच्या लोकांस सुख द्यावें म्हणून मीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्या चांडाळ यवनाच्या चुरशीनें तें सर्व व्यर्थ गेलें. आतां माझ्या पाठीमागें तूं पेशवा होशील तेव्हां लोकांस सुखी करण्याचे प्रयत्न कर. दादांचें ऐकत जा. तुझें पोरवय आहे. दादा प्रौढ आहेत. आजपर्यंत शिकवणुकीची गोष्ट मी तुला सांगत आलों.

आतां माझ्या ठिकाणींच दादांना समज—आणि दादांस म्हणाले दादा, माधवास संभाळा. तुमच्या ओंटयांत त्यास घ्या, त्याचें उणें पडूं देऊं नका. तें आतां परदेशी मूल झालें आहे. जातीनें तो गरीब आहे. दादा, त्याला विसरूं नका. त्याला राज्यरीति शिकवा. त्याच्या कडून यवनास दंड करवा. तुम्ही त्याचे तीर्थरूप व्हा. माझा नव्हे, आतां तो तुमचा मुलगा आहे. फिरवा, माझ्या डोळ्यांसमोर तुम्ही त्याच्या तोंडावरून हात फिरवा. तुम्ही परस्परांवर प्रीति करितां हें पाहून मला मरूंद्या. अरेरे! काय दारुण प्रसंग तो—नको बाळे, नको डोळ्यांतून पाणी काढूं. भगवत्सत्तेपुढें ब्रह्मदेवाचाही उपाय नाहीं. मग आपण तर माणसें आहों. उगी. (धोतरानें तिचे डोळे पुसतो).

**रमाबाई**—इतकें झालें असतां मामंजींनीं असें केलें. म्हटलें म्हणजे कोणावाचून कोणाचें अडत नाहीं; पण त्यांनीं असें करायाचें नव्हतें.

**माधवराव**—हो, अडतें कोणाचें? आई मेली तरी दहा दिवसांच्या मुलाचेंही नाहीं अडत. मग हें तर काय; पण इतकेंच कीं दिसण्यांत हें विरुद्ध दिसतें. त्यांणीं आम्हीं एकविचारें असावें. एकचित्तानें राज्य करावें, यांत उभयतांस भूषण. परंतु नाहीं, तें यश घेणें आमच्या नशीबीं दिसत नाहीं. आतां आपण तरी तीर्थरूपांचे शब्द खरे करावे. माझी अशी फार इच्छा आहे कीं, या पुण्यांत जिकडेतिकडे हास्यवदनें दृष्टीस पडावीं. कोणी परका गृहस्थ आला असतां त्यास

सर्व सुखी दिसावे; परंतु अधिक सुखी कोण? हा कीं हा, हें ओळखितां येऊं नये.

**रमा.**—हो गडचे! मला देखील असेंच वाटतें. पलीकडे मारुतीजवळून बायका पाण्याला जात असल्या म्हणजे मला असें वाटतें कीं, त्या सगळ्यांना माझ्यासारिखीं लुगडीं नेसावीं, माझ्यासारिखे त्यांनीं दागिने घालावे व माझ्यावर जशी प्रीति आहे तशी त्यांच्या नवऱ्यांनीं त्यांच्यावर करावी. खरें गडचे, काय असेल हें; सदा असें वाटतें.

**माधव.**—शाबास. राज्यास स्वामीण पाहिजे ती अशीच. नाहीं तर आमच्या आनंदी—काकू. अहाहा! काय सांगूं पण! दादा जातीनें भावडे आहेत. त्या पुरुषाच्या आंगीं वैर मुळचें म्हणून नाहीं; परंतु करतो काय! सांपडला बाईच्या तडाक्यांत, गेली बुद्धि फिरून. मी मोठा दैववान कीं अशी सद्गुणी मुलगी माझ्या वांट्यास आली. असो, आतां जातों.

( निघून जातो ).

---

## प्रवेश ३.

देवघराच्या पुढील सोपा.

**रामशा.**—अरे पांडोबा, श्रीमंतांची स्वारी कोठें आहे?

**पांडो.**—स्नान करून देवघरांत बसले आहेत, जपास आरंभ झाला आहे, गांठ घ्यावयाची आहे?

**रामशा.**—होय, जा जाऊन विनंती कर.

**पांडो.**—आज्ञा केली असती; परंतु आज मध्यान्ह झाल्याशिवाय कोणीही आलें तरी गडबड करण्यास येऊं नका अशी ताकीद झाली आहे.

**रामशा.**—अशी ताकीद झाली आहे! मध्यान्हकालपर्यंत ? कायरे विटोबा कसें ?

**विठो.**—जी साहेब. पांडोबा म्हणतो असेंच, ती वेळ होई तोंपर्यंत आज कोणाचा आंत रिघाव दिसत नाहीं.

**रामशा.**—हं हं, तर मग मी आतां जातों. ब्रह्मकर्म आटपून बाहेर आले म्हणजे, मी आलों होतों अशी सूचना करा. विसरूं नका ( निघून जातात ).

---

## प्रवेश ४.

रामशास्त्र्याचा वाडा.

**रामशास्त्री आणि त्यांची पत्नी.**

**पत्नी**—आज दिसण्यांत चित्त उदास दिसतें; याचें काय कारण तें मला सांगितलें पाहिजे.

**रामशा.**—उदास खरेंच; वाड्यांत गेलों होतों; तेथें श्रीमंत जप करीत बसले आहेत व दोनप्रहरपावेतों गांठ पडणार नाहीं; असें समजलें.

**पत्नी**—मग त्यांत वाईट तें काय ? स्नानसंध्या का वाईट ! ( हंसत्ये ).

**रामशा.**—वाईट म्हणजे कांहीं संशय कीं काय ! दोन दोन प्रहर स्नानसंध्येंत घालविल्यावर प्रजेचें रक्षण कसें होतें ? इतरांची गोष्ट निराळी आणि श्रीमंतांची गोष्ट निराळी. त्यांचें मन फिरवि-

ण्यास आतां कांहीं युक्ति योजिली पाहिजे. स्वयंपाक सिद्ध असेल तर भोजन करून पुन: जातों.

**पत्नी**—जाऊन पाहतें.

( आंत जाऊन आल्यावर )

बाई तर स्वयंपाक आटपून केंव्हांची हात जोडून बसली आहे, इकडूनच उशीर.

**रामशा.**—शाबास, मी मघांपासून वाट पाहतों आहें. शेवटीं टपका आम्हांवरच ना. ठीक ठीक, हा उठलों ( निघून जातात ).

---

## प्रवेश ५.

शनवारचा वाडा.

**माधवराव व रामशास्त्री.**

**माधवराव**—या शास्त्रीबावा, ठीक आगमन झालें; आपली स्वारी प्रात:काळीं आली होती; परंतु जप करीत बसलों होतों त्यामुळें गांठ पडली नाहीं. ब्राह्मणकुलांत जन्म घेतलें आहे त्याअर्थी त्यासारखें कांहीं केलें पाहिजे. जन्मास आल्याचें कांहीं तरी सार्थक नको ?

**रामशा.**—तसेंच आम्हांसही सार्थक केलें पाहिजे. योगसाधनाचे मार्ग फार उत्तम आहेत. सर्व त्रिभुवनव्यापक आनंदरूपी, असाही असतां अहंकार मोहादिशत्रूंनीं बद्ध झाला जो परमात्मा त्याच्या मुक्तीची इच्छा आपल्या ठिकाणीं झाली आहे; येणेंकरून जीवात्म्याचें कल्याण होईल. मीही तेंच साधन करणार; परंतु तसें करण्यास हीं ऐहिक

सुखें उपयोगीं नाहींत. सर्वसंगपरित्याग करून सुक्षेत्रीं सावधानचित्तानें अधिष्ठित झालें पाहिजे. अतएव काशीक्षेत्रीं जावयाची योजना करून आपली आज्ञा घ्यावयास आलों आहें. आपलीही तशीच इच्छा आहे म्हणून दुसरी विनंती करितों कीं, आपणही प्रस्थान ठेवून मजबरोबर येण्याचें करावें. काशी म्हणजे केवळ प्रतिकैलास आहे. तेथें जान्हवीच्या पवित्र उदकाचें त्रिकाल स्नान करून जपजाप्य, योगसाधन व भगवंताच्या मंगल नामाचें स्तवन हींच करण्यांत कालक्षेप करूं.

**माधव.**—आपला भाव माझ्या लक्षांत पुरा आला नाहीं; परंतु साधारण असें वाटतें कीं, जपजाप्य करीत बसलों होतों त्यावर आपला रोंख आहे.

**रामशा.**—माझ्या बोलण्यांतील भाव इतकाच कीं, आत्मस्वरूप ओळखण्याची आपणांस इच्छा झाली आहे, ही फार चांगली. याजकारितां आपण मजबरोबर काशीस चलावें. मी आपणांकडून योगमार्गाचें अध्ययन करवीन.

**माधव.**—आतां तर उमजलोंच. मी पूर्वी बोललों तेंच. शास्त्रीबावा, आपण योग्य पुरुष आहां. आपली निस्पृहता पाहून माझें पूर्ण समाधान झालें. आतां आपलें वास्तविक म्हणणें कळवा.

**रामशा.**—श्रीमंतांचा • • • •

**माधव.**—मघाची थट्टा नको. खरें तें सांगा, मी उपदेशास पात्र आहें.

**रामशा.**—(हंसून) श्रीमंतांची थट्टा करण्याची

माझी योग्यता नाहीं. आपण जप करीत मध्यान्ह काल होई तोंपर्यंत जर बसलां तर प्रजेचें संरक्षण कसें होईल? मुख्यांनीं कारभार पाहणें सोडिलें म्हणजे हाताखालील कामगार अर्थातच आळशी होतात. असें झालें म्हणजे गरीबगुरीबांची दाद कशानें लागते? आपण जप करीत दोन प्रहरपावेतों बसणार असें जेव्हां ऐकिलें तेव्हां तो जप सर्व अनिष्टांचें मूळ असा मला भासला. आतां आपला मुख्य धर्म प्रजापालन हाच होय. तें जर सशास्त्र झालें तर त्यांतच आपणांस मुक्ति आहे. आपण प्रजेचें संकट दूर करून तिचें रक्षण करावें आणि तिनें आपणासाठीं परमेश्वरापाशीं वर मागावा, असा परस्पर संबंध ज्या राज्यांत राहतो, त्या राज्यास वैकुंठाचीच उपमा योग्य. यास अनेक शास्त्राधार आहेत. केवळ माझेंच म्हणणें असा अर्थ नाहीं.

**माधव.**—मला शास्त्राधार आपणांपुढें नकोत. आपणच जागृत शास्त्रावतार आहां. शास्त्रीबावा आज, मला आपण मोठ्या संकटांतून बाहेर काढिलें. नाहीं तर लोकांना थोड्याच दिवसांत माझा कंटाळा आला असता. कारभारी निस्पृही पाहिजेत ते एवढ्याकरितांच.

**रामशा.**—माझ्या बोलण्याचा श्रीमंतांस क्रोध आला नाहीं यावरूनच लोक आपल्या स्वभावाची तारीफ करितील. आतां मला आज्ञा असावी.

**माधव.**—उत्तम. मला आणखी कांहीं गोष्टी विचारावयाच्या आहेत; परंतु आतां अवकाश दिसत नाहीं. दुसरी एकादी संधी लवकरच येवो.

**रामशा.**—मी आपला सेवक आहें. दर्शनास दर रोज येतच असतों.

( रामशास्त्री निघूनजातात ).

**माधव.**—भला निस्पृही ब्राह्मण! शाबास. शास्त्रीबोवांस न्यायाधीश केल्यापासून मुलखांत आबादी झाली यांत नवल नाहीं. असला पुरुष विरळा. माझे सर्व स्तुत्य उद्देश आतां त्यांस कळवून त्यांचें अनुमोदन विचारतों. कोण आहेरे बाहेर—वहिरू—जयाजी—

**जयाजी**—जी सरकार, आज्ञा, हजर हाय.

**माधव.**—जयाजी, रामशास्त्र्यांकडे जा आणि म्हण कीं, रात्रीं मी बोलाविलें आहे.

**जया.**—आज्ञा सरकार, ( निघून जातो ).

( रात्र झाल्यानंतर ).

---

## प्रवेश ६.

दिवाणखाना.

**रामशा.**—( दरवाज्यांत ) कायरे ? कृष्णा गायकोड, श्रीमंतांची स्वारी आंत आहे कीं नाहीं ? शोध करून ये वरं, मी आलों आहें म्हणून विनंती कर.

**कृष्णा.**—जी, हुकूम. आब्या, आब्या, ऊठ ऊठ घे काटी.

( आबा जाऊन आल्यानंतर ).

जी सरकार हुजूर स्वारी तर वाढोळची येऊन बसलिया. अर्ज केला. आमंदी हाटकलय.

(रामशास्त्री आंत जातात).

**माधव.**–( ताजीम देऊन ) नमो नमः, यावें शास्त्रीबावा. आपला येतों म्हणून निरोप आल्यावर येथें येऊन बसलों.

**रामशा.**–सेवकांस मान देण्याचा हा एक मार्ग आहे. नाहीं तर आमचा निरोप गेल्यावरोबर आपण यावें ही आमची कोटली योग्यता ? धन्यानें चाकरास अहो म्हटलें, म्हणजे सर्व अहो म्हणतात.

**माधव.**–बसा, शास्त्रीबावा हा लोड.

**रामशा.**–आज्ञा.

**माधव.**–बोलावूं पाठविण्याचें कारण असें कीं, लोकांस सुखावह होतील अशा कांहीं गोष्टी करण्याचा आपण आपणा कडून पाया घालावा, असें वारंवार मनांत येतें याविषयीं आपली सल्ला विचारावी. असा आज माझा कितएक दिवसांचा विचार आहे; परंतु वानर म्हणतें पाहांट झाली म्हणजे घर बांधूं, तशी गत झाली. एवढ्याकरितां जासूद पाटविला. आपलें मत कसें आहे?

**रामशा.**–प्रजापालकांचा हा धर्मच आहे कीं, त्यांणीं सदैव लोककल्याणार्थ युक्तिप्रयुक्ति जडवाव्या आम्हांकडून राजधर्माचें अध्ययन करवीत असतां आमचे आचार्य वारंवार म्हणत कीं, प्रजेस सौख्य व्हावें एतद्विषयीं जो दक्ष तो राजलक्ष्मीपासून आपण किंचितही शोभा न पावतां उलटी तीस शोभा आणतो. भगवंतानें आपणांस लोकांच्या दुःखाचा परिहार करण्याची इच्छा दिली, हें पाहून मला वास्तविक आनंद होतो. भूतदया हा सर्वांसच श्रेष्ठ धर्म आहे. सत्पुरुषांचें असेंच लक्षण.

निर्गुणेष्वपि सत्वेषु दयां कुर्वंति साधवः।
न हि संहरते ज्योत्स्नां चंद्रश्चांडालवेश्मनि ॥

तेंच पृथ्विपतींनीं आपण केलें पाहिजे. मलाही कांहीं सूचना करावयाच्या होत्या त्यास आयताच हा संधि आला. लोकोपयोगीं गोष्टींत दोन तऱ्हा पाळिल्या पाहिजेत. प्रथम सांप्रत जी अव्यवस्था असेल ती समूळें उपटून टाकिली पाहिजे. नंतर दुसऱ्या नव्या उपयुक्त व्यवस्था केल्या पाहिजेत.

**माधव**—आपण एक दोन सांगा; माझ्यापेक्षां आपणांस अनुभव फार आहे.

**रामशा.**—आश्रितांशीं इतक्या नम्रतेनें वागणारे राजे थोडेच असतील. या न्यायाच्या कामांत धर्मशास्त्राप्रमाणें न्याय तर चालतच आहे; परंतु कितीएक असे खटले उभे राहतात कीं, त्यांचा निर्णय व्हावा एतदर्थ अवांतरही अनेक विचार पाहणें भाग येतें. याकरितां कांहीं पंचायती ठरवाव्या आणि त्यांचे ठराव प्रत्येक ठाणेदारांकडे पाठवावे. त्यांणीं त्यांच्या अनुलक्षेंकरून न्यायनिवाडे करावे. या कृत्यास आरंभ करण्यास आज्ञा होईल तर मी करीन. मात्र आपण माझें साहित्य करण्यास नारायणशास्त्री पटवर्धन, कृष्णशास्त्री परांजपे, जनार्दनशास्त्री आठले महादेवशास्त्री आगाशे आणि त्रिंबकशास्त्री आपटे यांस द्यावें.

**माधव.**—उत्तम आहे. असें केल्यापासून प्रजेचें चांगलें संरक्षण होईल खरें. शिवाय आपण म्हणतां अशी मंडळी नेमल्यावर काम तडीस जाईलच जाईल.

**रामशा**.—या मंडळींत आपण मुख्यस्थानीं येऊन बसलें पाहिजे.

**माधव**.—अति उत्तम. अग्निहोत्र्याचा होम टळेल; परंतु माझा हा नेम टळणार नाहीं.

**रामशा**.—दुसरी अशी सूचना आहे कीं, पानपतची लढाई झाली व तेथें आपला पराभव झाला त्या दिवसापासून आपल्या राज्यांत राहणाऱ्या मुसलमानांस कितीएक कामगार त्रास देतात. याविषयीं बंदोबस्त झाला पाहिजे. त्यांचे बंधुजन इराणी, दुराणी, आफगाणी यांणीं जरी उन्मत्त होऊन सदाशिवरावांचा पराजय केला, तरी आपल्या राज्यांत जे राहात होते त्यांणीं आपणांविरुद्ध बोट देखील उचललें नाहीं. त्यांणीं या सुखसमुद्रांतील लाटांचा व या राज्यरीतीचा पुरा अनुभव घेतला होता. त्यापासून झालेले फायदे पुरे समजून ते राजप्रीतींत किमपि कमी नव्हते. शांतसमुद्रांत बळकट नांगरलेलें गलबत तरी काहीं हालतें; परंतु त्यांचीं मनें अगदीं अस्थिर झालीं नाहींत. आपल्या सैन्यांतून सुद्धां ते लढत होते. असें असतां त्यांचा छळ कोणत्या कारणानें करावा?

**माधव**.—पानपत! पानपत! (उसासा टाकून) मराठ्यांचा पराजय! असो, परंतु शास्त्रीबावा ही गोष्ट माझ्या कानीं आली नव्हती हिंदु, मुसलमान इत्यादि अठरापगड जातीचे लोक जे कोणी आमच्या आज्ञा नीट मानून स्वस्थ आहेत त्यांस मी आपल्या पोटच्या लेकरांसारिखे मानितों त्यांना कोणी इजा दिली तर ती माझी मानखंडना असें मी समजतों, या-

स्तव आज्ञापत्रें लिहून शिक्का मोर्तब करावयास आंणा. त्यांत असें लिहा ( रामशास्त्री टिपतात ) "आज्ञा करण्यांत येते ऐसाजे, आमच्या कानीं अशी फिर्याद आली आहे कीं, न्याय पंचायती करण्यास ज्यांना आम्ही मुखत्यार केले त्यांतून कितीएक, यवन वगैरे जातीच्या लोकांस आमच्या हुकुमाविरुद्ध उगीच त्रास देतात. ऐशियास आजतागाईत पासून आमच्या राज्याच्या कोणत्याही भागांतून, कोणत्याही वर्णाकडून कोणत्याही कामगाराविरुद्ध कांहीं तक्शिरीची वाजवी फिर्याद आल्यास त्या कामगारास त्याच्या गैरवर्तणुकीवरहुकूम सजा दिली जाईल. माहार, मांग, चांभार, धेड, मुसलमान हे जरी जातीनें हलके आहेत तरी आपापल्या धर्मानें जोंपर्यंत चालतात तोंपर्यंत आमच्या मेहेरबानगीचें सुख त्यांणीं भोगावें, हें योग्य आहे. सर्वांस महशूर व्हावें" या आज्ञापत्राकरितां शास्त्रीबाबा, मजपेक्षां आपले आभार सर्वांनीं अधिक मानावे. याचें उत्पत्तिस्थान आपण मी उगाच कारण.

**रामशा.**—लोकांच्या आशीर्वादांचा वर्षाव, आपणांवर होओ म्हणजे झालें.

**माधव.**—सर्वांत मोटी गोष्ट ती करावयाची राहिलीच. या वर्षारंभीं तालुके फिरावयास गेलों होतों, तेव्हां एक महा अनाचार दृष्टीस पडला. श्रीमंत लोक आपल्या सत्तेच्या बळेंकरून गरीब बिचाऱ्या दरिद्री कुणब्यांस हवें तेव्हां वेठीस धरून पैसा दिल्याशिवाय पाहिजे तितकें लांब नेतात—त्यांच्या बायका पोरांची काय दुर्दशा उडत असेल—असें दिसल्यावरून तेव्हांच

मी जिकडेतिकडे ही चाल बंद करावी म्हणून सांगि-तलें आणि येथें आल्यानंतर लेखी हुकूम पाठविणार होतों तें तसेंच राहिलें.

**रामशा.**—तरीच एकूण आपण पूर्वी अशी आज्ञा केली होती. लेखी जरी नसली तरी कामगारां-स ती मानणें भाग आहे. आतां नीट समजलों. काल वसई महालांतून अर्ज घेऊन लोक आले आहेत. तेथील सुभेदार विसाजीपंत अण्णा यांनीं त्या हुकुमा-विरुद्ध आचरण केलें. त्यांणीं धरलेले विगारी येथें आले आहेत. आपण आज्ञा केलेली मला ठाऊक नव्हती ह्मणून थोडा मी विचारांत होतों; परंतु आतां विसाजीपंतांनीं मोठा गुन्हा केला हें उघड आहे. त्यां-स शिक्षा करणें ती श्रीमंतांनींच स्वतः येऊन करावी.

**माधव.**—विसाजीपंतानें विगारी धरिले? आणि ते-ही माझ्या आज्ञेविरुद्ध! आपण उद्यां प्रथम परवाने तयार करून मोर्तबास पाठवा. मग दुसरें काम, त्या परवान्यांत साफ लिहावें कीं, जबरीनें विगारी धरिल्यास फार मोठी सजा दिली जाईल. विसाजीपंतानें विगा-ऱ्यांकडून जें सामान नेवविलें त्याची जप्ती करून लिलांव करून टाका. जो पैसा येईल त्यांतून विगा-ऱ्यांची वाजवी दस्तुरी देऊन शिवाय त्या गरीबांस नुकसानीबद्दल योग्य बक्षिस द्या. बाकी उरेल तें तूर्त अमानतखात्यांत पडूं द्या. विसाजीपंतास तर कामांतून महकूब करा. असे दुष्ट लोक चाकरींत ठेवून उपयोग नाहीं

**रामशा.**—एकदां त्यास क्षमा असावी.

**माधव**—नाहीं, न्यायाधीश, या कामांत मी आपलेंही ऐकणार नाहीं. योग्य आज्ञा मोडणें म्हणजे काय आहे हें विसाजीपंतास व सर्वांस कळलें पाहिजे.

( घड्याळावरील माणूस येतो ).

**घड्याळा.**—तेरा घटका रात झालीया. चवदा घटीचा अंवल हाय, महाराज.

**रामशा.**—श्रीमंतांस मी फार वेळ खोळंबविलें. आतां आज्ञा असावी.

**माधव.**—बरं आहे; आपणांशीं बोलत असतां दिवसाचा तास आणि तासाचें पळ होतें.

( निघून जातात ).

---

## अंक ४ था.

## प्रवेश १.

बुधवार पेठ—गटारयंत्र.

**रामभट्ट**—काय, शितारामभट्ट, इकडे या, इकडे या; आज कुठे टिळा लाविला? तुमचा तर बावा, एकही दिवस रिकामा जात नाहीं. आमचीं कपाळें पाहा सदां पांढरीं. आज कुठे शक्करभात झोडला?

**शितारा.**—छे:, कुठला शक्करभात घेऊन बसलां रामभट? अहो तें तुम्हांला, आज गणेशपंत चांभारगोंदेकराच्या बापाचें श्राद्ध होतें. अँः साधे गोळे होते नी का—एकीकडून शिधा यावयाचा आहे तिकडे आतां निघालों आहें.

रामभ.–( धोतर ओढून ) या हो, शिधा येईल पुढें. अरे नारायणभट, हा चालला धर.

नाराय–कुठे चाललासरे, शितारामभट ? रामभट, हा धरला.

राम.–वेडा, गांवांत काय बातमी चालली आहे, नी हा चालला शिधा आणायला !

शितारा.–गांवांत काय चाललें आहे? तर मग बसनां गड्या. कायरे रामभट, गांवांत काय चाललें आहे?

नाराय–हा वेड्या, तुला कांहींच का नाहीं ठाऊक? ( याला काय पाहून शिधा देनात रे? ) गांवांत श्रीमंतांच्या आज्ञेवरून कडेकोट तयारी चालली आहे. खालीं हैदरअल्ली म्हणून कोणी आहे त्याच्यावर स्वारी होणार. शिंदे, होळकर व गायकवाड यांना आज्ञापत्रें गेलीं आहेत. आतां कायरे थाट! येथून तेथून चोहों बाजूंस लश्करांचीं लश्करें उतरतील.

राम.–अरे उतरतील काय ? येऊन उतरलीं.

विदूषक–( मध्येंच ) तुमचें आतां फार उत्तम झालें. कोणाचे बाप मरतील, कोणाचे लेक मरतील; तितकीं तुमचीं श्राद्धं वाढलीं.

राम.–मूर्ख बेटा, काय बोलतो पहा.

विदू.–बोलतो बरोबरच. मग काय, रामभट लागले सांगायाला; करा, बापाय तरपंते, मुलाय तरपंते, दक्षिणाय टाकंतु.

नाराय.–तरपंते, तरपंते ठीक ! ही व्यक्ति कोठून आली हो येथें !

शिनारा.—कोठून आली कोण जाणें! व्यक्ति पण व्यक्ति आहे.

राम—जाऊं द्या कीं तो वडबडच्या आहे. अहो, बरी आठवण झाली. भास्करपंत स्मार्त कांहीं अनुष्ठानें बसविणार आहेत. त्यांणीं मला ब्राह्मण आणायास सांगितलें होतें. चला तुह्मांला नेतों. तेथेंही ही बातमी लागेल.

विदू.—महाराजा, रामभट महाराजा, आह्मी एक ब्राह्मण आहे. मोटे विद्वान्. आंपणापाशीं आले आहे. गांवीं आमचा बायको मेले; मूल मूसलमान झाले; घर जळून गेले; येथून देशत्याग करून येथें आले. सोय झाली तर मोटा पुण्य लागेल. आह्मी येतो.

राम.—अहो तुह्मी कोण? आतांच आमच्यासारिखें बोलत होतां, आणि अतां लागलेच तेलंग्यासारिखे बोलतां. तर तुमचें नांव, गांव व गोत्र सांगा. तुह्मांलाही नेऊं. ब्राह्मणाची परस्पर सोय झाली तर त्यांत आमचें काय जातें?

विदू.—माझें नांव शामबक्ष. माझें गांव महंमदपुरी. माझें गोत्र रामभट.

राम.—कोणरे तूं लुच्चा? अशी थट्टा करायास येथें आलास कायरे? चरमी जोडा घेतला आहे काल. योग्यता पहावी आणि बोलावें. बाळींत टाकून शेणमार करून घालवून देईन, ठाऊक नाहीं.?

विदू.—नकोरे बापा मला शेणमार. शेणमाराची भीति नाहीं फारशी; पण दुसऱ्यानें आंघोळ करावी

लागेल त्याची भीति. आतांशा आठ आठ दिवसांनीं स्नान करावयाचा बेत धरला आहे. मी आपला पळून जातों कसा. नको तो मला शेणमार.

( विदूषक जातो ).

**सर्व**—काय विजातीय मूर्ति आली होती ही ! असो आपणाला काय त्याशीं करावयाचें आहे ? चला लवकर जाऊं.

( निघून जातात ).

---

## प्रवेश २.

( शनवारच्या वाड्यांतील हुजूर कचेरी ).

**माधवरावसाहेब पेशवे, त्रिंबकमामा, गोपाळराव पटवर्धन, मल्हारराव रास्ते, आपा बळवंत, नाना फडनवीस, रघुनाथराव, सखारामपंत, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, जयाजी गायकवाड आणि पेशव्यांच्या पदरचे दुसरे पुष्कळ सरदार.**

( दरबार भरल्यावर. ).

**माध.**—मामा, या सरदारांस दरबार भरविण्याचें कारण सांगा.

**त्रिंबक.**—जी, ( सरदारांस ) सरदर मंडळीस मराठी बाण्याचें शौर्य दाखविण्यास आतां उत्तम प्रसंग आला आहे. कर्नाटकांत हैदरअलीनें फार नासाडी मांडली आहे. कोणी वळदेजी लोक त्यास साहा-

ण असल्यामुळें तो आपला अपमान करण्यास उद्युक्त झाला आहे. त्याच्या सरहद्दीनजीकचे जे आपले पाळेगार त्यांस त्यापासून बहुत त्रास होतो. तेव्हां जर आपणांस आपलें नांव राखणें असेल, आणि जर यवनाची सत्ता चालूं देणें नसेल तर यावेळेस सैन्याची तयारी करून कर्नाटकांत जावें हें ठीक. ज्या पाळेगारांनीं आपणास मराठ्यांचे व पेशव्यांचे अंकित म्हणविलें आहे त्यांच्या संरक्षणार्थ हरतऱ्हा केल्या पाहिजेत. आह्मी त्यांजपासून करभार घेतों, काहीं कारण लागल्यास त्यांस हुकूम करितों व आह्मी त्यांचे यजमान म्हणवितों; मग त्यांजपासून फायदा करून घेण्यास जर आह्मी अधिकारी आहों तर संकटसमयीं त्यांस साहित्य करण्यासही अधिकारी झालें पाहिजे, शिंदे, होळकर, गायकवाड, रास्ते, याच्यासारखे शूर व महापराक्रमी सरदार मराठ्यांत आहेत. असें असतां या हैदरअल्लीस आह्मांस त्रास देण्यास धैर्य आलें हेंच नवल. ज्याप्रमाणें जवळ दहा पांच लहान लहान लेंकरें हांसत आनंद करीत बसलीं बाप अधिक शोभतो, त्याचप्रमाणें पुष्कळ पाळेगार अंकित असल्यानें राजा शोभतो. या गोष्टीचा पूर्ण विचार करायासाठीं आज श्रीमंतांनीं हें दरबार भरविलें आहे.

**रघुनाथराव**—त्यास खंडणी देऊन त्याचें सांत्वन केलें तर ?

**महादजीशिंदे**—काय दादासाहेब खंडनी ! त्या हायहाय ! या येळस माज्या आंगाचा तिळपापड जाला. या ह्ये बोलनं आपनासनीच सोबो. ( माधवरा-

वांत ) सायब, जोहार करतो. या चाकरमान्याला आज्ञा व्हावी. त्यो मुसलमान माज्या डोळ्यांत पुरी-पासून सलतोया. ह्यो परानी ( छातीवर हात ठेवून ) जिवंत हाय त्योपर्यंत त्येचा सूड उगवीन. दादासाब, आपन इसरला, हिंदुस्थानांतील म्होइम आपन इसरला. तित माजा बंदु पडला. ह्यो माजा पाय तित तुटून पडला. तित पडलेल्या रक्ताच्यान मी त्या मुसलमानावर म्होइम करीन आज्ञा मातर व्हावी. सायब, आपल्या पायाच्या पुन्यान त्येचा जाऊन समाचार घ्येतो. त्येला पायाजवळ धरून आनतो. आतां आतां मुसलमानानीं लइ पुंडावा मांडलाया. गाजा राग माज्यामंदी मात न्हाई. दादासाब अपून पुना खंड असा शब्द बोलूं नये.

**त्रिंबक.**—दादासाहेबांचा राग मी उमजलो. श्रीमंतांचे नातलग पडले म्हणून कमजास्त बोलतां येत नाहीं; परंतु या पुरुषापासून मराठी राज्याची खास हानि होणार. दादासाहेब, आपण व आपले पुत्र अशा गोष्टींनें लोकांच्या शापांस मात्र कारण व्हाल मी बोललों याची मला आपण व श्रीमंतांनींही माफी केली पाहिजे. मी कारभार पाहतों म्हणून मला असें बोलणं भाग आलें, मी पुनः माफी मागतों.

**माधव.**—( उभयतांस ) कलह करण्यास हा संधि फार उत्तम पाहिला! आपण असे आपापसांत भांडू लागलों म्हणजे हैदरास जिंकूं यांत संशय नकोच. तुकोजी होळकर, आतां तुह्मी बोला.

**तुकोजी होळ.**—सायब, मी तर ही तलवार लटकावूनशानी आलो हाये; आज्ञा मातर व्हावी ही उप-

सूनशनी इचा पराक्रम करून दावतों. सरकार, मला ह्ये त्ये ठाव न्हायी. पोक्त शिपाईबाना मातर मी जानतों. आपल्या आन मातोसरी आइल्याबाईच्या पुन्यान म्होइम फत्ते करून येतों. ह्यादर मराटी राज्यांत येऊनशनी दंगा करतो मजी काय. मला हुकूम व्हावा, दरकार काय त्येची येन्याची फुड! सायेब, माजा आरज इक्ताच.

**मल्हारराव.**—माझी विनंती ऐकावी. मराठे यश पावतील किंवा नाहीं हें आतांच समजून आलें. महादजी शिंदे व तुकोजी होळकर असे असे शूर सरदार जेथें मी मी म्हणून जाण्यास अर्ज करितात तेथें आमचीं निशाणें विजयी होऊन हैदर अल्लीच्या मस्तकावर नाचतील यांत काय संशय? पानपतच्या (ईश्वरेच्छेनें तें कसें झालें असेल तें असो) लढाईखेरीज आह्मांस पराजयाची वार्ता एके ठिकाणीं तरी ठाऊक आहे काय? श्रीरंगपट्टणाचा खंड कोणी घेतला? खडाप्याजवळ खर्पा व कर्नाळा या दोघा नबाबांचा पराजय कोणी केला? बहादूरगड कोणी घेतला? निजामअल्लीचें मोर्तब कोणी घेतलें? तेच हे मराठे. शिवाय याच हैदरअल्लीचा पराजय केला नाहीं कीं काय? श्रीमंतांनीं आपण स्वतः स्वारी करून खंडणी आणलेली आह्मी अजून विसरलों नाहीं. तो हैदरही विसरला नसेल. त्याच्या अंगावर शिंदे अथवा होळकर असे प्रतापी सिंह कशाला पाहिजेत? उत्तरेस हिंदुस्थानांत कितीएक उन्मत्त हत्तीसारखे दंगा करूं पाहतात तिकडे त्यांणीं

आपली चाल करावी. हैदर काय कपटी लांडगा आहे, मी त्याचे पाठीस लागतो, कोणीकडे कसा पळतो तें पाहतों. शेतकरीबावांचा वडगा जोंपर्यंत दृष्टीस पडला नाहीं तोंपर्यंत शेताची नासाडी करील. मला आज्ञा व्हावी. ती झाली कीं मी निघालोंच.

**माधव**.—शाबास, महावीरांनो शाबास. मराठी राज्याच्या संरक्षणाची भीति आतां कशास पाहिजे? ही लढाई आह्मी उकरून काढली नाहीं. लढायांमध्यें अनेक लोकांचा संहार होतो हें आह्मांस पुरतेपणीं ठाऊक आहे; परंतु उपाय नाहीं. आमच्यावर जेव्हां त्याणें आपण होऊन प्रसंग आणला तेव्हां आपलें नाव राखण्यासाठीं लढाई करणें भाग आलें आहे. तुमचीही राज्यसंरक्षणार्थ उत्सुकता पाहून धन्य मराठे असें आमचे शत्रुही म्हणतील. महादजी, तुकोजी आणि आपण वर हिंदुस्थानांत शांतता राखण्यास जावें, आणि त्रिंबकमामा व मल्हारराव यांस घेऊन मी स्वतः हैदरावर जातों. पानपतच्या लढाईपासून मराठ्यांची शक्ति क्षीण होत चालली असें निंदक म्हणोत. आमचा तर विजयध्वजच, हे सरदार ( सर्वांकडे बोट दाखवून ) अधिकाधिक उंच उभारताहेत. मामा, याप्रमाणें तजवीज व्हावयाची. बंदोबस्त करावयास जिकडे तिकडे हुकूम द्या. कां सर्वांच्या पसंतीस बेत आलाना?

**सर्व**—सर्वांच्या पसंतीस आला; परंतु आपण जावयाचें करूं नये. आपली स्वारी येथेंच असावी म्हणजे ठीक

**माधव.**—नाहीं. आतां तेवढी गोष्ट बोलूं नका. बेत झाला तो झाला. आपण आतां आपापल्या तुकड्यांत जावें हें नीट आहे—कोण आहे—कारखानीस,—

**कारखानीस**—आज्ञा सरकार. (पानसुपारी वांटतो आणि नंतर सभा बरखास्त होते.)

---

## प्रवेश ३.

(आंतला चौक).

**रमाबाई, राधाबाई, सरस्वतीबाई व लक्ष्मीबाई.**

**राधा,**—बाईसाहेब. आज आपण अशा चिंतेंत कां बरें दिसतां ?

**रमा.**—कोण मी ? नाहीं ग बाई चिंता कसली ?

**सरस्वती.**—तें नका गडे बोलूं. तोंड उतरल्या सारखें दिसतें.

**लक्ष्मी.**—बाईसाहेब, आतां नका लपवूं. सांगाच; सुकलेली गुलाबाची कळी जशी दिसते तशा आज आपण दिसतां. अशी फिक्कट मुद्रा आम्हीं कधींच पाहिली नव्हती.

**रमा**—खरं म्हणाल तर माझ्या बाई जिवावर धोंडा आला आहे. स्वारी करायाला म्हैसुराकडे जायचें आहे. काय करूं ! काल रात्रीं सांगून दमलें; पण नाहीं. मनांत भरलें तें भरलें. मामा जाताहेत, मल्हारराव जाताहेत; मग आणखी आपण कशाला बरें गेलं पाहिजे ? खोकला बळकट झाला आहे. पण ज्याचें

नाहीं तें ऐकावयाचें नाहीं. काय करावें बाई ? असा हट्टी स्वभाव. प्रकृतीला जपणें म्हणून ठाऊकच नाहीं. जेव्हां तेव्हां म्हणावयाचें कीं, राज्याचें चांगलें तें माझें चांगलें. शरीराला काय करावयाचें आहे ? असें म्हटल्यानें बाई कठें होतें ? वास्तविक म्हणाल तर या काळजींत मी आहें.

राधाबाई.—खरेंच. आमच्या येथें म्हणावयाचें कीं, श्रीमंतच जाणार. शरीराला समाधान नाहीं, मग कशाला जावें बरें ? पण बाईसाहेब आपण सुखीबाई. आपणासारखें दैव कोणाचेंही नसेल. काय एक रत्न सांपडलें आहे. मागल्या जन्मीं हरताळका चांगल्या पुजल्या आपण.

रमा.—होय बाई. काय त्या स्वभावाचें वर्णनच करितां येत नाहीं. लोकांचें मन दुखविणें तर ठाऊक-च नाहीं. मी हट्ट घेतला म्हणजे झालेंच काम. आतां बाई मला कसें करमेल कोण जाणे ?

लक्ष्मी.—इतके हातांत आहेतना ? मुठींत अगदीं ?

सरस्वती.—मुठींत म्हणजे ? बाई थोरांचें असेंच आहे. घांस घेणें झालें तर अगोदर बायकोची परवा-नगी पाहिजे. कांग घेऊं ? पाणी प्यावयाचें झालें तरी, कांग पिऊं ? मग प्यावयाचें

राधा.—ताटिवारांच्या चालीनं त्या.

रमा.—पुरेग तुमचें मेलें कौतुक. ही का थट्टेची वेळ आहे ?

लक्ष्मी.—आह्मी का थट्टा करितों ? खरें आहे तें सांगितलें.

( दासी आंत येते. )

**रखमाई दासी.**—बाईसाहेब, श्रीमंत मंदिरांत वाट पाहताहेत.

**राधा.**—ह्या, बाईसाहेब प्रत्यय.

**रमा.**—( हांसून ) अगबाई! मला सांगितलें होतं खरें. बायानों अतां मी तिकडे जातं. माझ्याही जिवाला स्वस्थता नाहीं.

( **रमाबाई** जाते ).

**सरस्वती**—असा जोडा कोठें पाहिला नव्हता. काय बाई ह्यांची एकमेकावर जी प्रीति आहे, ती कांहीं अनोनात. श्रीमंत खोकले कीं, बाईसाहेबांचा जीव घाबरला. बाईसाहेबांना कोठें शिंक आली कीं, लागले श्रीमंत आंत बाहेर खेपा घालायला. आले पांच चार वैद्य.

**राधा.**—नाहीं तर तुमचें आमचें. मेलें दिवसभर काम कर कर करावें, आणि मग रात्रीं तरी गोड बोलणें आहे का? तेव्हांही एकाचें तोंड पूर्वेस तर एकाचें उत्तरेस.

**लक्ष्मी**—खरेंच गडे. आह्मींच काय पाप केलें होतें कोण जाणे. आठवड्यांतून सहा दिवस तर आमचे मेले संतापांत आणि रागांत जातात.

**राधा,**—म्हणूनच चला आतां घरीं जाऊं. आज आमचा गोडीचा दिवस आहे.

( निघून जातात. )

——

# प्रवेश ४.

( रमाबाईचा आयनेमहाल )

**रमाबाई आणि माधवराव.**

**माध.**—कां महाराज, देतांना आतां रजा? फार दिवस नकोत. महिन्यांच्या आंतच येथें पुनः या मंदिरांत बसायाला तयार.

**रमा.**—रजा काय द्यायची? पण माझें गडे एवढं ऐकायाचें होतें, कांहीं गेलेंच पाहिजे असें नाहीं. खोकला झाला आहे, प्रकृत बिघडली आहे, पण बाई बोलावं कोणी.

**माध.**—तुह्मी. प्रकृतीचें असो; पण मी तुह्मांला सोडून उगीच दुसरीकडे जायाचें म्हणून जाईन? गादीवर बसायला पाहिजे आणि मग लढाईंत शिपायाला कां नको? जाणें भाग आहे म्हणून जातों. लोकांनीं आतां जर मजकडे पाहूं नये तर कोणाकडे पहावें बरं. तुह्मीच पहा.

**रमा.**—म्हणून काय झालें? गेलेंच पाहिजे असें नाहीं कांहीं आतां वाटेनें काय? कोणी बोलणारें नाहीं, कांहीं. नाहीं. गार पाण्याचीं स्नानें होतील. सकाळच्या प्रहरीं फराळ व्हायचा नाहीं. पहा बरें, सांगून ठेवलें आहे. नको बाई, मी तरी येतें बरोबर.

**माध.**—ठीकठीक, मग फार उत्तम सोय.

**राम.**—जळलं मेलें! हेंच तें. मी म्हटलेलें मनास नाहींच यायाचें. असल्यं मी बरोबर म्हणून काय होतें?

**माध.**—व्हायचें काय? एवढ्या करितां नेत नाहीं; मागें व्यवस्था पाहण्यास कोण?

**रमा.**—पुरेपुरे लाडीगोडीचें बोलणें.

**माध.**—बरें, तसें का होईना! लाडीगोडी केलीच पाहिजे. बायकांच्या रागांना देव देखील भ्याले. मग आमची ती काय कथा? लाडीगोडी केली नाहीं तर होतें कसें?

**रमा.**—माणसानें काय बोलावें बाई आतां?

**माध.**—बरें आहे, जा ह्मणून बोलावें. दुसरें काय बोलायाचें आहे?

**रमा.**—जा तर जा. तर काय आणखी. माझें कधीं एकादा तरी ऐकिलें आहे का? मी मली उगीच वेडी म्हणून हट्ट घेतें.

**माध.**—आमचें काय झालें. रजा मिळाली, पण मागें व्यवस्था मात्र नीट ठेवा. मी तुह्मांला शिकवीत असें नाहीं. तुह्मीच मला शिकवाल; पण आपलें सांगून ठेवतों. आपणाला सर्व जें कांहीं करण आहे तें लोकांकरितां. त्यांना जर सुख होत नाहीं तर आह्मी कशाला ? आह्मांला काय जन्मतांच देवानें मोठे-पणाचा शिक्का मारला आहे आह्मांला काय दोन तोंडें आहेत, का दोन नाकें आहेत, का दोन शिंगं आहेत ? त्यांणीं मोठेपणा दिला म्हणून आह्मी मोठे. भगवान रामचंद्र देखील म्हणाले कीं, मी लोकांकरितां अवतार घेतला. पाहूं बरें कशी व्यवस्था ठेवितां तीं.

**रमा.**—मी हवी तशी ठेवीन जा. राहायचें तर नाहींना ?

**माध.**—रामशास्त्री बावा आहेतच. कांहीं मोटें काम करणें झालें तर त्यांस विचारीत जा म्हणजे झालें.

**रमा.**—पण परत येणें कधीं होईल ? प्रकृतीला बाई फार जपलें पाहिजे.

**माध.**—होहो; प्रकृति प्रकृति म्हणजे काय एक बाऊच केला आहे! काय करावें, मी सुखानें का तुम्हांला सोडितों? मला तर सोडून जाऊं नये असेंच वाटतें; परंतु निरुपायाची गोष्ट. या तोंडाकडे पाहिलें म्हणजेच चित्त रमण होतें. रमा खरीच.

**रमा.**—अग बाई ताळच सोडला ?

**माधव.**—बरें तर आतां जातों, पण अगोदर एक साखरेचा—

**रमा.**—काय हें वेड लागलें ! साखरेचा ! बोलायला तरी कांहीं वाटतें ?

**माधव**—वाटायाचें काय, येतों.

(मुका घेऊन माधवराव जातो).

**रमा.**—(आपणाशींच) हे करवीरचे अंबाबाई कुलस्वामिणी, तुझी नाक दुराई काढीन. तुझ्या नांवानें सहस्त्रभोजन घालीन. जय होवो, प्रकृति न बिघडो. मला आज अनुकूल आहे. हे तुळजापुरचे आई, तुझ्या यात्रेला ओहोरानें येईन. जय आई पर्वती, संभाळ तूं आतां, तूंच आमची आहेस. कोणी बाहेर आहे का गे दासी ?

**दासी**—काय बाईसाहेब ?

**रमा.**—देवडीवरून जासूद पाठवून शास्त्रीबावांकडे सांगून पाठीव कीं, पर्वतीवर अनुष्ठानें बसवायास मी

सांगितलें आहे. तसेंच म्हणावें सप्तशतीच्या पाठा-साठीं ब्राह्मण बसवा.

**दासी**—आज्ञा महाराज.

( निघून जाते ).

---

## प्रवेश ५.

( रस्ता ).

### जनार्दनपंत आणि कृष्णाजीपंत.

**जना.**—नमस्कार कृष्णाजीपंत. काही काय बातमी? लढाईची काय बातमी आली आहे ?

**कृष्णा.**—लढाईची बातमी काय. श्रीमंतच गेले होते तेथें काय पुसावें ? जशी राज्यकारभारांत दक्षता तशीच लढाईत. त्यांणीं हैदराला अगदीं जेरीला आणलें. अखेर त्याणें तह केला. हें पाहा, तेथील एका व्यापाऱ्याचें पत्र आलें आहे. वाचा येथून.

(उघडून त्याच्या हातीं देतो.)

**जना.**—( मोठ्यानें वाचतो ) " तुम्हांस कळविण्या-जोगी आमच्याकडे बातमी ही आहे. हैदरानें त-हाचें बोलणें लाविलें. त्यास श्रीमंतांच्या आज्ञेवरून मामासाहेब कबूल झाले. तो तह ऐसाजे 'पूर्वी छ-त्रपति शिवाजी महाराज यांच्या वेळेस कर्नाटकाचा जितका भाग मराठ्यांकडे होता तितका आतांही अ-सावा. खेरीज मदगिरी आणि गरमकोंडा हे दोन्ही किल्ले त्यांजकडे असावे. खेरीज तूर्त लष्करखर्चाब-द्दल मराठ्यांस छत्तीस लाख रुपये पोंचावे. खेरीज

दरसाल चौदा लाख रुपये खंडणी म्हणून द्यावे. यास अंतर होऊं नये.'" (कांहीं थांबून) एकूण असें झालें, हैदराच्या उदयचंद्राआड ढग आलें. शाबास, मोठी आनंदाची गोष्ट. जिकडे तिकडे आतां लोक खुशालतील.

**कृष्णा.**—(उसासा टाकून) पण दुसरी वातमी तुम्हीं नाहीं ऐकिली. हिजपासून जितका आनंद झाला तितकेंच किमानपक्ष अधिक तिजपासून दुःख होईल. भगवान् त्या पुरुषाचें संरक्षण करो.

**जना.**—काय हो, काय म्हणतां, मी नाहीं समजलों.

**कृष्णा.**—श्रीमंतांना कफोद्भव होऊन प्रकृति अत्यंत बिघडली आहे. तूर्त स्वारी थेउरास आहे. काल रमाबाईसाहेब तावडतोब निघून गेल्या. असा प्रकार आहे. नाहीं तर हैदर एव्हां धुळीस मिळाला असता.

**जना.**—असें काय? अरेरे! या दुःखाखालीं तो आनंद रसातळांत बुडाला. देवा, त्या जिवाचें संरक्षण कर. कृष्णाजीपंत, तो प्राणी गेला तर दुसरें तर काय; परंतु केवळ महाराष्ट्राचें आज कुंकू गेलें असें समजावें.

**कृष्णा.**—वास्तविक; माधवराव गेले असतां आमच्या देशाचा प्रकाशदाता सूर्यनारायणच अस्तास गेला यांत संशय नाहीं.

**जना.**—आयुष्याची जर वांटणी करितां येती तर माझें मी निंमे आयुष्य त्या दयावंत प्रजापालकास दिलें असतें.

**कृष्णा.**—तसें होईल तर माझें मी पाऊण आयुष्य द्यावयास आतां या क्षणीं तयार आहें. अरे, पण असे दुर्विचार आमच्या मनांत कां उभे राहतात? ईश्वर सर्व दुर्विघ्नें नाहींशीं करो. मी तर श्रीमंतांच्या दर्शनास आतां थेउरास जाणार.

**जना.**—चला मीही येतों. अशा धन्य पुरुषाचे दर्शनासारिखा अवांतर कोणता लाभ आहे? चला. ( निघून जातात ).

---

## प्रवेश ६.

थेउर राजवाडा.

**माधवराव, नारायणराव, रघुनाथराव, सखारामपंत, वैद्य, आणखी दुसरे पुष्कळ बडे लोक.**

**सखारामपंत व रघुनाथराव** —( बाहेरून येऊन ) श्रीमंतांची प्रकृति आतां कशी आहे?

**वैद्य.**—हळू; आतां एव्हां थोडी उगीच डुलकी लागली आहे. बसावें.

**सखाराम.**—( रघुनाथरावास ) हळू, निद्रा लागली आहे. बरेंच आहे.

**रघुनाथ.**—हो हो; निद्रा चांगलीच.

( माधवरावास स्वप्न पडतें. )

स्वप्नामध्यें प्रथम तीन विमानें स्वर्गाहून खालीं उतरतात. एकांतून लक्ष्मीनारायण, दुसऱ्यांतून ईश्वरपार्वती आणि तिसऱ्यांतून ब्रह्मासावित्री असे येतात. त्यांजबरोबर चवथें रिकामें विमान उतरतें. मागून गंधर्व

गायन करीत येतात. माधवराव त्या सर्वांस साष्टांग नमस्कार घालतो व ते त्यास अनुक्रमें आशीर्वाद देतात. त्याच्या मस्तकावर हात ठेवितात, नंतर त्यास आलिंगन देऊन पुनः आशीर्वाद देतात. शेवटीं रिकामें विमान व पांच गंधर्व खेरीज करून बाकी सर्व पुनः स्वर्गास निघून जातात. तें विमान व पांच गंधर्व अदृश्य होऊन तेथेंच राहतात. इतकें झाल्यानंतर माधवराव जागृत होतो.

**माधव.**—सर्व गेले ? त्यांच्या दर्शनानें मला किती आनंद झाला. दैवहीन, अभागी मी; मीच कसा येथें राहिलों ?

**वैद्य**—नाहीं; श्रीमंत, सर्व येथेंच आहों. आमच्या हातून सरकारचाकरींत तिळमात्र अंतर पडावयाचें नाहीं.

**माधव.**—तुम्ही आहां ठीक आहे; परंतु मी तुम्हांस बोललों नाहीं.

**वैद्य**—तर श्रीमंत आम्हांशिवाय दुसरें कोणी येथें आलें नव्हतें.

**माधव.**—कोणी नव्हतें ? तर मग त्या देवाधिदेवांनीं मला स्वप्नांत दर्शन दिलें काय ? हे भगवन् लक्ष्मीनारायण, हे ईश्वरपार्वती, हे ब्रह्मासावित्री, महान् महान् संतांस ज्या पदांचें दर्शन अलभ्य, तीं पदें आज माझ्या दृष्टीस पाडिलीं. त्या पदांचीं चिन्हें आज माझ्या खोलींत उमटलीं. हे प्रभो, मी दास होऊन गायन करीत बरोबर आलों असतों. मला कां टाकून गेलां ?

**रघुनाथ.**—हें काय बोलतां माधवराव ?

**माधव.**—दादा केव्हां आलां ? मला स्वप्नांत त्या देवतांचें दर्शन झालें. त्यांनीं आशीर्वादही दिले म्हणून असें म्हणतों.

**सखाराम.**—स्वप्न फार उत्तम आहे. श्रीमंतांनीं दुखण्याची काळजी करूं नये.

**माधव.**—सखारामपंत, या दुखण्यांतून मी आतां बरा होईन ही आशाच नको. माझा अंतकाळ समीप आला तुमच्या आमच्या गांठी तास अर्धातास पर्यंतच. या अंतकाळींच्या दुखण्यापासून मला किंचितही दुःख होत नाहीं. मी जरी पाप्यांचा राजा आहें तरी आतां त्या स्वप्नापासून मला आश्वासन प्राप्त झालें आहे. मजकडे भगवंतानें दृष्टि देऊन मला पापविमुक्त केलें आहे. मी आतां या क्लेशस्थानापासून निष्कलंक आनंद ज्या ठिकाणीं नांदतो त्या ठिकाणीं चाललों. वैकुंठीच्या राण्याजवळ चाललों. त्या ठिकाणीं नारायणाचें अखंडित भजन पूजन करीन तेंच माझें जीवन होईल. हे यमा, तुझा पाश कोठें आहे ? मला तर मुळींच भासत नाहीं. पाहा दादा, सखारामपंत पाहा. माझे पाय गार पडत चालले.

**सखाराम.**—श्रीमंत, अशी दुष्ट वाणी कां उच्चारितां ?

**रघुनाथ.**—माधवराव, अगोदरच आमच्या छात्या फुटल्या, आणि वर शब्दांचे वज्रघात नको रे बाळा मारूं.

**माधव.**—माझ्याविषयीं तर मला कांहींच वाटत नाहीं; परंतु दादा, तुम्हांस एक गोष्ट सांगणं आहे. नारायणा, इकडे ये ( त्याचे डोळे पुसून ) हा वेड्या

दादा याजकडे पाहा. या मुलाचा सांभाळ करा. माझ्या हातून लोककल्याण व्हावें तसें झालें नाहीं. याच्या हातून तरी करवा. मी सांगावें असें नाहीं; परंतु काय करूं ? राहवत नाहीं. तुम्हां उभयतांचें एक चित्त असल्यास, तुमचा स्नेह उत्तरोत्तर दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेल्यास आपल्या कुळाचें नांव चिरकाळ राहील. सखारामपंत, तुमच्या सारिखे कारभारी आतां यांना मिळणार नाहींत. घ्या, हें शिक्का मोर्तब घ्या. आजपासून राज्याचे कारभारी तुम्ही व्हा.—आतां माझ्यानें बोलवत नाहीं पाहा तें विमान व गंधर्व माझी वाट पाहात उभे आहेत. ( माधवरावास गंधर्व दिसूं लागतात ) जाऊं द्या, आतां मला जाऊं द्या, एकदां तिच्याशीं बोलायाचें होतें. परंतु ती तर मूर्छा येऊन पडली आहे. किंवा मजबरोबर येण्याचा निश्चय करून त्या सतीनें देह ठेविला, कोण जाणे—होय, गंधर्व माना डोलवितात. शाबासबाई; आतां आपण उभयतां त्या सच्चिदानंदाच्या आनंदांत मिळून जाऊं. येतों येतों, आतां निघतों. माझी प्रजा सुखी राहो. दादा, अंतकाळींचे माझे आशीर्वाद त्यांस कळवा. माझें उत्तरकार्य नीट होऊं द्या. नारायणा रडूं नको. दादा, रडूं नका. सखारामपंत हें काय ? तुम्ही सुखी असा, हें सर्व राज्य सुखी असो. माझें चित्त कोणी ढळवूं नका. मी आतां बोलणार नाहीं. हे भगवन् ! राम—राम—राम-( अखेर मोठ्यानें ) राम.

( प्राण जातो ).

---

# प्रवेश ७.

आंतल्या बाजूची खोली.

**रमाबाई** मूर्छा येऊन पडली आहे. **रमाबाईची आई, आनंदीबाई,** आणखी दुसऱ्या **बाया** जवळ बसल्या आहेत. कांहीं अंतरावर **सखारामपंत, रघुनाथराव,** आणखी **कितीएक** येऊन बसतात.

**जवळच्या बाया**—बाईसाहेब सावध व्हा, सावध व्हा. लोक एका संकटांत आहेत तों हें दुसरें उभें राहिलें. बाईसाहेब—( असें म्हणून एकच आकांत करितात ).

**सखा.**—बायांनों, इतका आकांत करूं नका. अशानें त्या शुद्धीवर येणार नाहींत. गलबा कमी करा. हे देवा, काय हें.

**रमाबाईची आई**—नाहीं हो सखारामपंत. ती शुद्धीवर येत नाहीं. माझी बाई चालली चालली. आतां मी काय करूं? दोघांनाही माझा कसा कंटाळा आला. बाई बाई, माझ्यावर आकाश गडगडून पडलें.

**रमा.**—( सावध होऊन ) जळो माझें दैव. मी चांडाळीण कशी जन्मास आल्यें. आज मला सोडून कसें जाणें झालें. हे तुळशी आई, मी कोणतें पाप केलें. रे देवा, आज मजवर हा कसा प्रसंग आणिलास ? हा दिवस पाहण्यास मी कशी वांचल्यें. पतीपूर्वी ज्या सवाष्णी मरतात त्या धन्य होतात. आतां मी काय करूं ? हाय हाय, एकही आज्ञा मी भंगिली नाहीं,

एकही वांकडा शब्द मी बोलल्यें नाहीं. आतां मी कसे दिवस कंठूं ? हे माते धरित्री, घे, मला अनाथाला तूं आपल्या पोटांत घे.

**आई**—धरा, आवरून धरा. तिला देहाची शुद्धि नाहीं. बया, असा हंबरडा फोडूं नको. मज म्हातारीवर देव कसा कोपला ?

**रमा.**—आई, आतां मी येथें राहात नाहीं. माझ्याशिवाय घटकाभर करमत नव्हतें. मलाही करमत नव्हतें. यासाठीं मी जात्यें. मी बरोबर जात्यें. मी सहगमन करत्यें. माझे अवयव मात्र येथें आहेत. जीव सगळा त्या शरीरांत घुटमळला आहे. झाला हाच माझा निश्चय. मी बरोबर जाणार. करा माझी तयारी करा.

**इतर बाया**—बाईसाहेब असें करूं नका. दैवानें व्हावयाचें तें झालें. आम्हांस धनी नाहींसे झाले; आणि आमची धनीणही कां नाहींशी करितां ?

**आई**—नको नको. मग माझा प्राण कसा राहील ? घरधनी गेले तेव्हां तुम्ही दोघें होतां. आतां त्यांनींही सोडिलें. माझे आई, तूं तरी सोडूं नको. तूं तरी राहा. तुमच्या सर्वांच्या दुःखाचा भार मी म्हातारी कसा वाहूं. ऐक ऐक. पुरे. नको हट्ट धरूं.

**रमा.**—आई, असें भलतेंच सांगूं नको. तुझें म्हातारपण झालें आहे. संसारांतील दुःखांतून तूं लवकरच मुक्त होशील; परंतु माझें आतांसें तारुण्य आहे. मी जर आतां तुजकरितां राहिल्यें तर मग एक दोन वर्षांनंतर तूं गेलीस म्हणजे मग हे पाय तर अंतर-

लेच; पण तूंही अंतरशील. मग निराधारी, निराश्रित, हें काळें तोंड घेऊन, वैधव्य पदरीं बांधून लपण्यास देखील जागा उरणार नाहीं. आतां गेल्यें तर लोकांत कीर्ति करून जाईन. मग गेलें तर मजकरितां कुत्रा देखील रडणार नाहीं. आई, या मायापाशांत तूं पडूं नको, करा माझी तयारी करा. आणागे माझें पाढरें पातळ, आणून मला नेसवा. माझी दागिन्यांची पेटी आणून सर्व अलंकार मजवर घाला. माझा कुंकवाचा डबा आणून मला मळवट भरा. ओंटीचें तवक आणून माझी ओंटी भरा. मला जाऊन लवकर भेटूं द्या. जलदी करा, माझी वाट पाहाणें होत आहे. अंबाबाईनें विमान पाठविलें आहे. ( तिला विमान दिसूं लागतें ) बरोबर गंधर्व आहेत. विमान माझीच वाट पाहात आहे. आटपा, मी निघाल्यें.

( सर्व तयारी झाल्यानंतर स्वाऱ्या निघतात. )

---

## प्रवेश ८.

### दहनाचें ठिकाण.

**ब्राह्मण**—चिता रचिली. आतां प्रवेश करण्याचा समय आला.

**बाया**—बाईसाहेब दया ठेवा. आपण अक्षय सुखें भोगण्यास चाललां, दया ठेवा.

**रमा.**—सुखी असा. आपआपल्या पतीसहवर्तमान सुखी असा.

**रघुनाथ.**—रमाबाई चाललीस बया ? तूं आपल्या

देहाचं साथक केलेंस. आम्हांला मात्र दुप्पट दुःख होतें.

**रमा.**—मामाजी नमस्कार करित्यें.

**नारायण.**—वैहिनी, तुम्ही चाललां ? मी नमस्कार करितों; आतां मी वैहिनी म्हणून कोणाला हाक मारूं ?

**रमा.**—भावोजी, जा आतां राज्य करा. तुमच्याकडे पाहून तरी लोकांना आमची आठवण होओ. त्यांस आमचा विसर पडेल असें करा.

**नारायण.**—नको, मला तें राज्य नको. ती प्रजा नको, तो जीवही नको.

**रामशा.**—हे सुपतिव्रते रमाबाई, धन्य जोडा; स्त्रीजातीला तूं भूषण खरी. नको, तूं नमस्कार न केलास तरी चालेच. तुलाच आम्ही नमस्कार करावे. हे देवी, देव तुजवर पुष्पवृष्टि करोत.

**रमा.**—मी सर्वांना नमस्कार करित्यें—हे भगवन् नारायणा, वसिष्ठअरूंधतीच्या दर्शनासाठीं, स्वर्गीं पतिसहवर्तमान अखंडवर्षें वास करण्यासाठीं, सासर व माहेर हीं दोन्ही कुळें उद्धरण्यासाठीं, आमच्या हातून जे अन्याय व ज्या हत्या झाल्या असतील त्यांच्या निवारणासाठीं, मी आज पतीशीं सहगमन करित्यें. हे इंद्र, चंद्र, सूर्य, अग्नि, वायो, कृपा असों द्यावी. हे राजाधिराज यमधर्मा, आपलीही कृपा असावी. ( लोकांना ) येत्यें आतां. आमच्या प्रीतींत जसा भंग होणार नाहीं तसा तुमच्यांतही न होओ. येत्यें

( प्रवेश करितये. )

**लोक**—गेली गेली विश्वजननी, आमची मातुश्री गेली, आज आमच्या राज्याची लक्ष्मी गेली, शोभा गेली, आज आमच्या संकटांस आरंभ झाला. धन्य धन्य हे माउली तूं धन्य. तुजवीण आम्ही परदेशी झालों. आतां आमचें कोण पालन करील तें करो.

( सर्व दुःख करीत निघून जातात. )

**समाप्त.**